

॥ श्रीराम ॥

नाट्यकला-प्रसारक कंपनीकरितां लिहिलेलें

सुंदर-मठ

(श्रीशिवकालीन पंचांकी संगीत नाटक).

सांडून आपुली संसारवेथा । करित जावी देवाची चिंता ।
निरूपण कीर्तन कथा वार्ता । देवाच्या चि सांगाव्या ॥

—श्रीसमर्थ.

लेखक

कृष्णाजी हरि दीक्षित, बुदलमुखकर,

शहापूर-बेळगांव.

[संगीत कामधेनु, सं. औदार्याचा डंका, सं. पाटीलबावा, सं.पेशवाई, सं.श्रीकृष्णलीला, सं. कुंकुमतिलक, सं. सुदर्शन, सं. रुक्मिणीस्वयंवर, सं. विद्यासाधन, सं. अंधविश्वास, राजा सत्वधीर, रुक्मिणीहरण, देवयानी, प्रेमनिकष, भक्त-वात्सल्य, महामाया, [Mary Stuart] राजा राक्षस [Richard III], प्रणयिनी, वत्सला, स्त्रीराज्य, कळीचा नारद, श्रीकृष्णशिष्टाई इत्यादि नाटकांचे कर्ते.]

प्रथमावृत्ति—प्रती २०००.

डिसेंबर १९२२] **किंमत एक रुपाया.** [मार्गशीर्ष १८४४

हें पुस्तक पुणें, पेठ शनवार, घ. नं. ५७० येथें अनंत सखाराम गोखले,
यांनीं 'विजय' छापखान्यांत छापिलें-तें ठाणें येथें
धोंडो काशीनाथ फडके यांनीं प्रसिद्ध केलें.

प्रस्तावना

(१) **सुंदर-मठ** नाटकाची महाराष्ट्राला थोडक्यांत ओळख करून देण्याचें काम ग्रन्थकार रा. कृष्णाजी हरि दीक्षित यांनीं मजवर टाकलें व मला तें पत-करावें लागलें. **शिवतरची घळ** म्हणजेच श्रीसमर्थांचा सुंदर-मठ होय, हें ठाऊक होण्यापूर्वीच त्या स्थलाची रमणीयता व पवित्रता पाहून मी त्या ठिकाणास **पृथ्वीवरील स्वर्ग** म्हणून संबोधिलें होतें. पुढें कागदपत्रांच्या व तत्कालीन विश्वसनीय चरित्रग्रन्थांच्या आधारानें शिवतरची घळ म्हणजेच श्रीसमर्थांचा **सुंदर-मठ** होय, असें सांप्रदायिक विविध विषयांक ८२ यांत निर्विवाद सिद्ध करितां आलें. या स्वर्गतुल्य ठिकाणाची व तेथें घडलेल्या गोष्टींची महाराष्ट्रवाचकांस अजून व्हावी तितकी माहिती झालेली नाहीं, हें पाहून रा. दीक्षित यांनीं या नाटकग्रन्थाच्या द्वारें ते प्रसंग महाराष्ट्रजनतेपुढें मोठ्या कौशल्यानें मांडले आहेत.

(२) **सुंदर-मठ** नाटक पाहणारे पाहतील व वाचणारे वाचतील, पण तें परम रमणीय पवित्र ठिकाण महाराष्ट्रांतील प्रत्येक तरुणानें स्वतः अवलोकावें, अशी माझी विनंति आहे. पंतसचिवांच्या भोरावरून महाडाला जातांना जो घाट लागतो, त्या घाटांतील माझिरी गांवापासून सुमारें पांच मैल **शिव-तरखोरें** आहे. चौफेर डोंगराचा घेर असून मध्यें कुंभे शिवतर, आंबे शिव-तर व कसबे शिवतर अशीं तीन लहान लहान गांवें आहेत. कसबे शिवतर-च्या पाठीमागील डोंगरांत श्रीसमर्थांचा तो **सुंदरमठ** आहे. इतकें पवित्र आणि रमणीय स्थल माझ्या पाहण्यांत अन्यत्र कोठें आलेलें नाहीं ! त्या सुंदर ठिकाणाचें **श्रीसमर्थ** स्वतःच वर्णन करितातः—

सुंदर मूर्ति सुंदर गुण । सुंदर कीर्ति सुंदर लक्षण ।
सुंदर मठीं देव आपण । वास केला ॥ १ ॥
गिरिकंदरीं सुंदर वन । सुंदर वाहाती जीवन ।
त्यामध्यें सुंदर भुवन । रघुनाथाचें ॥ २ ॥
सुंदर पाहोन वास केला । दास संनिध ठेविला ।
अवघा प्रांत चि पावन केला । कृपाळूपणें ॥ ॥

वावी पोखरणी झरे। टांकीं विशाळ सुंदरें।
ठाईं ठाईं विशाळ मनोहरें। स्थळें निर्मिलीं ॥ ४ ॥
कडे कपाटें दरे दर्कुटें। पाहों जातां भय चि वाटे।
ऐसे स्थळीं वैभव दाटे। देणें रघुनाथाचें ॥ ५ ॥
अंतर्निष्ठ अखंडध्यानी। संनिध रामवरदायनी।
विश्वमाता त्रैलोक्यजननी। मूळमाया ॥ ६ ॥

(३) अशा या सुंदर-मठांत **श्रीशिवसमर्थांच्या** वारंवार भेटी होत. अखिल महाराष्ट्रास वंदनीय झालेला तो स्वातंत्र्यशाली **रायगड** सुंदर-मठापासून चार पांच कोसांच्या आंत आहे. हा **सुंदर-मठ** आणि तो **स्वातंत्र्यमठ** असे हे

दोनी मठ येक चि जाले। दोनी मठीं येक चि चाले।
मननसीळ निवाले। येणें शब्दें ॥

अशा प्रकारें सुंदर-मठांतील धर्मकारण आणि स्वातंत्र्यमठांतील राजकारण, **योगेश्वर** श्रीसमर्थांची युक्ति आणि **धनुर्धर** श्रीशिवराजांची शक्ति यांचें सुंदर मीलन होऊन त्याचीं गोड फळें शें दीडशें वर्षें महाराष्ट्रास चाखावयास मिळालीं! या शक्तियुक्तींच्या संमेलनाचा एक चमत्कारिक प्रसंग, न जाणों कदाचित् पहिलाच प्रसंग, ऐतिहासिक कागदपत्रांवरून सिद्ध झाला असून तोच या नाटकाचा मूलभूत आधार होय. सांप्रदायिक कागदपत्रांतील लेखांक २६ हें दत्ताजी त्रिमलांनीं दिवाकरांना लिहिलेलें एक पत्र आहे. त्यांत या दोघां अवतारी महापुरुषांच्या भेटीचा एक मोठा चमत्कारिक प्रसंग दत्ताजीपंतांनीं उल्लेखिला आहे. दत्ताजीपंत म्हणतातः--

"राजश्री छत्रपती यजमान कर्नाटकांतून स्वारी करून श्री रामदासस्वामींच्या दर्शनास सज्जनगडासी आले ते समई श्रीस प्रार्थनायुक्त विनंति केली कीं श्रीनीं पूर्वीं वीरवाडीचे मुकामीं श्री शिवतरी प्रांतीं असतां मधें महानदी महापूर आणि अकस्मात रात्रीं पलंगापासी येऊन चमत्काररूपें दर्शन दिल्हें कितेक चित्तीं होतें तेचि आशीर्वाद दिल्हे दुसरे दिवशीं सिवतर प्रांतीं **सुंदरमठीं** भेटी जाली"

म्हणजे याचा अर्थ, एकदां श्रीशिवछत्रपती वीरवाडीस व श्रीसमर्थ शिवतरी असतां व वीरवाडी आणि शिवतर यांच्यामध्यें जी काळनदी आहे

तिला महापूर आला असतां श्रीसमर्थ एकाएकीं रात्रीं, शिवराज निजले होते तेथें पलंगापाशीं प्रगट झाले व छत्रपतींच्या चित्तांत होते तेच नेमके मनोरथ पूर्ण होतील असा आशीर्वाद देऊन अदृश्य झाले आणि मग दुसऱ्या दिवशीं सुंदर-मठांत उभयतांची प्रत्यक्ष भेट झाली! याच भेटीच्या प्रसंगावर प्रस्तुतच्या कथानकाची उभारणी झालेली आहे.

(४) एकंदरच नाटकांच्या विषयीं एके काळीं माझ्या मनांत फार आढी होती व ती नाहींशी होणें जरी अशक्य असलें तरी पण पेशवाई, सुंदरमठ, कांचनगडची मोहना, कीचकवध, आत्मतेज, तारामंडळ, शिवसंभव हीं व असल्या तऱ्हेचीं दुसरीं उद्बोधक व परिस्थित्यनुकूल नाटकें वाचून, पाहून अथवा ऐकून पूर्वीच्या विपरीत ग्रहांत कांहीं फरक पडणें अपरिहार्य झालें आहे, हें कबूल करणें भाग आहे. ज्या नाटकांपासून प्रेक्षकांच्या ठायीं **स्वदेश** आणि **स्वधर्म** यांच्याविषयीं प्रेम उत्पन्न होईल अशीं नाटकें निर्माण झाल्यास त्यांना करमणुकीच्या साधनांत उच्च स्थान देण्यास कोणी हरकत घेणार नाहीं. स्वदेश आणि स्वधर्म हींहि बाजूस राहोत, पण नाटकांपासून सामान्य सदाचार, सुविचार, सौजन्य, सच्छील यांचा तरी कांहीं ठसा प्रेक्षकांच्या मनावर उमटला पाहिजे ना ? पण यांपैकीं कोणताच हेतु साध्य होत नसतां नुसत्या अचकटविचकट कथानकांनीं विनोदाच्या नांवाखालीं समाजाला मानसिक अधोगतीचें द्वार खुलें करून देणारीं नाटकें राजरोसपणें रंगभूमीवर धुडगूस घालीत असलेलीं पाहून विषाद वाटणें साहजिक आहे. अशा नाटकांपासून सरकाराला दुःख होण्याचें कांहीं कारण नसतें व त्यांच्याकडे सरकार ढुंकूनहि पहात नाहीं. सरकारचें दुःख एकच व डोळ्यांत तेल घालून तेवढ्यालाच तें जपणार. समाजाच्या नैतिक स्थितिगतीची जबाबदारी केव्हांहि समाजांतील धुरीणांवरच असणार. ही जबाबदारी नाट्य-संमेलनांनीं ओळखिली पाहिजे. तशी ती न ओळखतां सालोसाल भरणारीं संमेलनें फुकट होत. नाट्यसंमेलनें नाटकांचें नियंत्रण करणार नाहींत तर कोण करील ?

(५) प्रस्तुत नाटकांत **स्वदेश** आणि **स्वधर्म** यांच्या भक्तीचा पूर्ण विकास झाल्याचें पहावयास सांपडतें, हें नमूद करण्यास मला आनंद वाटतो. या नाटकाच्या योगानें श्रीशिवसमर्थभेटीचा खरा इतिहास सर्वश्रुत होणार

आहे. श्रीसमर्थांच्या भेटीची शिवराजांना लागलेली तळमळ प्रस्तुत नाटकांत उत्कृष्ट रेखाटली आहे. गांगनाइकामार्फत वासोटा किल्ला हस्तगत झाल्याची हकीकतहि हृदयंगम रीतीनें वर्णिली आहे. स्वकीयांचा नाश करूनहि परकीयांची पोळी पिकविण्याविषयीं प्रामाणिक तत्परता कैक वर्षांच्या गुलामगिरीनें समाजांतील कांहीं श्रेष्ठ व्यक्तींच्याहि कशी आंगवळणी पडते, याचें ठळक उदाहरण म्हणून चंद्ररावाचें पात्र सजविण्यांत नाटककारांना चांगलें यश आलें आहे. ऐतिहासिक नाटककाराच्या मनांत स्वदेशाच्या सद्यःस्थितीसंबंधानें जे विचार घोळत असतात, ते त्याच्या लेखणीचा आश्रय करून ऐतिहासिक पात्रांच्या मुखावाटें बाहेर पडणें साहजिक असतें. हा ऐतिहासिक नाटकांचा एक गुणच समजला पाहिजे व अशीं नाटकें लोकप्रिय होण्याला या गुणाची बरीच मदत होत असते. पण ऐतिहासिक नाटकांच्या मिषानें सद्यःस्थितिसंबंधक विचार व्यक्त करणें हा जरी गुण मानला, तरी आपलें हल्लींचें अज्ञान पूर्वकाळच्या लोकांच्या माथीं मारणें, हा दोषच समजला पाहिजे. या गुणदोषाचीं दोन दोन उदाहरणें प्रस्तुत नाटकांतील येथें दर्शवितों, म्हणजे माझ्या म्हणण्याचा आशय जास्त स्पष्ट होईल.

(१) गुणावह उल्लेख

(रा) पृष्ठ २८ वर शिवाजीमहाराजांच्या मुखानें जणूं महात्माजी बोलत आहेत. ते म्हणतातः—“ माझं कार्य पवित्र आहे. दीनोद्धार हा माझा मूळ हेतु आहे. या हेतूचा प्रारंभ द्वेषमूलक नाहीं....माझा धर्म फारच व्यापक आहे....अर्थात् त्याच्या पायांत द्वेषमूलक असा यत्किंचितही मालमसाला नाहीं....माझा झगडा मुसलमानी धर्माशीं नाहीं. मुसलमान जातीशीं नाहीं. आदिलशाहीच्या जागीं खुद्द विजयनगरकर हिंदु असते, अगर दुसरे कोणी जातवाले अथवा धर्मवाले असते, आणि त्यांच्या अमदानींत सध्यां आहे असाच जुलमी प्रकार असता, तर मी त्यांच्याशींही झगडलोंच असतों. माझा झगडा जुलमी राज्यपद्धतीबरोबर आहे.”

(म) पृष्ठ ३६ वर शिवाजीमहाराज म्हणतातः—“या कार्याला उलट अडथळा आणणारे कोण असतील तर हे किताबवाले, वतनदार, चंद्रराव मोऱ्यासारखे. आदिलशाही हेंच यांचं सर्वस्व होऊन बसलं आहे....आदिलशाहीचं आयुष्य या असल्या किताबवाल्यामुळंच क्षीण होतां होत नाहीं....

धिःकार असो या अशा किताबवाल्यांना. स्वतः तर पारतंत्र्यांत खितपत पडलेच आहेत, पण दुसरेही तसेच त्यांतच कुजावेत, अशी यांची घातुक बुद्धि! यांना माणुसपणच नाहीं म्हणावयाचं, दुसरं काय!"

याच रीतीनें पुढें तिसऱ्या अंकाच्या पहिल्या प्रवेशांत बाजीराव आणि विश्वास यांच्या संवादांत किताबांची जादु ग्रन्थकारानें उत्कृष्ठ दाखविली आहे.

(२) दोषास्पद स्थळें

(ग) शिवाजीराजांना लिहितां येत नव्हतें, असा आपला खोटा समज कोणा आपमतलबी लबाडांनीं करून दिल्यामुळें आज आपण स्वतःच्या पदरीं मूर्खपणा बांधून हा वाद माजवीत असतो, म्हणून काय त्या वेळींहि लोकांना हा भ्रम होता ? शिवाजीराजांनीं समर्थांना देण्यासाठीं दिवाकरांबरोबर पत्र पाठविलें होतें तें दिवाकर समर्थांना देत असतां समर्थ म्हणतातः— "शिवबानं!! मग त्याला लिहितां वाचतां येतं तर!"

आजच्या शापित आणि पतित महाराष्ट्राला याची शंका असेल, म्हणून ती काय श्रीसमर्थांनाही होती ?

(म) तसेंच रामदास आणि दिवाकर यांच्यांत शहाजीमहाराजांविषयीं संवाद चालू असतां पृष्ठ ९९ वर दिवाकर म्हणतातः—"इतके का शहाजी राजे पराक्रमी आहेत ?"

म्हणजे साधनांच्या अभावीं शहाजीमहाराजांच्या सामर्थ्याविषयीं आपण परवांपरवांपर्यंत जसे अज्ञानांधःकारांत होतों, त्याप्रमाणेंच प्रत्यक्ष त्या काळींहि पांच पन्नास हजार करोल सैन्य जवळ बाळगून कित्येक शाह्यांना जरबेंत ठेवणाऱ्या या थोर पुरुषाचे पराक्रम लोकांना दिसत नव्हते, असेंच मानावयाचें काय ?

(६) असो, एकंदरींत नाटक सरस आहे. क्वचित् कांहीं दोष आहेत, पण त्यांनीं कथानकाच्या गोडींत यत्किंचित्‌हि कमीपणा झालेला नाहीं. पुतळाबाईच्या चरित्रांत मला विसंगतता भासते. पृष्ठ १०५ वरील बाजीरावाच्या भाषणांतील " ही माझी बहीण होण्यापेक्षां माझ्या जनानखान्यांत लाथखाऊ दासीच होऊन इनं राह्यलं पाहिजे " हें वाक्य व पृष्ठ १०७ वरील त्याच्याच भाषणांतील "एकदां माझ्या अंतर्महालांत आलीस म्हणजे तुझी ही वटवट


कायमची बंद पडेल! '' हें वाक्य, अशीं हीं दोन वाक्यें गाळावीं, अशी मी शिफारस करीन. अशीं क्वचित् भिन्न रुचीचीं कांहीं स्थळें असलीं तरी एकंदर नाटक, अथपासून इतिपर्यंत, प्रेक्षणीय आहे, यांत कांहीं शंका नाहीं. श्रीसमर्थांच्या वाङ्मयाचें सारसर्वस्व रा. दीक्षित यांनीं दृढ परिचयानें आत्मसात् केल्याचें त्यांच्या या नाटकावरून दिसत आहे. नाटकाचें संविधानक नवीन आहे, पण महाराष्ट्राला जसजसा त्याचा परिचय होईल तसतसें हें नाटक लोकप्रिय होत जाईल असा माझा अंदाज आहे.

धुळें,
१८४४ कार्तिक शु० ७

शंकर श्रीकृष्ण देव.



समर्पण



श्रीसमर्था,

हें तुझेंचि लीलावर्णन। तुझें तुलाचि असो अर्पण।
त्वांचि मातें पुरस्कारून। लेहविलें कीं॥

श्रीचरणींचा रजःकण,
कृष्णाजी हरि दीक्षित.

॥ श्रीराम ॥


माझें हृद्गत.

नवलपरंपरा !

हें बोलणें येथार्थ । कर्ता राम याचा समर्थ ।
कोणा सांगों हा गुह्यार्थ । माझा मीच जाणें ॥ —श्री वेणाबाई.

१. सुंदर-मठाचें लेखन नाट्यकला प्रसारक कंपनींत अहमदनगर मुक्कामीं अधिक श्रावण शुद्ध ९ शके १८४२ (ता० २४ शनिवार, जुलै सन १९२० इ०) रोजीं झालें; रंगभूमीवर प्रथम प्रयोग आषाढ कृष्ण १० शके १८४३ (ता० ३० शनिवार, जुलै सन १९२१ इ०) उमरावतीस झाला; आणि आतां १८४४ मार्गशीर्ष–पौषांत (नोव्हेंबर–डिसेंबर १९२२) हें पुस्तक प्रसिद्ध होण्याचा योग आला आहे.

२. सुंदरमठाचे बाबतींत सर्वच कांहीं श्रद्धाळू मनाला गुंगविण्यासारखें घडत आलें आहे. नागपूरला नाट्यकला प्रवर्तक कंपनींत "औदार्याचा डंका" बसविण्याकरितां जात असतां वाटेंत सहज म्हणून अहमदनगर येथें 'प्रसारक' कंपनींत उतरलों. तेथें कंपनीला नवीन नाटकाची अत्यंत जरूरी असल्याचें दिसून आलें. पण नाटक लिहावयाचें कोणतें ? याचा कांहीं निश्चय होईना. अहमदनगरचे एक सुप्रसिद्ध पण हौशी ज्योतिषी रा० दिनकर शामराव गंधे यांनीं अधिक श्रावण शु० १ शके १८४२ (ता० १६ जुलै सन १९२० इ०) रोज शुक्रवार सकाळीं ८–२०ला प्रारंभ करण्यास सांगितलें. नांव पांच अक्षरीं असावें, दोन शब्दांचा एक सामासिक शब्द असावा, असाही त्यांनीं निर्बंध घातला ! ठरल्या वेळीं स्नान वगैरे करून टेबलापाशीं येऊन बसलों. नित्याप्रमाणें श्रीसद्गुरूंचें चरणस्मरण केलें



व एकदम चमत्कार असा कीं, 'सुंदर-मठ' असा आदेश स्पष्ट ऐकूं आला. ठरल्याप्रमाणें लेखनास प्रारंभ झाला, तो मेरुलिंगजी नजिकचा पहिला प्रवे

पूर्ण होईपर्यंत कांहीं लेखणी थांबली नाहीं. श्रीसमर्थ पडद्यांत घालविले आणि मग आपण लिहिलें तरी काय, हें पाहण्यासाठीं विसांवा घेतला. श्रीसमर्थदास भीमराव सखाराम पारळकर यांनीं आपल्या 'श्रीरामदास-कथा-सारामृत' या गोड ग्रंथाविषयीं,

श्रीसमर्थरामदास-कृपा भारी । अवचट वचनें येती जिव्हाग्रीं ।
तेंचि चरित्रलेखन करी । गर्व न धरीं मी माझा ॥
करितां श्रीरामदास स्मरण चित्तीं । तव वचनें अकस्मात आठवती ।
त्रिसत्य सत्य नव्हे हे मत्कृती । संत रिझती या बोला ॥

हे जे प्रचीतीचे बोल नमूद केले आहेत, तोच अनुभव हें नाटक लिहीत असतांना मला आला हें नम्रपणें येथें सांगण्याची धिटाई करितों. श्रीवेणाबाईंनीं श्रीसीतास्वयंवर ग्रंथ लिहिला त्याच्या अखेरीस शिरोभागीं दिलेले उद्गार काढले आहेत. खरोखरच हा 'गुह्यार्थ' ज्याचा त्यानेंच जाणावयाचा आहे! असो.

२. प्लँचेटचे प्रयोग विश्वसनीय असोत वा नसोत; पण मला मात्र दाखला आला तो असाः—गतसालीं आक्टोबरांत 'पाटीलबावा' अर्थात् 'महादजी शिंदे' या नाटकाच्या निमित्तानें मी पाटणकर नाटक मंडळींत होतों. कंपनीचा मुक्काम अहमदनगरास होता. कंपनींत प्लँचेटचे प्रयोग चालू असत. आश्विन शुद्ध ११ शके १८४३ (ता० १२।१०।२१ इ०) रोज बुधवार सकाळीं मी सहज प्लँचेटचे प्रयोग चालले असतां श्रद्धाळू चिकित्सक नात्यानें प्रश्न वगैरे करीत बसलों होतों. इतरही कित्येक मंडळी होती. भास्कर इंदूरकर नांवाचा कंपनींतील एक १७।१८ वर्षांचा (विशेषतः स्त्रीपार्टी) नट मध्यस्थ होता. तो अगदीं बेशुद्ध झाला होता. त्याच्या नाकातोंडांतून व डोळ्यांतून पाणी गळत होतें, तें दुसऱ्यानें पुसावें लागे. अशा स्थितींत तो एका लहान फलकाच्या द्वारें तक्त्यावरील अक्षरें दाखवून संदेश देत घेत होता. श्रीनारायण महाराज म्हणून कोणी दिवंगत विभूति प्लँचेटवर आली होती. त्यांनीं 'मराठेशाहीनें काय केलें माहीत आहे काय?' असा मला एकदम प्रश्न केला. मला 'मराठेशाही' काय हें कळेना. तेव्हां महाराजांनीं (तक्त्यावरील अक्षरें दाखवून) सांगितलें, कीं, तुमचा 'सुंदर-मठ' हें काय? तीच 'मराठेशाही' ती तुम्ही लिहीत असतां स्वतः श्रीसमर्थ ती वाचत होते. प्लँचेटचा हा संदेश, काकतालीय न्यायाच्या दृष्टीनें येथें सांगून टाकला. प्लँचेटवर कोणीं विश्वास ठेवावा, यासाठीं कांहीं हा उपदेशात्मक प्रचीतिपूर्ण प्रयत्न नव्हे!

४. नाटकें लवकर लिहिण्याची मला खोडच लागली आहे! या खोडीमुळें माझ्या कित्येक मित्रांचा मत्सर वाढीस लागून ते माझे कसून उपहासक बनले आहेत. माझी ही खोड जावी म्हणून मी प्रयत्न करितों, पण त्यांत मला यश येत नाहीं, काय करावें! या खोडीला अनुसरूनच 'सुंदर-मठ' ही केवळ आठच दिवसांत लिहून पुरा झाला. काय कारण असेल तें असो, त्यानंतर चौथेच दिवशीं मला अर्धांगवायूसारखा झटका येऊन माझें सर्व उजवें आंग बधीर झालें. त्या वेळीं तेथें इंडिअन स्टेशन हॉस्पिटलमध्यें असलेले डॉ॰ गोविंद बाळकृष्ण मालसे, एल्. सी. पी. ॲण्ड एस्. यांनीं व कंपनींतील यच्चावत् मंडळींनीं चांगली मेहेनत घेतली. केवळ चारच दिवसांत तेथें कै॰ लोकमान्यांच्या निधनाप्रीत्यर्थ शोकप्रदर्शनार्थ भरलेल्या जाहीर सभेत (ता॰ २ऑगष्ट १९२०इ॰) मला व्याख्यान देतां आलें. असो. इतक्या तांतडीनें कंपनीनें नाटक लिहून घेतलें, तें तितक्याच जलदीनें रंगभूमीवर आणायचें होतें. तसेंही झालें नाहीं. पुढें बरोबर एक वर्षानें त्यानें रंगभूमि पाहिली! आणि त्यांतही मजा अशी कीं, लेखकानें अजूनही तें रंगभूमीवर कसें होतें तें पाहिलें नाहीं! अशी नवलपरंपरा या नाटकाचे बाबतींत घडून आल्यामुळें त्याच्या लेखन-प्रारंभकाळची कुंडली मुद्दाम दिली आहे. ज्योतिषाकडे गुप्त व उघड दृष्टि टाकणारे बहुतेक असतात, त्यांना या नाटकाच्या बाबतींत कोणत्या ग्रहानें कोणता प्रताप गाजविला आहे, हें पाहणें करमणुकीचें होईल.

५. या नवलपरंपरेला शोभादायक अशी आणखी एक नवलाची गोष्ट म्हणजे धुळें येथील सुप्रसिद्ध श्रीसमर्थभक्त रा. शंकर श्रीकृष्ण देव यांनीं या नाटकास प्रस्तावना लिहिली ही होय. श्रीगणेशविद्यालयापासून माझा व रा. देव यांचा परिचय. नाटकाकडे स्वभावतःच रा. देव यांचें लक्ष्य नाहीं, हेंही मला माहिती. तरी माझा आग्रहच पडला म्हणून त्यांनीं माझें 'राजा सत्वधीर' हें नाटक वाचलें. त्यामुळें एकंदर नाटकांविषयीं त्यांचा असलेला ग्रह बराच पालटला. त्यानंतर 'पेशवाई', 'यक्षिणीची कांडी', हींही नाटकें त्यांनीं वाचलीं व त्यावर त्यांनीं आपल्या "रामदास आणि रामदासी" मासिक पुस्तकांत खुल्या दिलाचे, उत्तेजक अभिप्रायही प्रसिद्ध केले. अशा तऱ्हेनें माझीं नाटकें वाचण्याला त्यांचें मन निर्धास्त झाल्यामुळें सुंदर-मठ नाटकास प्रस्तावना लिहून मागण्याचा मला धीर आला. अनुकूल योग असा कीं, त्याच सुमारास धुळें येथेंच 'प्रसारक' कंपनी असल्यामुळें 'सुंदर-मठ' रंगभूमीवर पहा-

ण्याचीही रा. देव यांना संधि मिळाली. श्रीसमर्थचरित्राकडे रा. देव यांचें सारें मन वेधलें आहे. त्याचाच लाभ त्यांच्या प्रस्तावनेच्या रूपानें मला मिळाला याबद्दल माझ्या मनाला होत असलेल्या आनंदाची कल्पना लिहून दाखवितां येणें अशक्य आहे. व्यवहारतः रा. देव यांचे आभार मानणें अवश्य आहे. पण याबद्दल त्यांनीं मला क्षमा करावी. त्यांच्या भक्तिपूर्ण अंतःकरणाला दिखाऊ लोकाचार न रुचणें साहजिकच आहे.

६. 'सुंदर-मठ' नाटक म्हणजे श्रीसमर्थसेवेचें एकपरीं साधनच आहे. नाट्यकला प्रसारक कंपनी दर मुक्कामांत हें नाटक करून स्वार्थ व परमार्थ साधीत आहेच. पण हें नाटक पुस्तकरूपांत आणून महाराष्ट्रवाचकांना याचा लाभ करून देण्याचें रा. धोंडो काशीनाथ फडके यांनीं मनावर घेतलें, याबद्दल त्यांचे मुख्यतः आभार मानणें अवश्य आहे. त्यांची ही सेवा श्रीसमर्थचरणीं रुजू झाली आहेच, याबद्दल शंका नको. डॉ॰मालसे यांचें येथें कृतज्ञतापूर्वक स्मरण करणें अवश्य आहे. त्यांनीं माझ्याकरितां घेतलेली मेहनत विसरली जाणें शक्य नाहीं. छापखान्याच्या बाबतींत हौसी धंदेवाला मिळणें मुष्किलीचें होऊन बसलें आहे. पुस्तक शुद्ध व सुबक काढण्याकडे रा. अनंतराव गोखले यांचें लक्ष्य विशेष आहे; ही लेखकाच्या सोईची गोष्ट आहे, हें उल्लेखण्यांत संतोष वाटतो.

७. प्रत्यक्ष 'सुंदर-मठा'चा फोटो देण्याचा हेतु साधला नाहीं. त्याचप्रमाणें मेरुलिंगजी, शिंगणवाडीचा श्रीमारुती, हल्लींची जावळी, यांचेही फोटो देण्याचा विचार होताच, पण जमलें नाहीं. पुढील आवृत्ति श्रीसमर्थकृपें निघाली तर तीमध्यें निदान 'सुंदर-मठ' व बाकीचे जेवढे मिळतील तेवढे, फोटो देण्याचें करीन.

८. आणखी एकदोघां व्यक्तींचा येथें उल्लेख न करीन तर त्यांच्या प्रेमळ व कर्तव्यनिष्ठ अंतःकरणास कदाचित् दुखविल्यासारखें होईल. श्रीसमर्थचरणाचे ते एकनिष्ठ उपासक आहेत; आणि त्याच चरणावर या 'सुंदर-मठा'सह मी लोटांगण घेत आहें, तेव्हां त्यांच्या स्नेहार्द्र दृष्टिपथांत मी कायमचाच आहें. यापेक्षां जास्त काय लिहूं ? शेवटीं श्रीसमर्थांच्या चरणीं माझी ही बरीवाईट सेवा रुजू होवो, व अशीच सेवा आजन्म घडो, हेंच मागणें मागून हें नवलपूर्ण हकीकत श्रीसमर्थचरणींच अर्पण करितों.

शहापूर. (बेळगांव)
मार्गशीर्ष शु. १५ शके १८४४

कृष्णाजी हरि दीक्षित.

नाट्यकला प्रसारक संगीत नाटक मंडळी.

या मंडळीचे मालक रा. गणपतराव व गोविंदराव लेले आणि रा. काका वाटवे, निळुभाऊ पाध्ये, दादा पंडित, वासुदेवराव पर्वते वगैरे त्यांची प्रमुख नट मंडळी यांचा या ठिकाणीं विशेष उल्लेख करीत आहें. १९१६ च्या आगष्ट सप्टेंबरांत ही कंपनी बागलकोटास अत्यंत विपन्नावस्थेंत होती. मूळच्या नाट्यकला प्रवर्तक कंपनीचे मालक कै० पटवर्धन यांच्या तालमींत लहानपणापासून वाढलेली, आणि कित्येक नवीं जुनीं नाटकें काळजीपूर्वक करणारी ही मंडळी बागलकोटास असतांना अगदीं हताश होऊन गेली होती. त्या वेळीं अकस्मितपणें त्यांची व माझी गांठ पडली. कंपनीच्या मालकांचा व प्रमुख नटांचा कंपनी बंद ठेवण्याचा हेतु होता. तरी शेवटचा प्रयत्न म्हणून ही मंडळी पुनः कार्योन्मुख झाली. यश येईलच असा कांहीं भरंवसा नव्हता, तरीही त्या तशा मनःस्थितींत एकमेकांशीं कायमच्या संबंधाचीं कित्येक बोलणीं झालीं. पहिला खेळ श्रीरुक्मिणीस्वयंवराचा, बागलकोट येथेंच नवरात्राच्या पहिल्या माळेच्या रात्रीं (सप्टेंबर ता० २८) झाला. थोडी अंधुक आशा वाटूं लागली. त्यानंतर त्या वेळच्या अतिवृष्टीच्या व सांपत्तिक वगैरेच्या भयंकर संकटांतून निभावून कंपनी सांगलीस आली. तेथें १९१७ च्या जानेवारीच्या २० व्या तारखेस ' सुदर्शन ' रंगभूमीवर आलें. कंपनी बंद ठेवण्याच्या कल्पना पार दूर होऊन ती व्यवस्थित व भरभराटीला कशी आणावयाची इकडे मंडळीचें लक्ष्य वेधलें. ' सुदर्शन ' नाटकावर कंपनी पुणें येथें असतां विलक्षण काहूर उठलें होतें. त्यांतून मोठ्या कौशल्यानें निभावून कंपनीनें १९१८ च्या आगष्टच्या ३१ व्या तारखेस 'पेशवाई' सातारा येथें रंगभूमीवर आणली. पेशवाई म्हणजेच कंपनीचा भाग्योदय. नवीन कंपनी काढून पश्चात्तापांत पडलेल्या व अनेक तऱ्हेनें हैराण झालेल्या लेलेबंधूंना व त्यांच्या प्रमुख नटमंडळींना पेशवाईनें चांगले दिवस दाखविले. एकी, चिकाटी, धडाडी आणि प्रयत्नाची एकतानता

यांचें फळ त्यांना मिळालें. मंडळी सुखांत पडली व मीही संकल्प यशस्वी केल्याबद्दल श्रीरामरायाचा उतराई झालों. त्यानंतर हा 'सुंदर-मठ' रंगभूमीवर आला. स्वदेश व स्वधर्म यांची सेवा करण्यांत मंडळीला वाढती उमेद येऊं लागली. आतां मंडळीचे दुर्दिन संपले आहेत. विपत्कालीं जवळ न दिसलेल्यांची आतां सहजच गर्दी होत आहे. आतां कंपनीचा व्याप वाढला आहे, या वाढत्या कार्यक्षेत्राला अनुरूप अशीच स्पृहणीय कामगिरी सदैव व्हावी, व महाराष्ट्राच्या नाटयव्यवसायिकांत अग्रेसरत्व यावें, इतकी आतां या मंडळीची शक्ति वाढली आहे. तिचा ते योग्य उपयोग करोत व ज्याच्या कृपेनें त्यांना हे दिवस लाभले त्या करुणेश्वर श्रीरामप्रभूला न विसरोत, एवढीच इच्छा आहे.

कृष्णाजी हरि दीक्षित.

शुद्धिपत्र

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
७	१८	जीन ?	(हा शब्दच नको.)
३२	१०	घोळ	घोल
५३	११	श्रीनिवासरवा	श्रीनिवासराव
५४	१९	रिसायतीच्या	रियासतीच्या
६४	२३	किल्ले	किल्ला
१००	१७	साधती परत्र हा यहलोक सवैं।	परत्र ही। यहलोक साधती.
१११	३	क्षयाभीत तो आक्षौ	क्षयातीत तो आक्षै

महामाया:—सुप्रसिद्ध जर्मन कवि 'शिलर' यांच्या 'मेरी स्टुअर्ट' या नाटकाचें सुरस रूपांतर. हें नाटक रंगभूमीवर न येतांही महाराष्ट्राच्या आदरास पात्र झालें आहे. गुरुवर्य महाजनी, रा. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, प्रो. राजवाडे वगैरे विद्वानांचे व केसरी, महाराष्ट्र, 'साहित्यपत्रिका' वगैरेंचे उत्तमोत्तम अभिप्राय आहेत.

किंमत १२ आणे.

जोडाक्षरविरहित वाचनपाठ:—(सचित्र) यानें नुक्तीच अक्षर ओळख झालेलीं मुलें सहज वाचूं लागतात. किंमत ४ आणे.

सुभे कल्याण:—श्रीशिव छत्रपतिकालीन छोटी कादंबरी. हिचें हिंदींत भाषांतर झालें आहे. दुसरी सचित्र आवृत्ति छापत आहे.

सर्वांस किंमतीशिवाय टपाल हंशील निराळें. आपल्या नजिकच्या बुकसेलरास लिहा.

छापत आहे.

पाटील बाबा अर्थात् **महादजी शिंदे:**—(सचित्र) नाना आणि महादजी यांच्या इतिहासप्रसिद्ध लढ्यावर हें नाटक लिहिलें आहे. यांत अलीकडे प्रसिद्ध झालेल्या बहुतेक माहितीचा उपयोग करून या उभयतां थोर पुरुषांच्या थोर कामगिरीवर इष्ट असा प्रकाश पाडला आहे. पाटणकर संगीत मंडळीच्या नटांचे महत्त्वाच्या प्रसंगांचे फोटो व कांहीं ऐतिहासिक फोटो यामध्यें देणार आहेत. लवकरच विक्रीस तयार होईल.

समुद्रकन्या:—एक हृदयस्पर्शी गृहचित्र. सचित्र छोटी कादंबरी.

धी बॉंबे कमर्शिअल कंपनी, माधवबाग, मुंबई नं. ४.

श्रीराम.

सुंदरमठ नाटक.

[श्रीशिवकालिन शके १५७७, सन १६५५ च्या एप्रिल-पासून १६५६ च्या मार्चापर्यंतचा एक प्रसंग.]

पद १ लें—नांदी.

जय स्मर—कुठार। जयतु त्रिशुलधर। स्वजन—व्यसन—गज—प्रबल—दमन—कर हरित भूभार॥ ध्रु०॥ अनीति-पथरत, धर्मा विसरत। परांसि सुफलत, स्वीय नच सहत। स्वार्थोपायीं गुंग अविरत। कवण होय कवणास। कलि अनिवार त्राही १॥

[स्थळः—जावळी खोऱ्यांतील धावडशीनजीकचा श्रीमेरुलिंगजीचा डोंगर—डोंगराच्या माथ्याचा भाग. आसमंत भागांतून श्रीशिवस्तवनात्मक मंजुळ गायन ऐकूं येतें, तोंच एका डोंगरकपारीचा भाग एके बाजूस होऊन श्रीशांकर-पंचायतन दृश्य होतें. श्रीशंकरस्तवन मंगलार्तिपूर्वक होतें, हीच नांदी. नांदी-नंतरही मंजुळ गायन चालूंच असतें, पण डोंगरकपारीचा भाग पूर्ववत् होऊन श्रीशांकरपंचायतन अदृश्य होतें. गायन चालू असतां जावळीप्रांताचा राजा मोरे चंद्रराव त्याच्या रोखानें प्रवेश करतो. तो आल्यावर गायन बंद होतें.]

चंद्रावः—(स्वगत) खास हीच ती जागा. (इकडे तिकडे पाहून) हो, अगदीं हीच. मुळींच शंका नको. इतका वेळ मी सारखा लक्ष देऊन ऐकत होतों. आणि पुढं आल्याबरोबरच एकदम तें गायन बंद कां व्हावं? काय चमत्कार हा असावा बरं? (पुन्हां सभोंवार पहातो.) या ठिकाणीं तर खडकांचे कडे उभे आहेत. या इकडच्या बाजूला पहावं तर खोलच खोल दरी. (विचार) कोणाचं बरं हें गायन असावं? आणि अशा या ठिकाणीं! इथं तर माणसाचा वाराही नाहीं! (विचार) पुराणांत म्हणतात; तसे कोणी यक्ष-

गंधर्व तरी गायले नसतील ? (इतक्यांत पूर्वीचीच डोंगरकपारी एके बाजूस होऊन तेथें एक गाय दुधाच्या धारा जमिनीवर सोडतांना दिसते.) त्या ठिकाणीं एक गाय दिसते; गुराखी मुलांचंच गाणं आपल्याला ऐकूं आलंसं वाटतं. (विचार) पण आधीं मी आलों तेव्हां ही गाय कशी दिसली नाहीं ? आणि ही अगदीं निश्चल कशी ? जवळ तरी जाऊन पाहूं या. (गाईच्या जवळ येत असतां गाय अदृश्य होऊन त्या ठिकाणीं पंचोपचार पूजा झालेली शिवाची शाळुंखा स्वयंभू वर येते.) आहाहा ! केवढा हा चमत्कार ! (साष्टांग नमस्कार घालून) आज माझं जन्मसार्थक झालं. श्रीशंकरानं कृपाळू होऊन आपलं प्रत्यक्ष दर्शन दिलं. आहा ! श्रीशंकरा, तुझं वर्णन मी पामर काय करूं ! मी तुला अनन्यभावें शरण आहें. (पुनः नमस्कार करून उभा रहातो.)

[श्रीशंकराच्या शाळुंखेंतूनः—कांहीं इष्ट असल्यास मागून घे. या वेळीं मी तुझ्यावर प्रसन्न आहें. (चंद्रराव हा अपूर्व ध्वनि ऐकून गोंधळतो.) अरे, असा गोंधळतोस काय ? मागून घे. (इतक्यांत पडद्यांतून श्रीरामदासस्वामी उच्च स्वरानें:-गोंधळूं नकोस, चंद्रराव, ही वेळ आहे, अशी वेळ ये म्हणून येत नसते. शुद्धीवर ये. नीट विचार कर. तुझं आणि तुझ्या योगानं तुझ्या स्वकीयांचं कल्याण, निरंतर कल्याण ज्यांत आहे, असं कांहीं मागून घे. उगीच भुलूं नकोस.) (तरी चंद्रराव गोंधळलेलाच उभा रहातो.) पुन्हां शाळुंखेंतून ध्वनि निघतोः—बोल, बोल तुला काय पाहिजे तें.]

चंद्र०:--(काय मागावें याचें योग्य आकलन न होऊन) बादशाही कामगिरी माझ्याकडून एकनिष्ठेनं व्हावी. त्यांत मला मानमरातब कोणापेक्षांही जास्त मिळावा. बादशहाच्या कामगिरींत मी आणि माझं सर्वस्व खस्त झालं तर मला धन्यताच वाटेल.

[शाळुंखेंतला ध्वनिः—बरं जा. तुझ्या इच्छेप्रमाणं होईल.]

(चंद्रराव झालेल्या प्रकारामुळें गोंधळलेल्या स्थितींत असतां श्रीरामदास "सदा कल्पवृक्षातळीं दुःख वाहे । तया अंतरीं सर्वदा तेंचि राहे" हा श्लोकार्ध 'जयजय रघुवीर समर्थ' या नामघोषांत संपवून तांतडीनें प्रवेश करितात. नामघोष ऐकून देहभानावर आलेला चंद्रराव गहिंवरून त्यांचे पायीं मस्तक ठेवतो.)

चंद्र०:—आहा! महाराज, आपल्या कृपेचा प्रसाद मला मिळाला. माझं जन्मसार्थक झालं! आपण आश्वासन दिल्याप्रमाणं मला श्रीशंकराचं दर्शन झालं आणि प्रसादही पण मिळाला.

श्रीरामदास:—खरोखरच संतोषाची गोष्ट आहे. बरं पण काय काय झालं सांग तरी.

चंद्र०:—(आठवण्याचा प्रयत्न करतो.) महाराज, काय काय झालं कांहींच कसं आठवत नाहीं! काय चमत्कार आहे कळत नाहीं!

राम०:—अरे, आतां इथून पुढं चमत्कारयुगच चालू होणार आहे? बरं पण पहा, पहा कांहीं आठवून. निदान मागितलंस तरी काय? आणि मिळालं तरी काय? तें तरी लक्षांत ठेवलंयस कीं नाहीं? पहा, पहा आठवून!

चंद्र०:—तें आहे थोडंथोडंसं लक्षांत. बादशाही कामगिरी करतांना मला खूप मानमरातब मिळावा, त्यांत माझं सर्वस्व गेलं तरी हरकत नाहीं, पण बादशहाची नौकरी अगदीं इमानेंइतबारें व्हावी, असं घेतलं मागून आणि जा, तुझ्या मनाप्रमाणं होईल, असा वरही मिळाला.

राम०:—छेः! मला नाहीं वाटत तूं इतकं लांबच लांब कांहीं मागितलं असशीलसं! तूं आधीं गोंधळूनच गेला असशील किती तरी!

चंद्र०:—गोंधळून तर गेलोंच होतों. तरी पण हें इतकं मागितलं! अगदीं मला पक्कं आठवतंय. खरोखर महाराज, आपल्या कृपेचा मला प्रसाद मिळाला. आपण माझ्या या प्रांतांत वस्ती केली आणि मला पामराला आपल्या सेवेचा लाभ दिला. माझं तें तप फळास आलं.

राम०:—तूं काय मागितलंस? बादशाही कामगिरींत खूप मानमरातब मिळावा, आणि?

चंद्र०:—त्यांत सर्वस्व गेलं तरी हरकत नाहीं! का योग्य वर मागितला कीं नाहीं? एकाएकीं तो मेघनाद ऐकून मी तर घाबरलोंच पण—

राम०:—पण काय बरं? कोणीं तरी तुला घाबरूं नकोस म्हणून सांगितलं?

चंद्र०:—होय! आणि ती वाणी महाराज, आपलीच असावी, हो, आपलीच ती. -

राम०:—(हंसून) बरं. कांहीं का असेना, तुझ्या इच्छेप्रमाणं तुला मिळालं ना? आणखी यापेक्षां कांहीं मागणार होतास काय?

चंद्र०:—आणखी तें काय मागायचं? बादशहा सरकारची चाकरीं कोणाहीपेक्षां माझ्या हातून आतां सरसच होणार. म्हणजे आतां जो तो माझा मत्सरच करणार. सगळ्यांचं मत्सरस्थान होणं हें तरी पूर्वार्जित पाहिजे!

राम०:—आणि तें तुझं होतं, म्हणूनच तुला हें महत्फल प्राप्त झालं. मला तुझ्या मागणींत स्वामिभक्तीची जींवंत ज्योत दिसून येते. त्याशिवाय कांहीं तूं स्वामिकार्यार्थ सर्वस्व गेलं तरी हरकत नाहीं, असं मागितलं नसतंस.

चंद्र०:—माझ्या पूर्वजांनीं या आदिलशाहीकरितां जें केलं आहे, त्याच्या पासंगासही मी करीन तें लागणार नाहीं. आम्ही मोरे आधीं मूळचे कर्नाटकांतले. अगदीं यःकश्चित् सरदार होतों. हा प्रांत त्या वेळीं शिर्के, गुजर, मोहिते, महाडीक यांच्या ताब्यांत होता—

राम०:—त्या वेळीं- ? त्या वेळीं म्हणजे कोणच्या वेळीं बरं- ?

(इतक्यांत श्रीशिवाजीमहाराजांच्या हेरमंडळांतील विशेष कर्तबगार असा बहिरजी नाईक कोंकणी गुराख्याच्या वेषांत प्रवेश करून त्या सांबाच्या पिंडीस नमस्कार करीत उभा राहतो.)

चंद्र०:—तें कांहीं नाहीं मला फारसं ठाऊक! तरी पण त्या वेळीं युसफआदिलशहा गादीवर असावा.

राम०:—विजापूरचा ?

चंद्र०:—हो—

राम:—मग हा मुलूख मराठ्यांचा म्हणजे तुमचाच होता म्हणायचा ?

चंद्र:—आमचा कसला ? ते शिर्के तर अतिशयच भांडखोर! त्यांनीं तर आदिलशहास सळो कीं पळो करून सोडलं होतं; पुणें, सुपें शहाजी राजांच्याकडे होतें; आणि हीं बारा न् बारा चोवीस मावळं नी तसाच हा नीरावारणेचा खोऱ्यांतला मुलुख हे चोर दावून खात होते झालं- ?

राम०:—चोर कोण ? शिर्के महाडीक वगैरे ?

चंद्र०:—त्यांचा आम्ही पुरता नक्षा उतरला.

राम०:—बादशहाही कांहीं पण तुम्हांला विसरला नाहीं- ?

चंद्र०:—छेः! मुळींच नाहीं. 'जावळीचे राजे' आम्हांला त्यांनंच केलं.

राम०:—पण प्रांत सगळा जिंकला तुम्हींच ना- ?

बहिरर्जी—(पुढें येऊन) ह्यो बगा, नदरबी पोंचत न्हाइ. हा सम्दा प्रांत मारमारून घेतला.

राम०:—तुलाही ठाऊक आहे हें ?

चंद्र०:—हो, हो! या सगळ्या खोऱ्याला त्या आमच्या पराक्रमाची अझून आठवण आहे.

बहि०:—आन् तो आमी इसरूं तरी कसं जी? जावळीचं निशान जुंवर हिरवं हाय तुंवर इसर म्हटलं तरी कसं इसरावं जी!

चंद्र०:—बघा, बघा, याला सगळी माहिती आहे.

बहि०:—असायचीन्! यशवंतराव राजे परांड्याच्या गर्दीत कसं झुजलं ह्यें कोन कसं वरं इसरल? अन् तसं कुनीबी इसरूं नये, म्हनूनश्यान् तर हिरवं निशान आदिलशानं इनाम दिलंय.

राम०:—आं! मग एकूण तुझं निशाण हिरवं आहे म्हणायचं? मला ठाऊकच नाहीं हें!

चंद्र०:—बादशहाची ती देणगी आहे—

बहि०:—बादशा का फुकटचा देतुय? आमच्या सरकारच्या डुयांनि डुया खपल्या—सम्द मराठ धुळीस मिळाल-राज आदिलशाला न गवसत तर आज भागानगर बी जळलं असतं. ते शिर्के का अस तस होत? पुन या आमच्या म्हाराजांच्या हत्याराला सम्द मराठ गारद झाल आणि बादशाचं तोंड उजळ झालं. म्हूनशान बादशाला ह्यें द्यावंच लागलं—

राम०:—मग या भागाला मुसलमानांची सत्ता आली ती चंद्रराव तुझ्या पूर्वजांच्याच पुण्याईनं! खरोखर तुझ्या पूर्वजांची ही कर्तबगारी अपूर्व होय. वाः! किती पण मनोहर प्रांत आहे हा! हा प्रांत मराठ्यांना राखतां आला नाहीं. उगीच भांडले बिचारे आदिलशहाशीं. किती पण सुपीक प्रदेश दिसतोय हा—

चंद्र०:—हा सारा, महाराज, या दासाच्याच अधिकारांतला आहे. बादशाहानं हा सारा प्रांत आम्हांलाच बहाल केला आहे.

बहि:—कोनी उगीच कुनाला काय बी देत न्हाई! अव, हत हुत तरी काय? राज आल, रयताली कौल दिला, अबादानी केली तवा कुठं बसती जाली नी आज हें असं हिरवं गार नदरेला पडतंय.

राम०:--(आश्चर्यानें) चंद्रराव, हें कांहींच कसं आम्हांला सांगितलं नाहींस? इतके दिवस आम्ही तुझ्यापाशीं आहोंत. आपल्या पूर्वजांची थोर कामगिरीसुद्धां सांगायची नाहीं काय?

चंद्र०:—प्रसंगच नाहीं आला तसा—आणि महाराजांची स्वारी सदासर्वदा ध्यानमग्न, तेव्हां नाहीं झालं सांगितलं कांहीं. महाराजांच्या प्रसादानं आज तर अलौकिक लाभ झाला. इथं हें शिवलिंग आहे, हेंसुद्धां मला माहीत नव्हतं. (बाहिरजीस) तुम्हीं तरी कधीं पाहिलंत कारे हें?

बहि०:—होय सरकार. आमी गुराखी तर वागटानं आमचीं जनावरं उचलूं नये म्हून तर या म्हादेवाला नवस बोलतू आन् दर सोमवारचा नारळ बी फोडतू. चांगला जागतीजोत हायन. काय बिशाद, हाय वागटाची, जनावराला धका लावील काय?

राम०:—एकंदरींत हें पुरातन स्थान आहे. पण चंद्रराव, तुझ्याच मुलुखांतलं हें पवित्र स्थान तुला यापूर्वी कांहीं माहीत नव्हतं ना? आणखीही किती तरी अशीं स्थानं असतील पण आधीं बादशाही कामगिरींत तुला या गोष्टींकडे लक्ष द्यायला फुरसद मिळेल, तेव्हां या साऱ्या गोष्टी!

चंद्र०:—माझ्या जीवाची काय ओढ आहे. हें महाराजांना माहीत आहेच. इथं तरी आलों, हा केवळ महाराजांच्याच आग्रहानं. नाहींतर मला नाहीं वाटत मी कधीं काळीं इथं आलों असतों कीं नाहीं तो. पण आतां या स्थानाकडे दुर्लक्ष्य नाहीं करणार मी आत्तांच लागतों त्या तजविजीला. आधीं देवाला कांहीं निवारा करतों. त्याशिवाय मी या भागांतून हालतच नाहीं. येतों मी. या ठिकाणीं कांहीं आसरा केल्याशिवाय मला चैनच पडणार नाहीं. (उभ्या उभ्या वंदन करीत निघून जातो.)

बहि०:—(गेलेल्या चंद्ररावाकडे विषण्ण दृष्टीनें पहात असलेल्या श्रीरामदासांना) बरं क्येलंस जी सोमी. वारापाऊस खात आमचा ह्यो मेरुबा बसलाया वर्सन्‌वर्स कोन पाहतूंया येच्याकड? राज तर राजच काय पुसूं नगा त्येंच्या जीवाची तारंबळ! रातध्याड कापाकापी हायच. कोन कुनाला नो कशापाय नी कुनाकरतां मारतूया दाद न्हाई. कुठं तो अदिलशा नी कुठं ह्ये आमच राज.

राम०:—पण काय रे, अदिलशाहीचा एवढा मोठा अभिमान तुझ्या या राजांना कां बरं वाटतो?

बहि०:—ह्यें मस्नी काय समजतय जी स्वामी! आमच्या राजांस्नी तरी ह्यें ठाव हाय कीं न्हाइ कुनास दखल!

राम०:—तुला कुणाचा अभिमान वाटतो?

बहि०:—ह्यें ध्येस बगा जी सोमी? आमा गुराख्यासनी कसचा नी कुनाचा अभिमान?

राम०:—तरी पण?

बहि०:—मस्नी माज्या शिवा सरजाचा अभिमान लई वाटतूंया. काय करायची आमास्नी ही अदिलशाई नी बेदिलशाई—

राम०:—काय म्हटलंस बेदिलशाई?

बहि०:—सोमीजी मी आपला खेडगळ अडानी मानूस? मी काय-बाय बोलतूंया कशाला घ्येता मनावर तें. ह्यें बगाजी, मी आपनास्नी ह्यें बगा दंडवत घालतूं. मस्नी एवढंच सांगाजी यंदा पाउसकाळ कसा हाय तो. या दुकाळानं तर भंडावलं बगाजी.

राम०:—अरे पण, गुदस्तां पाऊस चांगला पडला होता नाहीं?

बहि०:—होय जी पाऊस चांगला हुता अगदीं चकोट हुता. पुन काळ? काळ कुठं चांगला हुता?

राम०:—तूं काय म्हणतोस तेंच मला समजेना! काळ काय म्हणतोस?

बहि०:—सम्दं चकोट होईल पगा जीन? पुन आमचा मालक कोन? आज जावळीकर येत्याती, उंद्या महाडीक तुडवित्याती, परवा देशमुख उठत्याती, त्येरवा शिर्के शिरंच कापत्याती, आन् ह्ये कमतीच हुतंय या म्हून काय कीं मधनं अदनं सरकारी अरबरोहिल बी धूम करत्याती! आतां हत तो पाऊस काय रडल? ह्ये इक्त काळ लागल हायती आमच्या मागं हात धुवून, यांच्या तडाक्यांत आमी नी आमचा कुळंबावा धड अंगांनीं सुटल तवां कुटं दोन घांस खायला मिळाल तर मिळाल. आम्हास्नी कोनी राजाच न्हाई नी काय करायचं?

राम०:—आणि हे चंद्रराव आहेत —?

बहि०:— तीं मोटीं मानसं; त्येंच्याबद्दल आमी काय बोलावं? एवडं मातुर खरं कीं सोमी, आपुन बी मोठ्यास्नीच भाळता!

राम०:—(कौतुकानें हंसून) काय म्हणतोस!

बहि॰:—खोटं कशाला बोलूं ? अपुनच सांगा जी, इक्ता येळ मी आपल्या पायप उभा आहें, मस्नी काय तरी सांगितलंत का बगा आपुनच बगाजी-- असंच हाय बगा जी सम्दीकडं ! गारिबाली कोन इचारतूंया !

राम॰:—बरं, आतां विचार हं तुला काय विचारायचं तें—

बहि॰:—बगाजी गरीबाचं काय दोरीसूत बोलनं असतया होय ! मी अडानी मानुस. लागेन कांहीं तरी इचारायला नी आपून मातुर हांसाल जालं, नेम काय सांगावा रागावालसुद्धां-

राम॰:--नाहीं, रागावत नाहीं, हांसत नाहीं, कांहींही करीत नाहीं, सांग, खुशाल सांग; बोल, काय बोलायचं असेल ते खुशाल बोल.

बहि॰:--रागावत न्हाई, हांसत न्हाई, ह्यें ब्येस जालं, पुन आपुन ज्ये म्हंगालत कीं ' काय बी करीत न्हाई 'त्ये मातुर वंगाळ जी ! पुना आपुन काईच करनार न्हाई तर बोलूं तरी कशापाय जी ?

राम॰:--गुलामा, तूं मोठा हुषार आहेस. हां, बोल बरं तुला काय पाहिजे तें ?

बहि॰:--आतां बोलाच म्हंगतासा म्हून बोलतूं जी ! मागा म्हंगतासा काय मागूं तरी काय ? अमूक इक्तं असल तर त्या पुडचं मागायचं ना ? पुन बगा जी अगदींच नागड्यानं काय काय म्हून मागावं ? पुन काय व जी सोमी, आमी जे आदिलशाही आदिलशाई म्हून मरतुया त्ये कशापाई ? आमचं आमाला मरावं म्हून कांहीं न्हाईच काय ?

राम॰:—तसं कांहीं आहे ना ?

बहि॰:—कुटलं जी ! काय घेऊन बसलासा ! आडांतन निगाल्यावर देशांतराची वाट ! कुटलं काय नी कुटलं काय !

राम॰:—मग तुझं म्हणणं काय ?

बहि॰:—मस्नी असं वाटतंया, मरायापायीं तरी आमचं असं आमास्नी काय तरी पाह्यज बगा जी !

राम॰:—मग आहेसच तसा तुझा तूं

बहि॰:--न्हाई जी, माजा मी बी न्हाई ! आत्तां आल बादशाच अगर कुना राजाम्हाराजाच, अगर पुंडपाळेगाराच लोक, तर धरतील मला ते येटील. बांधून चार लाथा देऊन नेतील बगा ! अग्दीं खरं बोलतूंया बगा मी ह्यें. मग

सांगा जी माझा मी कुटं आहें त्यो ? त्ये काळ आल तर मस्नी माज्याकरितां-सुद्धां मरूं देनार नाहींत, त्येंच्यापाय मातुर मस्नी खुशाल मारतीला बगा जी—श्रीरामदास हसूं लागतात.) हांसू नका जी ! असंच हाय बगा सम्दं ! मंग सांगा जी आतां दाद तरी कुनाकड मागावी ती ? आमच आमी कंदी राज नव्हतुच व्हय ? ही अदिलशाई नव्हती तवा काय आमचं तळपटच जाल व्हतं व्हय ? आन सांगाजी सोमी, तुमास्नी तरी देवाकडं याची कांहीं दाद लावावी असं न्हाई का वाटत ? व्हय जी, कशापाय ही दाडी नी ह्यें भगवं ? आं ? गरीबाची दाद येवाकड लावावी ल्यें दिलंयसा सोडून आन् लागलायसा या राजलेकांच्या मागं ! अव, ह्ये राज दुसऱ्याच्या घराची शाकारणी करतील, यांना आपलं घर अग्दीं धुळीस मिळालंय ह्यें न्हाई घ्येनांत यायचं !

राम॰:—खरं आहे बाबा तूं म्हणतोस तें.

बहि॰:—मंग येला उपाय काय ? भगवं जालासा त्येंबी येंचीच चाकरी करन्यापायीं ?

राम॰:—चाकरी ?

बहि॰:—मला काय दकल चाकरी कीं नोकरी ती ! या असल्या राजाला परसाद येन्यापाय इतपर्यंत तांगड्या तोडत आलासा ! आन् याला परसाद घेऊन त्याच्या हातनं करनार काय, तर आदिलशाला धादा कुरानिसाद नी घरच्या येवाशीं खुशाल दंगाफिसाद ! बैरागीसाधु व्हावं नी परसाद द्यावा काय तर देवाधरमाला गचांडी ! आमा गरिबास्नी काई द्याल परसाद ? पुन तुमच्या नदरंत आदीं गरीबं भरतील कशाला ? ह्ये बगा जी उगीच चराट कशापाय ? आमचा राजा, म्हनजे, आमच्या धरमाचा, आमच्या धरमाचा अभिमान धरनारा, आमचंच कल्यान पाहनारा, असा कोनी होईल का ?

राम॰:—पण तुम्ही तरी अशा राजाकरितां मराल काय ?

बहि॰:—काय म्हंगता जी ! अव, कुनाच कुनाकरतां मरतुया नी मग आमच्या राजपाय का आमी मरनार न्हाई ? सम्दी रयत बगा अगदीं हैरान होऊनशान गेलीया ! बोला जी, असा कोनी आमचा राजा होईल का ?

राम॰:—मी होईल म्हटलं तर माझ्यावर तरी तुझा विश्वास बसेल का ? मी बोलून चालून तुझ्या दृष्टीनं चंद्ररावाचा नौकरच !

बहि॰:—अडानी मानसासनी असं बोलांत काय पकडता जी ! आपुन आपल्या धर्माचं तरी चाकूर आहोंतच ना ? मंग बोला जी, आपल्या धर्मासाठीं मरणारा, मरतां मरतां सत्रूंसनी मारनारा, आन् असं मारतां मारतां आपलं राज्य करनारा कोनी होईल का ?

राम॰: —या सांबसदाशिवालाच विचार. जगाचं कल्याण करणारे प्रत्यक्ष शंकर इथं जागृत असतां, मला कशाला विचारतोस ? विचार, शंकराला विचार.

बहि॰:—येवा, म्हादेवा, तुज्या धरमासाठीं राज्य करनारा राजा होईल काय ?

शंकराच्या पिंडींतून:—होईल.

बहि॰:—(आनंदातिशयानें) होईल ?

शंकराच्या पिंडींतून:—होईल होईल, होईल,—

बहि॰:—आहा ! येवा, पुन तो कवा बरं, कुटं बरं होईल ?

शंकराच्या पिंडींतून:—तूं ज्याच्यापाशीं आहेस तोच धर्मसंस्थापना करील. माझ्याच नांवानं तो वाढतो आहे.

बहि॰:—(आनंदातिशयानें श्रीरामदासांच्या चरणीं लागून) सोमीजी, सोमीजी, तुमचाच वगाजी हा परसाद. राजा होनार, राजा होनार, आमच शिवबा राजा होनार ! पण जी सोमी, येतोंच मी आतां, सम्द्यांसनी ही लई चकोट बातमी दकल केल्याशिवाय मह्नी चैनच न्हाई बगाजी पडायची. येतुया हां, पायां पडतूंया हां, राजा होनार जी ! आमचा शिवबा राजा होनार जी. येतुंया ह येतुंया हां.

पद २ रें—लावणी.

लइ आनंद हा । शिवराजा पहा ॥ध्रु०॥ आनंद जाला । समद्या
जनाला । जाऊन सांगन, हा हा हा ॥ १ ॥ धर्माचा वाली ।
असल्या दुकालीं । शिवबाच होनार पाहा ॥ २ ॥

('होनार, शिवबा राजा होनार,' करीत आनंदानें निघून जातो.)

राम॰:—(जंगल रस्त्यावर) स्वधर्मसंस्थापना होणार आणि त्यासाठीं स्वराज्यस्थापनाही होणार, इतकंच नव्हे तर हें कार्य करणारा कोणी शिवनामा उत्पन्नही झाला असून तो हातपायही हालवूं लागला आहे, ही ईश्वरी वाणी

ऐकून कोणाला आनंदातिशयाचं भरतं येणार नाहीं ! स्वधर्माची ज्याला चाड आहे असा प्रत्येक माणूस ही प्रसादवाणी कानीं पडतांच देहभान विसरून नाचूं लागल्यास आश्चर्य नाहीं; तीच स्थिति त्या गरीब बिचाऱ्या गुराख्याची झाली. (आठवून) अरे पण तो गेलाच ! (पाहतात) गेला, डोंगरकपाटांत दडून गेला ! तो आतां ज्याला त्याला ही अमृतवाणी सांगून सर्वत्र चैतन्य उत्पन्न करणार ! (विचार) पण मी त्याला त्याचं नांवगांवही विचारून ठेवलं नाहीं आणि त्याच्या त्या शिवबाचाही कांहीं ठावठिकाणा समजून घेतला नाहीं ! (हंसून) या ईश्वरी भविष्यवाणींत सारा भूगोलच आनंदला आहे, तेव्हां तिथं माझी तरी काय कथा ! मलाही विचारपूस करण्याचं भान राह्यलं नाहीं. एकंदरींत शिवबाचं राज्य होणार, सर्वत्र सर्वांचं कल्याण होणार, सर्वत्र शिवमय होणार ! किती प्रकारानं किती दिवस गांजलेली ही धरणी अखेर सुखांत पडणार ! (विचार) ईश्वरी वाणीच ती ! काय पण त्या खेडवळाला आनंद झालाय ! (विचार) पण विचारच केला तर खेडवळ कोण ? चंद्रराव कीं हा गुराखी ? चंद्ररावाला बादशाही कृपेची खैरात पाहिजे. या गुराख्याला स्वतःच्या धर्माचा राजा, स्वतःचा धर्म रक्षण करील असा पाहिजे असून तो त्याच्या कृपेची खैरात अपेक्षीत आहे. चंद्रराव गजान्त लक्ष्मीचा मालक असूनही त्याला आपल्या ऐश्वर्य लक्ष्मीच्या भालपटलावर बादशाही कुंकुम-तिलक असल्याशिवाय चैन पडत नाहीं. खुद्द बादशाहाच्या जनानखान्यांतसुद्धां कुंकवाची उठाठेव कोणी करीत नाहीं हें ठाऊक असतांही बादशाही कुंकूच पाहिजे म्हणणारा चंद्रराव दास्यत्वांतच मरणार हें खचित ! आणि तो गुराखी आज तो नाना तऱ्हेनीं बादशाही दास्यत्वाच्या चरकांत चिरडून पिळून निघत आहे. तरीपण त्याला आपल्या ऐश्वर्यलक्ष्मीच्या कपाळाला स्वधर्मसंस्थापना करील अशा स्वधर्मीय राजाच्याच कुंकवाचा टिळा पाहिजे आहे. केवढं विपरीत दृश्य हें ! (विचार) एकंदरींत आपल्या धोरणाला कांहीं हा चंद्रराव उपयोगी नाहीं येणार. हें तर आतां स्पष्टच झालं आणि हें कार्य कोणी शिवनामा हळु हळू करूंही लागला आहे, शिवाय श्रीरामाची आज्ञा पंचवटीस असतांही झाली आहे. 'उपासनामार्ग जगीं प्रगट करून, हिंदुधर्माची प्रवृत्ति चाले असा योग दक्षिण प्रांतीं जाऊन, शिवाजीस बोध करून लोकस्थितीवर आणावें,' या आज्ञेप्रमाणें पहातां शिवबांनीं तर आपल्या कामाचा हरिः ॐ केलाच आहे.

शिवबा आणि आम्ही एक होण्याच्या योगाची चालना आतां केली पाहिजे.श्रीरामा, तुझी घटना अगम्य आहे. कांहीं दिवस मीं चंद्ररावाच्या भोंवतीं खर्च केले याचा उपयोग मला झाल्याशिवाय राहणार नाहीं.

श्रीरामदासः--

पद ३ रें.

अमुर-कुल-संहार करी जो । विबुध सुखवी द्वापरीं । त्या
दशमुखा शासुनी । बंदीं अमरां सांवरी ॥ध्रु०॥ ब्रीद हें
ब्रह्मांड गाजलें । जें धाकवी अरिकुलें । आर्त भजका वाली
होई । रायरंका स्वीकरी ॥१॥

[जातात.]

प्रवेश दुसरा.

[स्थळः—जावळी प्रांतांतील शिवथर खोऱ्यांतील चंद्रराव मोरे याचा वाडा. चंद्ररावाची थोरली मुलगी पुतळाबाई आणि धाकटा मुलगा कृष्णराव झोंपाळ्यावर बसले असून पुतळाबाई कांहीं गाणें म्हणत आहे.]

पुतळाबाई--

पद ४ थें.

गौरी-रमणा । लाधो । राय चंद्रराणा ॥ यश- कीर्ति-माना
॥ध्रु०॥ हा रणशूर रणसिंह छावा । तळपत समरीं धराया ।
होय धीर कोणा ॥ १ ॥

कृष्णराव—आक्का, आक्का, तुला सांगीन म्हटलं तर राह्यलंच बघ !

पुतळा०:—काय रे आप्पा तें ?

कृष्ण०:—अग आपल्या इथं सध्यां कोण कोण पाहुणे मंडळी आलीत ठाऊक आहे का तुला ?

पुतळा०:— मला कसं बरं समजणार ! नेहमींच येतात तसे आले असतील झालं कोणी तरी !

कृष्ण०:—आक्का, नेहमींसारखं नाहीं बरं ! ते विजापुराहून आलेत ते

ठाऊक आहेत का कोण ते ? अग त बाजी शामराव म्हणे. का आलेत तर म्हणे शिवाजीला पकडायाला ?

पुतळा :—शिवाजीला पकडायाला !

कृष्ण :—होय म्हणे ! आणि ते संभाजी कावजी नी राघोपंत आलेत ना ? ते म्हणे शिवाजीकडन आलेत !

पुतळा :—शिवाजीकडनं आलेत ? अगबाई, मग हे सारे आमच्या इथंच भांडतील कीं ! पण काय रे आप्पा, हे शिवाजीकडचे लोक आलेत ते कुणाला पकडायला आलेत ?

कृष्ण :—काय कीं, तें कांहीं नाहीं मला कळलं. मला वाटतं ते त्या बाजी शामराजांना पकडायाला आले असतील ! पण काय गं आक्का, शिवाजी-लां पकडायचं ना यांना ? तर हे आमच्या इथं ग कशाला आले ?

पुतळा :—हा वेड्या ! आप्पा, एवढं का तुला कळूं नये ? ! अरे, आपले बाबा नी ते आलेत ते–

कृष्ण :—बाजी शामराज—

पुतळा :—कोण असतील ते; हे सगळे मिळून शिवाजीला पकडणार–

कृष्ण :—आपले बाबासुद्धां ? आपले बाबासुद्धां शिवाजीला पकडायाला जाणार ?

बाजी :—(चंद्ररावाचा थोरला मुलगा प्रवेश करून) हो जाणार. आप्प्या, तुला मी कितीदां तरी सांगितलंय कीं तूं त्या हरामजाद्या शिवाजीचं नांवसुद्धां घेत जाऊं नको म्हणून. पण तूं ऐकत नाहींस आं ? आक्का, तुलाही कांहीं समजत नाहीं का ग ? जनांत काय चाललंय याची कल्पना आपल्याला येत नसली तर निदान गप्प तरी बसावं. खरोखरीच मला तरी या पोराची कांहीं धडगत दिसत नाहीं.

पुतळा :—रावसाहेब, आप्पानं काय केलं नी तूं त्याच्यावर कां रागावतोस हेंच मुळीं मला समजत नाहीं.

बाजी :—पण तुम्ही, समजत नाहीं तर, गप्पही बसत नाहीं. तूं आमची अक्का. काय बोलावं तुला. तरी पण या पोराच्या कल्याणाकरतां विचारतों कीं, तूं गप्प बसायला तरी काय घेशील ?

पुतळा•:—खरोखरीच देणार असशील तर बाहेर जगांत काय चाललंय त्याची कल्पना आम्हांला दे. तूंच जर योग्य मार्गावर आम्हांला नेऊन सोडलंस तर आम्ही तरी कशाला कांटाकुट्यांत शिरल्यासारखे कुतर्क करूं?

बाजी•:—पण या उठाठेवीपेक्षां गप्प कां बसानात?

पुतळा•:—आम्ही तरी माणसंच आहोंत ना? दावणीला बांधलेल्या जनावराप्रमाणं रवंथ करीत आंगावर माशांचे थवेचे थवे बसवून घेऊन काळ कंठणं आम्हांला होईल का? आजवर का आम्ही कसली कधीं पंचाईत करीत नव्हतों? आजच तुला इतका हा सोंवळेपणा कुठला आला?

कृष्ण•:—शिवाजीचं नांव काढलं कीं चवताळतातच!

बाजी•:—(रागानें त्याच्या आंगावर चालून जातांना) बघ, बघ, काय बोलला तें—

पुतळा•:—हं, काय हें? हें चवताळणं नव्हे तर काय? आप्पा किती केलं तरी लहानच आहे. त्याच्या बोलण्यावर आपणही चवताळायचं हें मोठेपणाला तरी शोभतं का? (कृष्णरावास) आप्पासाहेब, जा बाळा, तूं जा, बाहेर जाऊन खेळ जा. रावसाहेब म्हणतात ना शिवाजीचं नांव घेत जाऊं नकोस म्हणून? आपलं काय जातं? आपण लहान. ऐकावं मोठीं माणसं काय सांगतील तें. जा, पाहिजे तर आईच्याकडे जाऊन बैस जा.

कृष्ण:•—पण आक्का, शिवाजीचं नांवसुद्धां कां घेऊं नये ग?

पुतळा•:—बाळ मी सांगेन हां तुला कां तें-जा बरं—(तो रुष्ट होऊन गाल फुगवून रावसाहेबाच्याकडे तीक्ष्ण दृष्टीनें पहात निघून जातो.)

बाजी•:—हा पोरटा मला अगदीं आवडत नाहीं.

पुतळा•:—रावसाहेब,—धाकटा भाऊ आहे तो.

बाजी•:—भाऊच काय पण प्रत्यक्ष पोटचा पोर असला तरी काय? नाहीं ते वेडेचार करूं द्यावेत कीं काय? शिवाजीचं नांव घेतो—

पुतळा•:—कां घेऊं नये तें तरी एकदां सांगा बरं. शत्रूचं नांवसुद्धां घेऊं नये? शत्रूच्या नांवाचीही माहिती घ्यायाची नाहीं तर मग त्याचा प्रतिकार तरी कसा करायचा? तुम्ही तरी शिवाजीचं नांव घेतल्याशिवायच का त्याच्या-विरुद्ध मसलती करीत आहां?

बाजी•:—तें नाहीं तुम्हांला कांहीं समजायचं.

पुतळा०:—सांगितल्याशिवायच ! सांगा तरी एकदां; मग नाहींच समजलं तर सोडूनच देऊं हा वाद. हं सांगा बरं एकदां— मी तरी म्हणतें कीं, शिवाजीच्या नांवानं कांहीं अनर्थ व्हायचा नाहीं.

बाजी०:—शहाजी राजे म्हणजे केवढे तोलदार बादशाही मनसबदार. त्यांच्या नांवाला शिवाजीनं बट्टा लावला. शिवाजी निमकहराम बनला.

पुतळा०:—असं त्यानं केलंन् तरी काय ?

बाजी०:—सगळा मावळप्रांत मारला. परवां परवां रोहिड्याचा देशमुख मोडला मुलाणा आमेदला कल्याणांतून हुसकावून देऊन भिवंडी आपल्या हाताखालीं घातली.

पुतळा०:—अगबाई !-

बाजी०:—अदिलशाहीचा तो ताबेदार असतां पुंडावा करून स्वतंत्र होऊं पहातो—

पुतळा०:—खरंच किती पण मोठा अपराध ! पण रावसाहेब, कल्याणच्या सुभेदाराची सून शिवाजीनं आदरानं परत केली, तें कां बरं ? तिची अब्रू त्यानं कां बरं घेतली नाहीं ? या तुमच्या अदिलशाहींत तुमच्या बायका तरी सुरक्षित आहेत काय ? अशी ही तुमची अदिलशाही-तुम्ही एक तिच्या मालकीचं जूं खुशाल सन्मानानं वागवितां, तसंच तें इतरांनींही वागवावं असा तुमचा जुलूम कां बरं ? अदिलशाही तुमची ना ? मग तुमची तिच्यापाशीं जी कांहीं थोडीबहुत किंमत असेल, तिचा कांहीं उपयोग होतो का पहा. प्रजेची नागवण बंद करा. तुम्हीच तर, 'प्रजा हैराण झाली,' असं नेहमीं म्हणता ना ? हैराण झालेल्या प्रजेनं अदिलशाहीचा मुलाजा तरी किती धरावा ? शिवाजी जर या प्रजेची हैराणगत दूर करील तर प्रजा त्यालाच कां दुवा देणार नाहीं बरं ? शिवाजीनं एवढा मोठा मुलूख जिंकला म्हणतां – अदिलशाहीची कंबरबंदी राज्यव्यवस्था असती तर शिवाजीच्या हत्याराला कधीं तरी यश आलं असतं काय ? प्रजा सुखी तर राजा सुखी. उगीच शिवाजीच्या नांवानं कां ओरडतां ?

बाजी०:—पुंडाई करावी- ?

पुतळा०:—पुंडाईला तोड पुंडाईचीच. अदिलशाही प्रजेबरोबर पुंडाईच करते ना ? न्यायनीति कांहीं आहे का ?

बाजी०:—हरामखोर व्हावं ?

पुतळा०:—अदिलशाही प्रजेच्या मिठाला जागत नाहीं तर प्रजा तरी तिच्या मिठाला कां स्मरेल ?

बाजी०:—वाडवडिलांच्या कीर्तीला काळिमा फांसावा— ?

पुतळा०:—हा कालाचा महिमा! तुमच्या वाडवडिलांनीं अदिलशाहीचं यश वाढविलं त्या कालाची बरोबरी हा काल करील काय ? तेव्हां अदिलशाही तुमच्या शब्दाची, तुमच्या मानाची, तुमच्या अब्रूची काळजी प्राणापेक्षांही पलीकडे करीत होती. आतां तसं आहे काय ? शहाजी राजे कोंडले तें माहीत आहे ना ? मुलाचा राग बापावर आणि बाप तरी कोण ? तर प्रत्यक्ष मनसबदार – अदिलशाहीचा जीवंत आधार !

बाजी०:—तें कांहीं असलं तरी शिवाजीचं नांव आप्पासाहेबासारख्या लहान मुलानं घेणं कांहीं हितावह नाहीं.

पुतळा०:—रावसाहेब, किती क्षुल्लक, हलक्या बुद्धीचा झाला आहेस तूं ! शिवाजीचं नांव मुलाबाळांपर्यंत येऊं नये असं वाटत होतं तर तुम्ही अदिलशाहीकरितां तरी त्याच्या जहागिरीबाहेरच त्याला येऊं द्यायचा नव्हता. आतां तर शिवाजी महाडापर्यंत आला आहे. म्हणजे तुमच्या दाराशीं येऊन भिडला आहे. आतां त्याच्या नांवाचा वाराही तुमच्या घरांत शिरूं नये, असं जर तुम्हांला वाटत असेल, तर तें अगदीं निरर्थक आहे. शिवाजीला तुम्ही आडवा म्हणजे त्याचं नांवसुद्धां आपोआप आडलं जाईल. शिवाजीचं नांव घेऊं नका – नांव घेऊं नका – काय म्हणतां ? बांगड्या का भरल्या आहांत? शिवाजीचं नांव न घेण्याचे, नांव घेऊं नका म्हणण्याचे, दिवस गेले. आतां शिवाजीचं नांव तुमच्या घरांत वावरतं आहे, अजून तुम्ही सावध नच व्हाल तर तो स्वतःच आपोआप तुमच्या घरांत शिरेल. मग काय ? नांव घेऊं नका, नांव घेऊं नका म्हणत बायलेपणा करीत बसणार कीं कांहीं हातपाय हालविणार ? काय ?

राव०:—आमच्या हद्दींत त्याचा पाय पडला, कीं आमचा पराक्रम काय आहे तो आम्ही त्याला दाखवूंच.

पुतळा०:—आणि त्याच्या आधीं कांहीं कराल तर ?

बाजी०:—चालला आहे, तोच विचार चालला आहे.

पुतळा०:--म्हणजे! अजून विचारही नाहीं का ठाम ठरला?

बाजी०:—आक्कासाहेब, विचार करणारे राजे आहेत ना?

पुतळा०:—आणि आप्पासाहेबांवर अधिकार गाजविणारे तेवढे तुम्ही वाटतं! शिवाजी म्हणे आपल्या वयाच्या तेराव्या वर्षापासून आपलं तेज दाखवूं लागला. रावसाहेब, तुम्हांला कांहीं तरी कमती आहे का? कां कांहीं करून दाखवीत नाहीं? उगीच शिवाजीचा मत्सर कां करितां? मत्सराग्नि अतिशय वाईट म्हणतात. ज्याचा मत्सर करावा त्याचं तर कांहींच वाईट होत नाहीं पण मत्सर करणाऱ्याच्याच गुणाची उलट तो राखरांगोळी करतो. राजे हा किताब, चंद्रराव ही पदवी, आदिलशाहीनं आपणाला दिली ती का शिवाजीच्या नांवानं उगीच खडे फोडण्याकरितां नी धाकट्या भावाला जरब देण्याकरितां? माझं बोलणं तुम्हांला रुचत नाहीं हें दिसतच आहे.

[चंद्रराव मोरे आणि सगुणाबाई–याची बायको–प्रवेश करितात.]

बाजी०:—(आईबाप येत आहेत हें लक्षांत न येतां) पुरें हो आक्काबाई!

चंद्र०:—अरे, असं झालं तरी काय? रावसाहेब, आक्कावर कां संतापलास?

सगुणा०:—त्याला संतापायला काय कारण लागतं? आप्पासाहेबाला कांहीं बोलला असेल, तें आक्काला खपलं नसेल. दोघांची जुंपली असेल झालं. होय ना आक्का?

चंद्र०:--पण रावसाहेबानं आप्पासाहेबाला कांहींच बोलूं नये हें कसं?

सगुणा०:--चालायचंच हें असं. आप्पासाहेब तरी काय आतां जाणता झालाय कीं त्याचं सगळं करणं अगदीं बिनचूक असावं.

बाजी०:--पण आक्कानं तरी आम्हांला बोलावं, बोलावं म्हणजे किती? हजारदां मीं सांगितलंय कीं तूं त्या शिवाजीचं नांव आप्पासाहेबाच्या देखत तरी काढूं नकोस म्हणून. हिला पाहिजे असेल तर बसेना करीत त्याच्या नांवाचा वाटेल तितका जप; पण आप्पासाहेबाला आणखी त्याचा बिटाळ नको. पण ही कुठं ऐकते. पहावं तेव्हां शिवाजी शिवाजी—

पुतळा०:—अगदीं हें कुभांड आहे.

चंद्र०:--तरी पण आक्का, तुला थोडी जास्त पंचाईत करावीशी वाटतेच.

सगुणा०:—कसली जास्त पंचाईत ? शिवाजीबद्दल जिकडे तिकडे आतां चर्चा चालली आहे, मग ती आपल्या घरांत तरी मुलाबाळांपर्यंत पोहूं नये म्हटलं तर चालेल तरी कसं ?

बाजी०:—पण त्याचा मोठेपणा, त्याची कर्तबगारी, त्याची मुलुखगिरी,–

पुतळा०:—रावसाहेब, खरं खरं बोला हं ! कधीं हो मी शिवाजीची कर्तबगारी नी मुलुखगिरी कुणाला बरं सांगितली ? शिवाजीचं नांव घेतल्या-बरोबर आप्पासाहेबाच्या आंगावर चवताळून धांवलात तें सांगा कीं. तो तुमचा पराक्रम शिवाजीलासुद्धां लाजवील! चालले आपले खोटं खोटं वाटेल तें बोलायला ? बाबासारख्या वाघाच्या पोटीं आलांत, तर कांहीं नांव करा कीं. तो म्हणे शिवाजीचंच नांव घेतो. माझ्यासारखीं कांकणं तरी भरा. आज एवढा शिवाजी ज्याच्या त्याच्या तोंडीं झाला आहे, तो घरच्या चुलीपाशीं रहून वाटतं ? मला वाटलं होतं कीं, रायगडाच्या किल्ल्यांतून रावसाहेब शिवाजीला पकडून आणतील; पण रावसाहेबांना आप्पासाहेबाचं तोंड बंद करण्यापुढं फुर-सत तरी कुठं आहे !

बाजी०:—ही पाहिलंत, ही अशी माझा पाणउतारा करते. तुमच्या देखत करते.

पुतळा०:—माझा भाऊ, माझा रावसाहेब, तलवार मारून येऊं दे, कीं पहा, मीच त्याची कशी कुरवंडी करतें ती. पुरुषांनीं पुरुषासारखं वागावं.

चंद्र०:—पाहिलंस आक्का त्याला कशी फाडफाड बोलते ती ?

सगुणा०:—यांत ती काय वावगं बोलते ? तेराव्या वर्षापासून शिवाजी मुलुखगिरी करूं लागला ना ?

बाजी०:—मग तुमचं म्हणणं काय ?

पुतळा०:—पुरुषार्थ गाजवावा.

बाजी०:—तुम्ही काय बायकार्थ गाजवता ठाऊक आहे—

पुतळा०:—समजला–समजला सगळा प्रताप. रडत राऊत घोड्यावर तरी बसला पाहिजे !

सगुणा०:—इतकं बोललं तरी कांहीं आहे का त्याला ? हा सारा लाडाचा परिणाम—

चंद्र०:—आणि आक्का बोलते ती ? ते कोणाचे लाड ?

सगुणाः—तिचं म्हणणं अगदीं बरोब्बर आहे. रावसाहेबानं आतां कांहीं तरी नांव करायला नको काय ?

चंद्रः—रावसाहेबानंच काय–आक्कासाहेबानंही नांव करण्याचाच हा काल आहे. रावसाहेबाला तुम्ही शिवाजीचा दाखला देता ना ? मग आक्कासाहेबाला सईबाईचा कां देत नाहीं ? फुकटची बडबड काय, कोणीही करील !

पुतळाः—उगीच कांहीं हिणवायला नको बरं. बाबा, प्रसंग येऊं नये, आलाच तर दाखवूं आम्ही कोण आहोंत त्या––

रावः––ठाऊक आहा–कोण त्या– ! निवडुंगाच्या फड्यांत सांपडलेल्या–

सगुणाः—रावसाहेब, किती रे चहाटळ आहेस तूं– ? हा आतां दिग्विजय करणार ! बाळाचे पाय पाळण्यांतच दिसताहेत !

पुतळाः—मी निवडुंगांत सांपडो नाहीं तर नदींत सांपडो. आई, बाबा, माझ्या जन्माच्या स्थितीवर तुम्हीं पांघरूण घातलंत तें रावसाहेब आतां घडींघडीं काढूं पहाणार. यापेक्षां मी आडविहीर जवळ केलेली काय वाईट ?

सगुणाः—उगीच वेळ ना वारीं कांहीं बोलूं नये.

चंद्रः—तें सारं खरं–पण या दोघांचं भांडण कसं मिटणार ?

सगुणाः—रावसाहेबाला बाहेरची कामगिरी भरपूर द्यावी, मग कसा येतोय तो इकडे ! अशी कामगिरी द्यावी कीं, त्याला जेवायलादिखील फुरसत सांपडूं नये.

रावः—तुम्ही द्याल पुष्कळ–पण मी करणारा पाहिजे ना ?

सगुणाः—अहा रे अहा ! दिवे ओवाळा दिवे—

पुतळाः—याच्या याच स्वभावाचा मला राग येतो. सध्यां पहावं तर जो तो नांव मिळवतो आहे. रावसाहेबानं कांहीं करावं असं आम्हांला तरी कां वाटूं नये ? मला वाटतं या अशा धामधुमीच्या काळांत आपणसुद्धां कांहीं करून दाखवावं !

रावः—हातांत बांगड्या आहेत त्या पहा आधीं––

पुतळाः—त्या तुझ्यासारख्याला भरण्याकरितां मुद्दाम मी माझ्याजवळ ठेवल्या आहेत समजलास ?

चंद्रः—हां–काय ग आक्का हें ?

सगुणा०:—छान, छान केलंस आक्का. पण त्याचं कांहीं आहे का बघ त्याला !

चंद्र०:—अशानं मी खरोखरच आक्का, तुला घरांतनं हांकून देईन. तूं कांहीं आमची नव्हेस, हें माहीतच आहे तुला––

सगुणा०:—असं जेव्हां तेव्हां तिला बोलायला—आधीं तिला जवळ केलीत तरी कशाला ? (पुतळाबाईला लाडानें जवळ घेते.)

चंद्र०:—ही पुढं असे गुण उधळील याचं काय आम्हांला स्वप्न पडलं होतं ? वाटेल तशी बेजबाब बोलते म्हणजे काय ? रावसाहेब कोण, आपण कोण, कांहीं तरी इनं विचार नको का करायला ? अशा इच्या वागणुकीनं घरांतलीं भांडणंच कधीं संपायचीं नाहींत. (इतक्यांत चंद्ररावाच्या येथें स्वैपाकी म्हणून राहिलेला बहिरजी प्रवासी वेषांत प्रवेश करतो.) का, निघालास ? लवकरच ये.

बहिरजी:—मला तरी जास्त दिवस राह्याला तिथं आतां काय आहे ? शिवाजीच्या लोकांनीं सारा गांव जाळला त्यांत माझीच झोंपडी कशाला राहतीय ? पण वाडवडिलांचा जागा–जीव कुठं चैन पडूं देतोय ? काय काय झालंय पाहून येतों झालं.

बाजी०:—शिवाजीच्या लोकांनीं जीवंत सोडलं तर ना !


बहि०:—काय होनार तें काय समजतय ? असंच कोल्ह्याकुत्र्याचं मरन असलंच प्रालब्दामंदी तर तें काय चुकतंय ? मारामारींत कोन मरलं कोन जगलं एकवार पाहून येतों झालं. जगून वांचून आलों तर दोन घांस खाईनच आपल्या इथल–

चंद्र०:—बरं जा तर ! ये मात्र परत ! येतांना शिवाजीची कांहीं बातमी निघाली तर पहा.

बहि०:—मला सोंवळकराला तें काम कसचं साधतंय ! जीव घेऊन परत आलों म्हणजे मिळविलं. आपल्या पायाच्या पुन्याईनं एवडा जीव जगला म्हनजे पुरं. येतों जी, सरकार येतों. (सर्वांचा निरोप घेऊन जातो.)

सगुणा०:—कामाधामाला बरा होता. नवीनच आला होता तरी कांहीं अडाणीपणा केला नाहीं.

चंद्र०:—पण तेवढ्याच किंमतीचा. बातमी कांहीं घेऊन ये म्हटलं तर



सगुणाबाई:—आधीं तिला जवळ केलीत तरी कशाला? [अंक १ –प्रवेश २—पृष्ठ २०.

नाहीं म्हणाला ! आतांशा बातम्या काढणारेसुद्धां मिळेनासे झाले. इतका प्रयत्न करतों आहें; पण शिवाजीकडची आंतली म्हणून कांहीं बातमी निघेना. काय करावं या काळजींत—

पुतळाः—यांत ती काळजी कसली ? शिवाजी कांहीं दुसऱ्यावरच विसंबत नाहीं, स्वतःसुद्धां बातमी काढायला जातो. तो तसाच हरहुन्नरी आहे, म्हणूनच त्याचे लोक त्याचं वाटेल तसलं काम करतात. रावसाहेबानं असं कां करूं नये ? कां जाऊं नये यानं स्वतः शिवाजीचा भेद घ्यायला ? साहसाशिवाय का कांहीं नांव होतं ?

चंद्रः०—अरे बाप रे ! अरे ही तर रावसाहेबाला अगदीं कस्पटच मानते.

पुतळा०ः—घोडा आपल्या गुणावरच दाणा खातो—

बाजी०ः—तोंड आटप—

सगुणा०ः—पुरे बाबा, तुझा पराक्रम समजला.

बाजी०ः—आमचं एक राहूं द्या. ही एवढी बोलती आहे जीभ लांब करून–ही काय करते तें तरी पाहूं दे.

सगुणा०ः—अरे ती तर बोलून चालून बायकोच आहे !

बाजी०ः—आणि चुरुचुरु चुरुचुरू करते ती ?

सगुणा०ः—तें तुझ्याकरितां. तूं कांहीं करावंस म्हणून—

चंद्र०ः—पण एकंदरींत मला या पोरीचं लक्षण कांहीं धड दिसत नाहीं.

पुतळा०ः—उगीच तुम्ही तरी त्रास कां घेतां ? आजवर तुमच्या सांवलीखालीं मी वाढलें. आतां मी जाणती झालें आहें. तुम्हांलाही माझा कंटाळा आला आहे.

सगुणा०ः—असं कांहीं म्हणूं नये ग बाळ—

चंद्र०ः—बोलूं दे–बोलूं दे–काय करते, म्हणते तें तरी ऐकूं दे.

बाजी०ः—ती शिवाजी होणार आहे—

पुतळा०ः—अरे हो–शिवाजी शिवाजी म्हणजे काय ? कांहीं आभाळांतून पडला नाहीं.–त्यालाही मी थक्क करीन. उगीच बडबड कशाला ? हा आतां सोंवळेकरी गेलाय ना महाडाकडे हा तरी शिवाजीचाच हेर तुमच्या घरांत घुसला नसेल कशावरून ? मी काढतें त्याचा तपास.

बाजी०ः—कोण तूं ?

पुतळा०:—होय मी. मला म्हणजे तूं कोण समजतोस? मोरे चंद्रराव राजे यांच्या अन्नावर मी वाढलें आहें. या आईचं, या सगुणाबाईचं, या वाघिणीचं दूध मी प्यालें आहें. मी कोणाचीही मुलगी असो. पण माझा देह या जावळीकरांच्या अन्नावर, तरवारीच्या धारेवर राखलेल्या या जिवंत अन्नावर पोसला आहे. तुला माकडाला काय ठाऊक या अन्नाची काय किंमत आहे ती? असेल तुझ्यांत कांहीं पाणी तर या उभयतां दैवतासमोर बोल कोणती धाडसाची कामगिरी करतोस ती. मी तर पुन्हां सांगतें कीं, हा सोळेकरी कोण याची तर मी तपास काढतेंच पण बाबांना काळजी पडली आहे ती शिवाजीच्या अंतरंगांतली बातमीही मी काढतें. बोल तूं काय करतोस तें?

बाजी०:—शिवाजीच्या अंतरंगांतली बातमी काढायला जा आणि तिथं त्याचीच बिब्बी होऊन बसा झालं!

पुतळा०:—परस्त्रीच्या अब्रूला धक्का लावायच्या कुबुद्धीचा शिवाजीला स्वतःला तर स्पर्शही नाहीं. इतकंच नव्हे, तर तशा तऱ्हेच्या पोटदुखीवर त्यानं स्वतःच्या राज्यांत चांगलाच बिब्बा घातला आहे. बिब्बी होण्याची भीति शिवाजीच्या राज्यांत शत्रूकडल्या पुरुषांना मात्र आहे. शत्रूंच्या बायका त्याच्या राज्यांत स्वतःच्या मुलुखांतल्या पेक्षांही निर्भय आहेत, याची तुम्हांला माहिती नाहीं काय? मी बिब्बी होईन कीं नाहीं याची तुम्हांला काळजी कशाला? बिब्बीच झालें समजा, तर तुमच्या इथली एक ब्याद गेल्यासारखंच होईल. भेद काढण्याच्या कामांत उमगलें गेलें तर तात्काल देहांत प्रायःश्चित्त मिळणारच. बरं कार्य साधूनच आलें तर मी माझ्या दुधाला जागलें, अन्नाला स्मरलें, असं होऊन बाबांना सैन्याच्या हालचाली करायला अगर इतर मसलती करायला उपयोगी पडेन. कांहीं होवो, मला या कामांत अपेश आलं तरी फायदाच आहे, यश आलं तरी फायदाच आहे. माझी तूं काळजी करूं नकोस. तूं काय करणार बोल. पुरुषासारखा पुरुष आहेस. बोल काय करणार तें?

बाजी०:—तुझ्या प्रत्येक कामांत मी तुला अडथळा आणीन. तुझा भेद शत्रूला देऊन त्यांनीं तुला सुळावर दिलेलं मी पाहीन. चल कबूल आहे? बोल, कबूल आहे?—

पुतळा०:—अरे हो, कबूल आहे, कबूल आहे, काय विचारतोस? होय, आहे कबूल! एकाच आईचं दूध आपण प्यालों—पण तुला बुद्धि काय झाली

तर मला फजीत करण्याची, म्हणजे शत्रूला मदत करण्याची, म्हणजे आपल्याच अन्नाला फितूर होण्याची, आपल्याच आईबापावर उठण्याची, आपल्याच घराला अग्नि लावण्याची ! चल, इतःपर तुझं मला दर्शन नको. आई, बाबा, द्या, मला, या आपणच वाढविलेल्या, लहानाची मोठी केलेल्या पोरक्या पोरीला आतां निरोप द्या. माझी तुम्ही बिलकूल काळजी करूं नका. शिवाजीच्या मुलखांत जाईपर्यंतच काय ती धास्ती. एकदां शिवाजीच्या हद्दींत गेलें कीं, स्त्रीजातीला कलंक लागेल असं कांहीं एक होणार नाहीं. बाबांना हें पटणार नाहीं, पण शिवाजी बळावला तो या असल्याच सद्गुणांच्या जोरावर. त्या तसल्या थोरणी पुरुषाचा भेद काढून मी तुम्हांला बातमी देणार आणि हा माझा भाऊ या माझ्या कार्यांत मला अडचणी आणणार—

बाजी०:—नव्हे तुला तोडलेली पहाणार–बेजबाब तोंड टाकतेस नाहीं?—

पुतळा०:—मला आपला आशीर्वाद द्या. मला मरणाची मुळींच भीति नाहीं, बेअब्रूची शंका नाहीं, आपल्या आशीर्वादाच्या जोरावर मी शिवाजीसारख्याचा भेद करून येतें आणि, आणि–पण जाऊं द्या. माझ्या थोर कामगिरीपुढं मला या कस्पटाचं कांहींच वाटत नाहीं येतें मी–येतें मी–(ती जात असतां चंद्रराव गंभीरपणें तिच्याकडे व बाजीरावाकडे पहात उभा रहातो.)

सगुणा०:—थांब, थांब आक्का, (म्हणून जात असतां बाजीरावाकडे वळून) घे थोडी तरी अक्कल घे. कशाला मिशा बाळगल्या आहेस त्या ! (जाते.)

बाजी०:—बस्स ! बाबा, मलाही परवानगी द्या. या मायलेकींच्या डोळयांत चांगलं अंजन घालीन, तेव्हांच आपल्या भेटीला येईन. (दुसऱ्या बाजूनें निघून जातो.)

चंद्र०:—आं ! रावसाहेब ! अरे, थोडा थांब तरी !–(जातो.)

—(पडदा)—

अंक पहिला समाप्त.

अंक दुसरा.

प्रवेश पहिला.

स्थळः--सातारा पंढरपूर मार्ग-विशेषतः कोयना खोऱ्यांतला.

[पंढरपूरच्या यात्रेकरूंची एक दिंडी रस्त्यानें येऊन वाटेंतल्या औदुंबराच्या वृक्षापुढें भजन करीत असतां तिच्या ऐन रंगांत मुसलमान वेषधारी हिंदु लुटारू येऊन त्यांच्यावर हल्ला करतात, यात्रेकरूंची दैना होत असतां श्रीशिवाजीमहाराज संभाजी कावजी, राघो बल्लाळ अत्रे वगैरे प्रमुख तरवार-बहाद्दरासह येऊन लुटारूंना शासन करून यात्रेकरूंना संकटमुक्त करितात.]

श्रीशिवाजीः--धरा, पकडा, या हरामखोरांना. खबरदार, कोणी पळून जाऊं पहाल तर. गरीब, निःशस्त्र लोकांवर हात टाकता, तुम्हांला योग्य शासनच दिलं पाहिजे. तुम्ही जातीनं मुसलमान आहांत, सध्यां या प्रांतावर मालकी आदिलशाहीची आहे, म्हणजे मुसलमानांची, तुमच्या जातीची, किंबहुना तुमचीच मालकी असतां, स्वतःच्याच मुलुखांत अशी धूम माजविता ? आदिलशाहीचा जो धर्म तोच तुमचा धर्म, आदिलशाहीची जी जात तीच तुमची जात, आदिलशाही तर या प्रांतावरची सत्ताधारी, तुमच्या धर्माच्या आणि तुमच्या जातीच्या आदिलशाहीच्या राज्यकारभाराला या तुमच्या पुंडाईनं स्वस्थता तरी कशी मिळेल आणि राज्यकर्त्यांच्याच जातीचे लोक आपणाला छळतात हें पाहून प्रजा तरी तुमच्या त्या आदिलशाहीबद्दल राजी कशी राहील ? तिचा दुवा तिला कसा मिळेल ? आणि ज्या राज्यांत प्रजा राजाला दुवा देत नाहीं, तें राज्य तरी चिरस्थायी कसं होईल ?

संभाजी कावजीः—(एकाची दाढी उपटून) पण सरकार, हा पाहिलात का कोण आहे तो ! हा दाढीशिवायच मुसलमान आहे !

बहि०ः--(मुसलमानी वेष फेंकून देऊन) आणि हे सारे तरी कोण- ? सरकार, हा आपला बहिरजी. (वंदन करतो.)

शिवाजीः--बहिरजी, तुझे ते बाजी शामराज ? त्यांचीच ही टोळी वाटतं- ?!

संभाजी कावजी:--मग यांत बाजी शामराजही असतीलच ?

राघो बल्लाळ:--बाजी शामराज यांची जात कोणती ?

बहि०:--(बाजी शामराज यांची दाढी उपटून आणि पुढें ढकलून) ही पहा कोणती ती ? जातगोत ओळखण्याची यांना जरूर काय म्हणून ?

शिवाजी:--(यात्रेकरूंना) लोक हो, श्रीपंढरीच्या वाऱ्या करून श्रीविठ्ठलरूप झालेल्या तुम्हां सज्जनांना हा पामर शिवाजी वंदन करतों आहें, याचा स्वीकार करा. (' शिवाजी ' हें नांव ऐकतांच कांहीं यात्रेकरू ' कोण शिवाजी ! ' म्हणून उद्गारून घाबरतात, आणि कांहीं ' तर मग आम्ही आगींतून सुटून फुपाट्यांतच पडलें म्हणायचे ! ' असें म्हणून ' विठ्ठला, विठ्ठला, तूंच आतां आमचं रक्षण कर, ' असें आर्त स्वरानें ओरडूं लागतात.) बाबांनों, असे घाबरूं नका. सज्जनांचा हा शिवाजी दास आहे. गरीबांचा पाठीराखा आहे. तुम्ही अगदीं निर्धास्त असा.

कांहीं यात्रेकरू:--शिवाजी लुटारू आहे, प्रजेची नागवण करतो, अशी जी आवाई आम्ही ऐकतों, ती खोटीच म्हणायची !

शिवाजी:—आतां लुटारू कोण हें तुमचं तुम्हीच ठरवा. हे पहा बाजी शामराज, हे कोणत्या जातीचे आहेत तें मग पाहूं.

एक तरुण यात्रेकरू:—यानंच, यानंच पहा हो मला हा केवढा तडाका मारलान्, हातच लुला पडलाय पहा !

शिवाजी:--श्रीविठ्ठलाच्या दरबारांत याची नोंद झालीच आहे. बाबांनो, हे बाजी शामराज, विजापूरच्या बादशाहीचे, तुमच्यावर राज्य करणाऱ्या त्या अदिलशाहीचे, विश्वासू सरदार आहेत. तुम्हांवर कृपेची सांवली करण्याचं सोडून देऊन संकटांचा उन्हाळा करणारे हे आदिलशाहीचे लोक. मेंढराच्या कळपावर बेधडक उड्या घेणाऱ्या दुष्ट वाघाप्रमाणेंच हेही तुम्हांवर घाला घालतात. तुम्हांला लुटतात, बेदम मारतात, असेल नसेल तें लुबाडून घेऊन जिवानिशीं तरी सोडतात का ? छेः ! तितकी तरी दया यांच्या पाषाण-हृदयांत कुठची असणार ? एखाद्याला कंठस्नान घालणं म्हणजे यांना तें कांहींच वाटत नाहीं. लुटारू हे, अदिलशाहीचे नोकर; आदिलशाहीच्या बड्या बड्या पदव्या आणि पगार उपटणारे हे प्रतिष्ठित पुंड. तुम्हां गरीबांना, तुम्हां लाचार रयतेला, लुटतात, हैराण करतात, नागवतात, हेच लोक. हे, हे, अदिलशाही-

चेच लोक. हे तुमच्या सरकारचेच लोक. आणि तुम्ही मात्र मला लुटारू म्हणता–नव्हे, माझं नांव ऐकल्याबरोबर तोंडांतून फेंस टाकता. आतां या तुमच्या अडाणीपणाला काय म्हणावं ? !

एक तरुण यात्रेकरूः—आम्हांला तरी काय ठाऊक–सगळेच म्हणतात शिवाजी लुटारू आम्हीही तेंच म्हणतों.

शिवाजीः—पण खरे लुटारू कोण आहेत, हें आतां तरी तुम्हांला समजलं ना ? आदिलशाहीसुद्धां खरं म्हटलं तर खरी लुटारू नव्हे. अदिलशाहीचे हे छोटेबडे नौकर, हे सरदार हे पाच्छाही मनसबदार, हे देशमुख देशपांडे, हे देशकुलकर्णी नाडगौडे, हे वतनी पाटील, हे सगळे आदिलशाहीचे लहान मोठे नौकर, खुशाल तुम्हांला, तुम्हां प्रजेला, यथेच्छ बुचाडीत आहेत. अदिलशहाला या लूटमारीची खबरही नसते. हे सारे बादशाही लुटारू, हे सारे सरकारी नौकर, तुमच्या राशीला रात्रंदिवस हात धुवून लागले आहेत. तुमच्या गांठीला हे पैका राहूं देत नाहींत–तुम्हांला हे धड दोन घांस खाऊं देत नाहींत. आणि शिवाजी लुटारू म्हणून पुनः यांच्या या चोरांच्या उलट्या बोंबा आहेतच. मी आणि माझे लोक तुम्हांकरतां या अदिलशाहीशीं–या आदिलशाहीच्या नौकराशीं–भांडतों आहों. माझा खरा हेतु काय आहे, हेंसुद्धां हे अदिलशाहीचे नौकर तुम्हांला कळूं देत नाहींत. माझ्याबद्दल तुमच्या मनांत गैरसमज उत्पन्न करून हे तुमचा माझा मिलाफ होऊं नये, असा भगीरथ प्रयत्न करीत आहेत. एकीकडे हें माझ्यावरही संकटें आणून माझ्या कार्याला अडथळा आणूं पाहतात, आणि एकीकडे हे माझ्या नांवाखालीं तुम्हांवर दरवडे घालून स्वतःची तुंबडी भरतातच पण जास्तींत जास्त अनर्थाची गोष्ट अशी करतात कीं, माझ्या भीतीचं भूत तुमच्यापुढं नाचवून तुम्हांला माझ्याकडे येण्याची इच्छाच आधीं होऊं देत नाहींत.

एक तरुण यात्रेकरूः—आम्हां गरीब यात्रेकरूंच्या संकटाला धांवलास, बाबा, परमेश्वर तुझं कल्याण करो.

शिवाजीः—तुमच्याच या पवित्र आशीर्वादाच्या जोरावर माझं स्वधर्मसंस्थापनेचं कार्य तडीस जाईल असा माझा पूर्ण भरंवसा आहे.

एक तरुण यात्रेकरूः—आमच्या धर्माचा सध्यां वाली कोणीच नाहीं, हें तर दिसतंच आहे !

शिवाजी:—कां बरं? मी आहें ना? मी आपल्या धर्माचाच काय पण सर्व रयतेचा वाली आहे. मी सनातन धर्माच्या उद्धारार्थ रणयज्ञाचं कंकण बांधलं आहे, तरी माझ्या या स्वराज्यछत्राखालीं रामरहिम दोघंही आनंदानं, एकदिलानं, सलोख्यानंच राहतील. माझ्या स्वराज्यांत हिंदु मुसलमानावर दांत खाणार नाहीं किंवा मुसलमान हिंदूवर ओंठ चावणार नाहीं. माझ्या राज्याची, माझ्या हातून उभारल्या जाणाऱ्या हिंदूपद पादशाहीची रूपरेखा कशी असेल याची कल्पना तुम्हांला यायचीच तर हे पहा, बादशाही सत्तेला झुगारून देऊन माझ्या झेंड्याखालीं आलेल्या कित्येक मुसलमान धारकऱ्यांचे सरदार, राघोबल्लाळअत्रे हे राघो बल्लाळ जातीनं ब्राह्मण असोन, यांचे हाताखालचें सर्व लष्कर मुसलमानांचें आहे. हे मुसलमान लढवय्ये तरी थोडेथोडके आहेत काय? एकजात सातशें मुसलमान आज या हिंदुपदपादशाहीकरितां माझ्या बाजूनं अदिलशाहीबरोबर झगडत आहे.

एक तरुण यात्रेकरू:—पण हें आम्हांला कांहींच ठाऊक नाहीं!

शिवाजी:—तुम्हांलाच काय पण तुमच्या बायकामुलांना सुद्धां—

एक तरुण यात्रेकरू:—बायकामुलांनासुद्धां माहीत नाहीं.

शिवाजी:—शिवाजी बंडखोर, शिवाजी लुटारू, शिवाजी दगेबाज, शिवाजी बेमान, हें तरी तुम्हांला माहीत अहे ना? हें असलंच पाहिजे तुम्हांला माहीत? (तो माननें 'होय' असें दाखवितो.) आणखीही एक तुम्हीं ऐकलं असेल?

एक तरुण यात्रेकरू:—काय बरं?

शिवाजी:—कीं मी मुसलमानीधर्माचा द्वेष करतों म्हणून! मुसलमानी धर्माचा उच्छेद करावा, मुसलमानांचा धुव्वा उडवावा, मुसलमानांचा बींमोड करावा, यासाठीं मीं दंगाफिसाद मांडला आहे, असं तुम्हांला समजलं आहे कीं नाहीं?

एक तरुण यात्रेकरू:—पण यांत तर आम्हांला उलटा संतोषच वाटतो. आज या मुसलमानी राज्यांत हिंदुधर्माची काय दुर्दशा झाली आहे! अशा स्थितींत त्या धर्मालाच बुडवील असा कोणी अवतरेल तर पाहिजेच आहे. मुसलमानी राज्यांत हिंदुधर्माची पायमल्ली आतां किती व्हावयाची?

शिवाजी:—पण ही पायमल्ली कोण करतात? हे बाजीशामराजा-

सारखे हिंदूच ना? अदिलशाहीनं हिंदुधर्माचं काय नुकसान केलं आहे? देवस्थानचीं उत्पन्नं काढून घेतलीं आहेत काय? अदिलशाहीचे हिंदू कामगार हिंदूंच्या धर्माला उकिरड्यावर ओढतात, मग मुसलमान कामगारांनीं मूर्तिभंगादि कृत्यं केलीं तर त्यांना कां दोष द्यावा? हिंदुधर्माचे काळ हिंदूच आहेत. तुम्हीच तुमच्या धर्माचं वाटोळं करायला निघालांत, तर त्यांत अदिलशाहीचं काय जातं? उगीच कां अदिलशाहीच्या नांवानं, हांका मारतां?

एक तरुण यात्रेकरूः—मग एकंदरींत आमचं नुकसान आम्हीच करून घेत आहोंत म्हणायचे! हेंसुद्धां ज्ञान आम्हांला अजूनही नाहीं! किती घोर अज्ञान हें आमचं! मग तर हिंदुधर्मसंस्थापना करतांना आपल्या मनांत अदिलशाहीचा अगर मुसलमानी धर्माचा द्वेष बिलकूल नाहीं म्हणायचा!

शिवाजीः—माझं कार्य पवित्र आहे. दीनोद्धार हा माझा मूळ हेतु आहे. या हेतूचा प्रारंभ द्वेषमूलक नाहीं. पवित्र कार्याचा मूळारंभ पवित्र हेतूपासूनच असतो. मला दीनोद्धार करायचा आहे. अदिलशाहीच्या कारभाराचा एकंदरींत वाईट परिणाम हिंदूधर्मीयांवर झाला आहे. प्रजा या नात्यानं त्यांत मुसलमानही येतातच. माझा धर्म फारच व्यापक आहे. तो अकुंचित नाहीं. अर्थात् त्याच्या पायांत द्वेषमूलक असा यत्किंचितही मालमसाला नाहींच नाहीं. मी पुनः तुम्हां लोकांना बजावून सांगतों कीं, माझा झगडा मुसलमानी धर्माशीं नाहीं. मुसलमान जातीशीं नाहीं. अदिलशाहीच्या जागीं खुद्द विजयनगरकर हिंदु असते, अगर कोणी दुसरे जातवाले अथवा धर्मवाले असते, आणि त्यांच्या अमदानींत सध्यां आहे असाच जुलमी प्रकार असता, तर मी त्यांच्याशींही झगडलोंच असतों. माझा झगडा जुलमी राज्यपद्धतीबरोबर आहे. कोणत्याही जातीशीं अगर धर्माशीं नाहीं. मुसलमान मला हिंदु इतकेच जवळ आहेत. ते माझ्याच महाराष्ट्रांत रहातात. ते माझेच बांधव आहेत. मी त्यांना परकी नाहीं आणि तेही मला परकी नाहींत. अशा उच्च मनोवृत्तीवर मी माझं कार्य उभारलं आहे. माझ्याबद्दल गैरसमज उत्पन्न करून अदिलशाहीच्या या नौकरांनीं सामान्य लोकांना माझ्यापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न आजवर चालविला—

एक तरुण यात्रेकरूः—पण तो यापुढं आतां बंदच पडणार. आतां हे पंढरपुरचे यात्रेकरू श्रीपंढरीक्षेत्राला जातील आणि श्रीविठ्ठलचरणाचं दर्शन घेण्याकरितां जमलेल्या हजारों लाखों वारकऱ्यांना श्रीचंद्रभागेच्या वाळुवंटावर

आपला हा आत्तांचा अनुभव जाहीर करतील. श्रीविठोबाच्या चरणीं सर्व जात सारखीच आहे. तिथं शेखमहंमद दामाजीपंताचे गळ्याला खुशाल मिठी घालतो आणि गोरा कुंभार एकनाथाच्या ढेऱ्याला शिवून पाणी पितो. चोखामेळयाच्या पंक्तीला नरसीमेहता बसतो आणि सजनकसायाच्या हातचं पाणी ज्ञानदेव घटाघट पितो. अशा त्या क्षेत्रांत, वाळुवंटी चंद्रभागेच्या कांठीं, श्रीशिवाजीमहाराज, तुमच्या या पवित्र कार्याचा डंका हे श्रीविठ्ठलाचे भक्त दणकावतील. आतां अदिलशाहीच्या नौकरांची सद्दी संपली. दिशाभूल करण्याचे त्यांचे प्रयत्न आतां त्यांच्याच आंगावर उलटतील, आणि शेवटीं श्रीशिवराय तुमच्याच चरणापाशीं त्यांना आश्रयाची याचना करावी लागेल.

सर्व यात्रेकरू:—आहा—असंच होईल—असंच होईल.

शिवाजी:—मी तुम्हां संतसज्जनांचा दास आहें. (सर्वांना साष्टांग नमस्कार करतात. सर्व यात्रेकरू 'कल्याण' 'कल्याण' म्हणून पुंडलिकवरदा हरिविठ्ठल असा शब्दगजर करतात व भजन करीत जातात. तरुण यात्रेकरू त्या यात्रेकरूंबरोबर जात नाहीं हें पाहून) कां बाबा, तूं कां जात नाहींस? जा तुझे ते सोबती गेले ना?

तरुण यात्रेकरू:—पंढरीच्या वाऱ्या करण्याचं कारण आतां कांहीं मला दिसत नाहीं. माझा विठोबा मला इथंच भेटला.

शिवाजी:—काय, तुझ्या मनांत काय आहे बरं?

तरुण यात्रेकरू:—ज्याकरितां मीं घरदार सोडलं तें कार्य करण्याची योग्य जागा मला मिळाली. पंढरीच्या वाऱ्या करून जें साधायचं तेंच आपल्याबरोबर राहूनही साधेल.

शिवाजी:—पण आमचा हा धारकरी पंथ आहे.

तरुण यात्रेकरू:—वारकरी पंथामध्यें राहून देहाची नश्वरता कितीतरी ऐकली आहे. त्याचं सार्थक धारकरी पंथांत राहून होईल. देह आहे जाईजणे । भुललासी कवणे गुणें । असं तुकोबारायांनीं इतक्यांदा सांगितलं आहे कीं, तें खरोखरच कितपत पटलं आहे, हें पाहण्याला आपल्या या धारकरी पंथाशिवाय दुसरा मार्ग मला तरी दिसत नाहीं.

शिवाजी:—वारकरी पंथानं अखेर मोक्ष मिळतो—

तरुण यात्रेकरूः—तसाच तो धारकरी पंथानंही मिळतो. मला वाटतं वारकरी पंथानं देहबुद्धि नष्ट झालेले वीर धारकरी पंथानंच खरा मोक्ष मिळवितील. घरांत गाद्यागिर्द्यावर सुखानं लोळतां लोळतां, स्वधर्माच्या उद्धारार्थ काडीमात्रही शरीर न झिजवितां, स्वबांधवाच्या सुखदुःखाची विचारपूस न करतां केवळ हरि हरि म्हणून प्राण सोडणारे हे केवळ भूभार होत.

शिवाजीः—तें सर्व खरं, पण इतक्या या लहान वयांत तुला ही असली उपरती कां झाली ?

तरुण यात्रेकरूः--सध्यांच्या काळांत आम्हांसारख्या तरुणांनाच उपरति कां होते, संसारसौख्यापेक्षां वारकरी अगर धारकरी पंथच जास्त कां आवडतो, चातकाच्या तोंडांत एखादा पावसाचा थेंब पडला तरी त्याला जें सौख्य होत असेल, तसंच न सांगतां येण्यासारखं सौख्य स्वधर्मसंस्थापनेची खटपट कोणी करूं लागला आहे एवढी अस्पष्ट, अपुरी वार्ता कानावर आदळली तरी आम्हांला कां होतं, हें मला वाटतं आपल्या वयाच्या तेराव्या वर्षांपासून स्वधर्माच्या रक्षणार्थ व्याप करणाऱ्यांना का सांगायला पाहिजे ?

शिवाजीः--मग इतके दिवस कां आम्हांला भेटला नाहीं ?

तरुण यात्रेकरूः--वारकरी पंथांत शिरावं अशी बुद्धि झाली. देवाची करुणा भाकावी व त्याच्याच चरणीं नित्य " तुझे कारणीं देह माझा पडावा " असं मागावं, असं मनांत आलं. पण आतां जर देवकार्यार्थ देह पडावा असं प्रत्यक्ष कार्यच सुरू झालेलं आढळतं, तर मग पुन्हां वारकरी पंथाची जरूर ती काय ?

शिवाजीः--तरी पण इतके दिवस आम्हांला कां भेटला नाहीं, याचा कांहींच खुलासा तुला करतां येत नाहीं. आम्ही तरी तुझ्यावर एकाएकीं विश्वास कसा टाकावा ?

तरुण यात्रेकरूः--आपल्याविषयीं विपरीत बातम्या उठल्या असल्यामुळं मीच काय पण आणखी किती तरी तरुण असेच संशयांत पडून आपल्यापासून दूर राहिले आहेत. संशय नाहींसा व्हावा, अशी संधि माझ्या सुदैवानं मला लाभली. ती मी कांहीं आतां जाऊं देणार नाहीं. (श्रीशिवाजी महाराजांच्या पायांवर मस्तक ठेवून) महाराज आपण मला दूर करूं नका.

पुतळा:—आपल्या विश्वासाला उतरेन अशा स्थितींत मला ठेवा. आपण अंगिकारलेल्या या पवित्र कार्यांत माझीही थोडीशी सेवा घ्या.

पद ५ वें.

चरणासि भाग्यें आलों मी । अंतरिं प्रेमें मूर्ति हीच सुखदा नमीं ॥धृ॥ परजन चरणीं नमतां नमतां । वाटे दास्य सुटेना आतां । कवणही दिसत न भारतीं । रिपुतें दमी ॥१॥

शिवाजी:--(पुरुषाच्या हातापेक्षां त्या तरुण यात्रेकरूच्या हाताचा स्पर्श कांहीं वेगळा वाटल्यावरून त्याच्याकडे तीक्ष्ण दृष्टींनं पहातां पहातां) बरं, रहा आमच्यापाशीं. पण कांहीं विपरीत वर्तन आढळून आल्यास तावडतोब छाटून टाकूं हें मात्र लक्षांत ठेव.

तरुण यात्रेकरू:--मला आपण आश्रय दिलात हाच मी मोठा प्रसाद समजतों. आपल्याशीं अगर आपल्या कार्याशीं बेमान झालेल्या पशूला आपण जें शासन द्याल, तें तसा मी पशूसारखा वागलोंच तर मलाही मिळेल.

शिवाजी:--बरं तर रहा या बाजूला आणि नेहेमीं आमच्याच तैनातीला ऐस. (इतक्यांत मागील औदुंबराच्या पारावर घोंगडी टाकतात त्यावर श्रीशिवाजीमहाराज बसतात.)आतां बाजी शामराज यांचा विचार करूं या. बहिरजी, बोल तुला यांच्याबद्दल काय सांगायचंय तें !

बहि०:--सरकारची आज्ञा झाल्याप्रमाणं मी जावळीला गेलों. तिथं थोडीशी खटपट करून चंद्रावाच्या खुद्द वाड्यांत त्याचा खास सोंवळेकरी झालों. हे बाजी शामराज, विजापूरचे सरदार, विजापूरची कांहीं फौज घेऊन सरकारास पकडण्याकरतां आलेत आणि यांना चंद्रावबी त्या कामांत मदत करणार, हें मला तिथं समजलं. विजापुरी फौज जावळींतच ठेवून राजे चंद्रावाचे हे लोक बरोबर घेऊन आपल्या या बाजूच्या येण्याजाण्याच्या वाटेवर दबा धरून बसावं नी आपणावर तुटून पडावं हा यांचा बेत ठरला, तेव्हां मीहि यांच्यावर पाळत ठेवत ठेवत जावळीतनं पाय काढला बाजी शामराज जावळींत आल, त्या वेळीं संभाजी कावजी व राघोपंत हे बी तिथं होतच.

संभाजी कावजी:--आम्ही असतांना हे बाजी शामराज चंद्ररावाकडे आलेले आम्हीं पाहिले आहेत.

शिवाजी:--बाजी शामराज म्हणतात ते हेच, असं तुम्ही सांगता काय?

राघोपंत:--होय, अगदीं खात्रीनं सांगतों. बाजी शामराज हेच यांत मुळींच शंका नाहीं.

शिवाजी:—बरं पुढं काय झालं बाहिरजी ?

बहिरजी:-- मग यांनीं आपल्यावर एकाएकीं तुटून पडायला सोईस्कर जागा कोणती याचा तपास केला. मी होतोंच यांच्या पाळथीवर. यांनीं मला विचारलं. मीं अगदींच ऐकेना तेव्हां यांनीं मला सोन्याचं कडंबी बक्षिस दिलं. (हातांतलें दाखवितो.) हा सारा घोळ आम्ही कितीदां तरी पालथा घातला. सरकारकडनं सूचना आल्याबरोबर यांना मी या गेळक्यांत घेऊन आलों. इतक्यांत ते यात्रेकरू आले. बिचारे सगळे ते या जावळीखोऱ्यांतलेच! तरी पण अशाच कसल्या तरी वेषांतरांत आपण फिरतां असं मी यांना सांगतांच यांनीं केला झालं त्या गरीबावर हल्ला! आपण तर कुठं दिसाना, त्या यात्रेकरूंचं आतां काय होतंय याची मला धास्ती पडली! इतक्यांत आपण आला आणि ते बिचारे मोकळे झाले. हेच ते बाजी शामराज महाराज!

शिवाजी:--बाजी शामराज, तुम्ही आमचं कैदी आहांत. आमच्या माणसानं सांगितलेली हकीगत सगळी खरी आहे ना ?

बाजी शामराज:—त्यानं आम्हांला फसविलं?

शिवाजी:—तीच तर त्याची कामगिरी! तो तसं न करतां तर कदाचित् आत्तांचा हा प्रकार उलटाही झाला असता. बाजी शामराज, आपली जात कोणती बरं? ब्राह्मणच ना?

बाजी शामराज:—कां बरं ? या ठिकाणीं जातीशीं काय करायचं?

शिवाजी:--वाः! हा तर जातीचाच प्रश्न आहे. कोणत्या जातीनं काय करावं, कोणत्या जातीनं काय करूं नये, असं मला वाटतं, आपल्या धर्मशास्त्रानं सांगूनच टाकलं आहे. मग आपण ब्राह्मणच ना? माझ्या शासनपद्धतींत ब्राह्मणजातीबद्दल निराळी व्यवस्था आहे. आपण ब्राह्मण असाल तर त्याप्रमाणं आपल्याला शिक्षा देतां येईल.

बाजी शामराजः— मी ब्राम्हण आहें—

शिवाजीः—मग तर आम्हांला वंदनीय आहांत. सोडा रे, त्यांना सोडा, मोकळे करा. (त्याला मोकळा करतात.) बाजी शामराज, आपण ब्राह्मण आहांत. आणि गोब्राम्हणांचं रक्षण करण्याकरितां म्हणजे स्वधर्म संस्थापनेकरितां मी हा असा, धुरंधर बड्या आदिलशाहीशीं विरोधाचं ठाण मांडून उभा आहें ! मी यःकश्चित् अडाणी मराठा गडी. वस्तुस्थितीचं योग्य आकलन ब्राह्मणांनीं करावं आणि त्याप्रमाणं उपाययोजना करावी, यासाठींच तर आपणा ब्राह्मणांना आम्हां सर्व वर्णांचं गुरुपद दिलंय ना ? ब्राह्मणांनीं आदिलशाहीची सेवा करावी आणि स्वधर्माकडे दुर्लक्ष करावं, असं शास्त्रांत कुठं सांगितलंय काय ? बाजी शामराज, बोला, सांगा, ब्राह्मणांचं काय कर्तव्य तें?

बाजी शामराजः—ब्राह्मणांनाच कांहीं हंसायला नको. आधीं या कलियुगांत चातुर्वर्ण्य असतील तर ना ?

शिवाजीः—मग सब्बगोलंकार कां कराना ? मग आपण आपली जात ब्राह्मण म्हणून कां सांगितलीत ?

बाजी शामराजः—आपल्या राजाशीं बेमान होणं हें कांहीं ब्राह्मणाचं कर्तव्य नव्हे.

शिवाजीः—पण आपण ब्राह्मणच नाहींत तर ब्राह्मणाच्या कर्तव्याची तरी उठाठेव कां करतां ? सध्यांचा काल असा आहे कीं, या वेळीं आपण सर्वांनीं एक दिलानं प्रयत्न केला तर आपण या आदिलशाहीच्या मगरमिठींतून खात्रीनं सुटूं. अशी वेळ पुन्हां यायची नाहीं. अदिलशाहीला वरून मोंगल गिळूं पहात आहेत आणि आंतून सर्व बेदील झालं आहे. या वेळीं कांहीं हातपाय हालवाल तर हिंदुधर्माची धडगत आहे. पहा तुम्हांला पटतं का तें. मी तुम्हांला याचकरितां मुद्दाम सोडून देतों. तुम्ही ब्राह्मण आहां, तुम्हांला कांहीं सगळ्याच गोष्टीची संथा द्यायला नको. विजापूर दरबारांत राहून सुद्धां तुम्हांला आदिलशाहीशीं बेमान न होतांही माझ्या कार्याला हातभार लावतां येईल. तें कसं काय करायचं तें तुम्ही पहा. बहिरजी, यांना राजे चंद्ररावाच्या-कडून मदत आहे म्हणतोस याला पुरावा काय ?

बहिरजीः—(बाजीरावाची दाढी उपटून पुढें ढकलून) हे पहा, राजे

चंद्ररावांचे बडे चिरंजीव बाजीराव. प्रत्यक्ष हेच या कामगिरींत बाजी शामराज यांना मदत करीत आहेत. ह्याच पुरावा.

शिवाजीः—ठोका, यांना बेड्या ठोका, आधीं याच्या मुसक्या आंवळा. भलत्या भरीला पडणारे हे बादशाही किताबवाले राजे माझ्या मार्गांतले विषारी सर्पच होत. (बाजीरावाला बांधतात.) बाजीराव, अदिलशाहीकडून तुमची मुक्तता होण्याचा प्रयत्न व्हावा म्हणून आम्ही तुम्हांला महाडास कैदेंत ठेवीत आहोंत. आणि तुमची ही बातमी तुमच्या वडिलांना समजावी म्हणून आम्ही बाजी शामराज यांना मोकळे सोडीत आहोंत. (तरुण यात्रेकरूकडे पाहून) नांव काय ?

तरुण यात्रेकरूः—विश्वास—

शिवाजीः—(हंसून) बरं विश्वास ! तूं या बाजी शामराजांच्या बरोबर जाऊन हे जावळीस गेलेले पाहून महाडास ये, जा. (विश्वास व बाजी शामराज जातात.) बाकीच्यांना घेऊन चला महाडाकडे चला. राघोपंत, तुम्ही जा या लोकांबरोबर. तुमच्याच पहाऱ्यांत ठेवा. जा. (ते जातात.) संभाजी, मग जावळी प्रकरणांत तुम्हांला काय करावंसं वाटतं ?

संभाजीः—सामोपचारानं कांहीं वळेलसं मला वाटत नाहीं.

बहि०ः—चंद्रराव, त्याचे भाऊ, दिवाण हणमंतराव, हा मुलगा बाजीराव हीं मंडळी अगदीं विरुद्ध आहेत, केवळ हाडवैरी आहेत. मात्र चंद्ररावची घरची मंडळी सगळी अनुकूल दिसली.

शिवाजीः—एकंदर शिबंदीची व्यवस्था कशी काय आहे ?

संभाजीः—तीहि बरीच कडेकोट दिसली. सात हजार बरकंदाज आहेत.

शिवाजीः—अबब ! सात हजार !—

बहिरजीः—पण चंद्रराव आणि त्याचे हस्तक सारे कैफी आहेत.

शिवाजीः—होय का ! मग चला तर सगळी मंडळी बोलावूं या महाडाला. आईसाहेबांनाही बोलवूं या आणि हा मनसुबा कसा पार पाडायचा तें ठरवूं या. चला व्हा पुढं. मी येतोंच तुमच्या मागोमाग. (संभाजी कावजी जातो.) बहिरजी, त्या विश्वासाकडे तुझं लक्ष्य होतं काय ?

बहिरजीः—त्याच्यांत मला थोडा नाजुकपणा दिसला—

शिवाजीः—आणखी कांहीं—? (बोलत बोलत जंगलरस्त्यावर येतात.)

बहिरजी:—तो चांगला तलवारबहाद्दर असावा– ?

शिवाजी:—अं ?! कशावरून बरं– ?

बहिरजी:—त्याच्या उजव्या हाताला तलवारीचे आणि डाव्या हाताला ढालीचे घट्टे चांगले पडलेले दिसतात.

शिवाजी:—आणखी नाहीं तुला कांहीं दिसून आलं ?

बहिरजी:—त्याच्या चेहेऱ्यावर तरी विश्वासघाताची छटा दिसली नाहीं–!

शिवाजी:—त्याच्या त्या नाजुकपणामुळं त्याच्या इतर हालचालींकडे लक्ष्य द्यावंसं तुला वाटलंच नाहींसं दिसतं– !

बहिरजी:—सरकारना त्याचा कांहीं संशय आला काय ?

शिवाजी:—बाजी शामराज जावळीला पोंचल्याची पावती तो महाडास घेऊन येईल तेव्हांच त्याचा विचार करूं या. बाकी तूं म्हणतोस तसा तो नाजूक आहे यांत कांहींच शंका नाहीं. माझ्या पायां पडला, तेव्हांच तें मला कळून आलं. बरं तूं असा जवळच कुठं तरी ऐस. मला आतां थोडा एकांत पाहिजे. (बहिरजी दूर होतो. स्वगत) हा विश्वास कोण असावा ?

पद ६ वें.

मज न कळुनी मनीं येतें। सहजचि या हृदयीं । ग्रह करीत
काय हें । मन माझें भ्रांत होतें ॥ धृ० ॥ दमूनी निशाचर ।
रिपु अनेक सुविमल मानस हें । यातें, दुरितें, अति विकल
कवण अरि । विपरीत विचार हे । मम मानसिं अविरत
स्फुरती मातें ॥ १ ॥

त्याच्या हाताचा आणि मस्तकाचा माझ्या पायाला स्पर्श झाल्यापासून मला काय होतं आहे, हेंच मला समजत नाहीं. बरं पण जाऊं द्या तो विचार. तो पुन्हां महाडास भेटलाच तर मग पाहूं त्याचं काय करायचं तें ! (विचार) मला वाटतं माझं सगळं आयुष्य केवळ चमत्कारपूर्ण होणार आहे! किती निरनिराळीं, परस्परविरुद्ध अशीं दृश्यं माझ्या दृष्टीला पदोपदीं आढळून येतात ! जावळीकर मोरे, आणि माझे आजोबा जाधवराव किंवा माझे सावत्र मामा मोहिते, यांच्यासारखीं माणसं कोणत्या कोटींत गणावींत हेंच मला समजत

नाहीं. त्यापेक्षां या मावळांतले देशमुख देशपांडे आणि मावळे कितीतरी पटीनें बरे. स्वधर्म राखायचा तर स्वराज्य पाहिजे, हें तत्त्वच आधीं या कोणाच्या गळीं उतरतां उतरत नाहीं. बरं तें तसं उतरलंच तर हे एकाएकीं अदिलशाहीला सोडून माझ्या कार्याला हातभार लावतीलच असाही नेम नाहीं. एक तर अदिलशाहीची प्रचंड बादशाही सत्ता यांना बहुतेक गर्भगलितच करते. दुसरं असं कीं, या असल्या सत्तेपुढं स्वधर्मसंस्थापनेचं कार्य कसलं उभारलं जातं हा संशय उरल्या सुरल्या धैर्याची वाताहत करतो. या असल्या स्थितींत पुष्कळांची कुचंबणा होते. त्यांना धड मला मिळतां येत नाहीं आणि धड अदिलशाहीकरितांही प्राण द्यावा असं वाटत नाहीं. पण हे असले लोक निदान माझ्या कार्याच्या आड तरी येत नाहींत. उलट जसजसं माझ्या कार्याला यश येत चाललंय तसतसे हे मला मिळूंही पण लागले आहेत. सामान्य जनतेचं काय, ज्याला माझं कार्य पटलं तो भावी संकटाची पर्वा न करतां माझ्या झेंड्याखालीं येतच आहे. त्रासदायक आणि विलक्षण आडमुठे आणि या कार्याला उलट अडथळा आणणारे कोण असतील तर हे किताबवाले, वतनदार, चंद्रराव मोऱ्यासारखे. अदिलशाही हेंच यांचं सर्वस्व होऊन बसलं आहे. आपल्या धर्माची विटंबना, आपल्या लोकांची मारांडी, कोण चालली आहे, इकडे त्यांचं लक्ष्यच नाहीं. अदिलशाहीचं आयुष्य या असल्या किताबवाल्यांमुळंच क्षीण होतां होत नाहीं. अदिलशाहीच्या प्रचंड वृक्षावर घाव घालण्याच्या आधीं हे जाधव, मोरे, मोहिते आदिकरून निवडुंगाचे दाट फडे तोडतां तोडतांच नाकीं नव येऊं लागले आहेत. हे आमच्याच धर्माचे आणि आमच्याच जातीचे लोक, पण अदिलशाहीच्या चंदनवृक्षावर विखारी भुजंगासारखे फुत्कारत आहेत. (विचार) हा सारा अन्नाचा मिंधेपणा. पिढ्यान् पिढ्या या ब्राम्हणी राज्याच्या सेवेंत गेल्यामुळें या लोकांची स्वतःच्या संबंधाची संवेदनात्मक जाणीवच नष्ट झाली आहे. धिःकार असो या अशा किताबवाल्यांना. स्वतः तर पारतंत्र्यांत खितपत पडलेच आहेत, पण दुसरेही तसेच त्यांतच कुजावेत, अशी यांची घातुक बुद्धि ! यांना माणुसपणच नाहीं म्हणावयाचें दुसरं काय! (विचार) कांहीं का असेना! आपण तर श्रीशंभुमहादेव आणि श्रीतुळजाभवानी यांना आधार करून स्वधर्म संस्थापनेच्या कार्याचं शिंग फुंकलं आहे. बहुतेक मावळप्रांत आणि त्यांतले डोंगरी किल्ले यांनीं स्वधर्मसंस्थापने

करतां पाहिजे असलेल्या स्वराज्याच्या कार्याचा झेंडा तर उभारला आहे. आपण तर हें कार्य जीवांत जीव आहे तोंपर्यंत करणार, मग कोणी मिळो अगर प्रतिरोध करो. (विचार) पण या सर्व व्यापाला गुरुपीठ म्हणून कांहीं पाहिजेच. आईसाहेबांचा सल्ला तर मला प्रत्येक कामांत मिळतच आहे पण कोणी तरी वरद्‌ विभूति माझ्या या कार्याच्या गुरुस्थानीं असल्याशिवाय मलाही निर्धास्त असं कांहींच धोरण ठरवितां येणार नाहीं; असा कोणी सत्पुरुष आपण पाहिल्याचं बहिरजी बोलत होता. (बहिरजीला) बहिरजी अरे बहिरजी, (तो आल्यावर) अरे, त्या मेरुलिंगावर भेटलेल्या सत्पुरुषाचा कांहीं पत्ता काढलास काय ?

बहिरजीः—अमुकच ठिकाणीं असं कांहीं नक्की समजलं नाहीं—

शिवाजीः—(निराशेनें) नाहीं समजलं ?! तूं कुठं तपास केलास ?

बहिरजीः—जावळींत. चंद्रराव मोरे यांच्या वाड्यांत ते येतात म्हणून ऐकलं होतं. मी होतों त्या दिवसांत कांहीं त्यांची फेरी झाली नाहीं.

शिवाजीः—तें कांहीं नाहीं. आतां त्या सत्पुरुषाचा पत्ता काढल्याशिवाय महाडाकडेच जायचं नाहीं. जावळीकरांच्याच खोऱ्यांत आधीं तपास करूं या चल.

बहिरजीः—(झपाट्यानें निघालेल्या श्रीशिवाजीस) पण महाराज,.

शिवाजीः—(थांबून वळून) काय— ?

बहिरजीः—नाहीं म्हटलं शत्रूच्याच प्रांतांत जायचंय अगदीं तेव्हां—

शिवाजीः—तेव्हां काय ?

बहिरजीः—वेषांतरही केलं पाहिजे आणि चार लोकही बरोबर घेतले पाहिजेत. असंच अगदींच एकटं जाणं बरं नाहीं, धोक्याचं आहे, असं मला वाटतं. सरकारना मीं तें आणखी काय सांगावं ?

शिवाजीः—शत्रूच्या मुलुखांत एकटें जाऊं नये म्हणतोस ? काय होईल ? दगाफटका होईल ? पण माझ्या त्या गुरुमाउलीनं तरी शत्रूच्या मुलुखांतच कां रहावं ? स्वधर्म संस्थापनेच्या कार्याकरितांच मी त्यांच्या चरणापाशीं जात आहें. शत्रूंनीं मला धरलं, मारलं तर स्वधर्मसंस्थापनेचं कार्य माझ्या हातून व्हावयाचंच नाहीं असं म्हणावं ! कदाचित् शत्रूच्या मुलुखांत राहून गुरुमहाराज माझ्या एकनिष्ठेची परीक्षा तरी पहात नसतील कशावरून ? बहिरजी, चल, काय व्हायचं असेल तें होवो. माझ्या त्या गुरुमाउलीच्या पुढं

लोटांगण घातल्याशिवाय, त्या पवित्र चरणांचं दर्शन घेतल्यावांचून, आणि तें पुण्यमय स्वरूप पाहिल्याखेरीज मला आतां मुळींच चैन पडणार नाहीं. स्वधर्म-संस्थापनेच्या कार्याची मीं जी मुहूर्तमेढ रोवली आहे, तिला यशस्वि करण्याला गुरुमहाराजांचंच पाठबळ अवश्य आहे. शत्रूच्या हद्दींत गुरुमहाराज असतांही मी तिकडे असा सडा जात आहें हें तुला धाडस वाटत असेल, पण स्वधर्म-संस्थापनेचं कार्य इष्टफलदायी व्हायला पाहिजे असेल तर हें असलं धाडस केलंच पाहिजे. या कार्याकरितांच तर आपण आपल्या जीवितावर तुलसीपत्र ठेवलं आहे. मग भीति ती कसची ?

पद ७ वें.

गुरु–हृदय सदय भीति भारी । हंसत हारी । वद गुरुविण ।
अवन कवण । जाऽऽजगत बाऽऽबघत नाऽऽदिसत ॥ धृ० ॥
भव–गज–हारि विषयज हारि । हाऽऽहरत प्रेम धारि । कवण
पदीं जरी । नमूं तरी । माय सारी । कांऽऽसभय । बाऽऽहृदय ?
गाऽऽसदय ॥ १ ॥

भवभयांतून पार नेणारा सद्‌गुरु या ऐहिक संकटांतून सहजच मुक्त करील. त्याच्याच दर्शनाकरितां चाललों असतां कांहीं विपरीत झालं तर त्याची लाज त्याला, आपणांला त्याचं काय ? बोल सद्‌गुरु महाराजकी जय आणि चल मुकाट्यानं माझ्याबरोबर. (जयजयकार करीत जातात.)

प्रवेश दुसरा.

[स्थळः—कसबें शिवथरनजीकच्या डोंगरांतला सुंदर मठ.]

पद ८ वें.

अभिराम हा राम हृदया मोही । रसना मधुर–नाम–गानीं
रमो ही ॥ धृ० ॥ दासां सदाधार । प्रेमा–सुधा–धार । प्रिय
फार सुरस देइ, तुलना नाहीं ॥ १ ॥ दीनांस दे भार ।
केला सुरोद्धार । नच पार अलऽख केलि,नकळे कांहीं ॥२॥

रामदासः—(श्रीरामस्तुतीपर पद संपवून) आहा! श्रीरामराया, तुझी लीला अतर्क्य आहे. केदारनाथानजिकच्या कड्यावरून मीं उडी घेतली तेव्हां तूं मला सांवरलंस–वरच्यावर झेललंस–आणि मला दक्षिणप्रांतीं स्वधर्म-संस्थापनेकरितां जा म्हणून सांगितलंस. तुझ्या आज्ञेप्रमाणं मी इकडे आलों तर इकडची देशस्थिति किती विचित्र झाली आहे ही! श्रीरामा, ' प्रस्तुत यवनाचें बंड। हिंदु उरला नाहीं चंड। बहुतां दिवसांचें मुंड। शास्ता न मिळे तयांसी॥ देव ब्राह्मण उच्छेदिले। कर्म अवघें भ्रष्टविलें। नामसंकीर्तन लोपलें। दुष्ट योगें॥ पापराशी बळावले। धर्मवान् निर्बळ झाले। आनंदगौरव विराले। संकटकाळें॥ संकटें पापकाळ उदेला। देवीं घेतल्या खोळा। ब्राह्मणीं सोडल्या टिळेमाळा। तद्रूप वर्तती॥ ' अशा या देशस्थितींत श्रीरामा स्वधर्मसंस्थापना करील असा कोणी पुरुष उत्पन्न तरी होईल कीं नाहीं याची शंकाच वाटत होती, पण श्रीरामा, तुझ्या कृपेनं तसा एक पुरुष उत्पन्न झाला असून त्याच्या माझ्या भेटीचा योग आतां जवळ जवळ येत चालला आहे. रावणांतका श्रीरामचंद्रा, या धर्मप्रभावनेच्या कार्याला तुझं अधिष्ठान पाहिजेच पाहिजे म्हणूनच तो शिव नामा शक्तिमंत तुझ्या दासाला आपलं दर्शन देणार आहे. तो दर्शनयोग म्हणजेच शक्तियुक्तींचं मीलन आणि शक्तियुक्तींचं मीलन झालं कीं, श्रीरामा त्या ठायीं तुम्ही श्रीमंत धांवत येणारच! मग या महाराष्ट्रांत दैन्य कशाला राहील? (पाहून) कोण येत आहे हें? चंद्रराव मोरे! (विचार) हा मोरे केवढा बलाढ्य आहे?! घराणेंसुद्धां अगदीं अस्सल मराठ्याचं. पण याचा उपयोग स्वधर्मसंस्थापनेकडे होऊं नये, उलटा त्या कामांत याचा विरोधच होत आहे, किती विलक्षण हा योगायोग! बाकी मोरे यांची धांव लक्षांत आल्यापासून चांफळखोऱ्यांत मांडनदीचे कांठीं श्रीरामा, तुझं धर्मप्रभावनेचं कार्य सुरूच केलं. आश्चर्याची गोष्ट अशी कीं, त्या चांफळाच्या देवस्थानची स्थापना खुद्द आदिल-शाहीच्या दरबारी मंडळीकडूनच झाली आहे! तिकडे तो शिवनामा कांहीं मुलुखगिरी करून प्रबल होत आहे तर इकडे आम्हींही शिवथरपासून चांफळ-पर्यंत श्रीरामनामाचा घोष चालू केला आहे. तिकडे गोदातटीं टांकळीस उद्धवनामा वाढतोच आहे. एकंदरींत काय, स्वधर्मसंस्थापनेच्या कार्याला गति मिळाली आहे. पुणें, सुपें प्रांतांतली ती शक्तिनदी या शिवथरचांफळ खोऱ्यां-तल्या युक्तिनदीशीं मिळाली कीं, हरहरमहादेवाचा एकच गजर उसळेल व त्या

प्रचंड नद्यांच्या एकरूप झालेल्या वेगवान् लोंढ्यापुढं हीं चंद्रराव मोऱ्यासारखीं जुनाट खोडं कुठल्या कुठं वाहून जातील याचा पत्तासुद्धां लागायचा नाहीं. (चंद्रराव येऊन वंदन करितो. उभयतां पुढें बोलत बोलत जंगलपड्यावर येतात) काय राजे, चांफळच्या श्रीरामाच्या दर्शनाला केव्हां येतां ?

चंद्ररावः—कुठलं चाफळ नी कुठलं काय !

राम०ः—कां ? असं झालंय तरी काय ? बादशाहीवर काय मोंगल चालून आले ?

चंद्र०ः—मोंगल चालून आले असते तर इतका मी डगमगलों नसतों पण या आमच्याच लोकांच्या दगेबाजपणामुळें सगळा अनर्थ उडाला आहे.

राम०ः—म्हणजे बादशाही सरदारांत कांहीं बाचाबाच झाली कीं काय ?

चंद्र०ः—तसंही कांहीं नाहीं. पण खुद्द बादशाही गजराजावर तें शिवाजी कुत्रं भुंकूं लागलं आहे.

राम०ः—नुसतंच भुंकतंय ना ? भुंकूं दे वाटेल तितकं ! कांहीं बादशाही मुलुखाचा लचका नाहीं ना तोडलान् ?

चंद्र०ः—बारा पंधरा मावळं हाताखालीं घातलीं असून अगदीं या महाडापर्यंत आला आहे, म्हणजे अगदीं माझ्या मुलुखाला येऊन लागला आहे.

राम०ः—मग बादशाही कशी स्वस्थ बसली आहे अझून ? कांहीं कोणी सरदार आलाय कीं नाहीं विजापुराहून ? बाकी ही संधी तुम्हांला बरी आहे, राजनिष्ठेची शिकस्त करून दाखवायला.

चंद्र०ः—शत्रू तरी जोडीचा पाहिजे ! कालचा पोर तो शिवाजी. लागलाय हूडपणा करायला.

राम०ः—किती वर्षांचा असेल तो हो ?

चंद्र०ः—कुठला किती ? असेल पंचवीस तीस वर्षांचा फार झालं तर ! विजापुराहून आलेला बाजी शामराज आणि आमचा रावसाहेब हे गेले आहेत त्याच्या नाकांत वेंसण घालायला.

राम०ः—अस्सं !

चंद्र०ः—काय होईल वाटतं आपणांला ?

राम०ः—काय तें समजेलच आतां-मी काय ज्योतिषी आहें का ?

चंद्र०ः—तसं नव्हे. म्हटलं महाराजांना कसं होईलसं वाटतं ?

राम०:—काय होणार ? तो विजापूरचा सरदार तरी हुषार आहे काय ? का रावसाहेबासारखाच— ?

चंद्र०:—शिवाजी त्यांना आटोपणार नाहीं ह्मणतां ?

राम०:—सारं हुषारीवर अवलंबून आहे. तुमचं मन अस्वस्थ दिसतंय.

चंद्र०:—चैनच नाहीं मनाला. रावसाहेबाला पाठविला आहे शिवाजीवर.

राम०:—मग आतां असं करा. आणखी कोणीतरी चांगला हुषार पाहून द्या त्यांच्या मदतीला पाठवून. उगीच काळजी काय करता ?

चंद्र०:—असंच करावं हें बरं ! पुष्कळ फौज पाठवून शिवाजीचं मूळच उखडून टाकतों. जातों, आधीं त्याच उद्योगाला लागतों. (वंदन करून तांतडीनें निघून जातो.)

राम०:—(हंसून) तूं शिवाजीचं मूळ उखडतोस कीं शिवाजीच तुझा वंशवृक्ष उपटून टाकतो हें आतां थोड्याच दिवसांत समजून येईल. कालस्थितीकडे न पहातां चाललेले हे देशद्रोही मस्त लोक ह्मणजे पिसाळलेल्या कुत्र्यासारखे होत. यांची गय करून मुळींच उपयोगी नाहीं. (विचार) सर्व भारतवर्षाचं सूक्ष्म निरीक्षण तीर्थयात्रेच्या निमित्तानं मला करतां आलं. सर्वत्र धर्मग्लानि झाली असून एकंकार माजला आहे. यवनांच्या प्राबल्यापेक्षां धर्मभ्रष्टांच्या प्राबल्यामुळेंच स्वधर्म मंदावला आहे. राजकीय सत्तेच्या पाठबळाच्या अभावीं स्वधर्माची प्रखरता नाहींशी झाली असून कोणीं काय करावं आणि कोणीं काय करूं नये याचा विधिनिषेधच राहिला नाहीं. एकंदर भारतवर्षांत धर्मसंस्थापनेच्या कार्याला प्रारंभ करण्यायोग्य अशी त्यांतल्या त्यांत योग्य अशी हीच भूमि मला आढळली. कृष्णा कोयना गोदावरी या नद्यांच्या पवित्र जलानं भिजणारा हा देश महाराष्ट्र या श्रेष्ठ नांवाचा अधिकारी आहे. या महाराष्ट्रलाच मी आनंदवनभुवन ह्मणतों. येथें या आनंदवनभुवनांत हा सुंदरमठ तयार करून श्रीरामाचा संदेश सर्व भारतवर्षाच्या कोनाकोपऱ्यांत समजावा ह्मणून माझे हजारो महंत दाही दिशा मीं विखुरले आहेत. हे माझे महंत सर्वत्र महाराष्ट्रधर्माचा प्रचार करीत असून हताश होऊन मृतवत् झालेल्या भरतखंडांत चैतन्य उत्पन्न करीत आहेत. देवगिरीचे जाधवांचा पाडाव झाल्यापासून हें राजकीय पारतंत्र्य महाराष्ट्राच्या राशीला खिळलं आहे. अनेक संतसाधूंनीं, वारकरीधारकऱ्यांनीं स्वत्व रक्षण करण्याचे किती तरी प्रयत्न केले

म्हणूनच अद्यापही अशाही दुःस्थितींत जनतेच्या अंगीं शक्ति आहे, जामे आहे, आपळी अवनति व योग्यता यांची ओळख पटवून घेण्याची शक्ति आहे. माझं काम इतकंच आहे कीं, ही सगळी विसकळित झालेली शक्ति एकवटायची व तिचा त्या शिवनामा धर्मस्थापकाला, उपयोग करून द्यावयाचा. ' कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदा च न ' या भगवंताच्या उक्तीला अनुसरूनच मीं महाराष्ट्राला संदेश पाठविला आहे कीं, मराठा तितुका मेळवावा । आपुले जीवीं जीववावा । आपुल्या समान करावा । निष्ठा पाहोनी ॥ देवद्रोही तितुके कुत्ते । मारोनी घालावे परते । देवदास पावती फत्ते । संशय नाहीं ॥ देव मस्तकीं धरावा । अवघा कल्लोळ करावा । मुलुख सर्व बुडवावा । धर्मस्थापनेसाठीं ॥ धर्माकरितां मरावें । मरोनी अवघ्यांसि मारावें । मारतां मारतां घ्यावें । राज्य आपुलें ॥ राज्य आहे धर्मनीतीचें । नीतीकरितां सर्व साचें । साच चालतां वैभवाचे । मान पावती ॥ देव मात्र उच्छेदिला । आपुला धर्म बुडविला । यापरीस मृत्यु भला । वोळखाना ॥ या संदेशाचे जोरावर सर्वत्र जागृति होऊन सनातन धर्माची स्थापना करण्याचें कार्य त्या शिवनामा शककर्त्याला सुगम झाल्याशिवाय रहाणार नाहीं. जयजय रघुवीर समर्थ हा नामघोष काळनिद्रेला हुसकून लावणार आणि महाराष्ट्राला उदयोन्मुख करणारच करणार.

पद ९ वें.

हरि हा हसविल हरुनि ताप । मुदभरित करुनि वर भूमी
(ही) ॥ धृ० ॥ महाराष्ट्रधर्मीय भावना । जागृत होइल
सहज पावना । दैन्या दुरिता दवडिल निजनाऽमीं ॥ १ ॥
करिल सचेतन मृत–हृदयाला । हिंदवीर येतिल उदयाला ।
देतील साह्या सकल ही जन–कामीं ॥ २ ॥ (जातात.)

प्रवेश तिसरा.

[स्थळः—चंद्रराव मोऱ्याच्या वाड्यांतील मागील चौक. तुळशीची पूजा करून वृंदावनापुढें सगुणाबाई सचिंत बसली आहे.]

सगुणाबाईः—आप्पासाहेब, जा बरं, बाहेरच्या सोप्याला कोणी आलंय का बघ, जा बरं–

आप्पासाहेबः—बाबा आले असले तर इकडे बोलवतीस म्हणून सांगूं का ?

सगुणाः—हं, जा, लवकर जा. (आप्पासाहेब जातो.) कांहींच कशी अद्याप बातमी नाहीं समजत ? हा डोळा तर सारखा लवतो आहे. (चंद्रराव येतो. त्यास) कांहीं समजली का बातमी ? कोणी आलंय का ? कोणाला पाठविलंय तरी का ?

चंद्ररावः—अझून कांहीं बातमी नाहीं.

सगुणा०:—आई देवी, माझीं दोन्ही बाळं सुखरूप येऊं देत.

चंद्र०:—खरंच काय झालं असावं याची कल्पनासुद्धां येत नाहीं. ते बाजी शामराज सुद्धां रावसाहेबाबरोबर आहेत. आक्का खरंच मोठी हुशार पोरगी आं. रावसाहेबाच्या मनांतून तिला इथल्या इथंच पकडायची होती, पण ती केव्हां आणि कशी गेली याचाही थांग लागला नाहीं. मोठी चलाख पोर आहे. पुरुषाच्या जन्माला यायला पाहिजे होती. खरंच नांव गाजविलं असतंन् ?

सगुणाः—कुणा तरी अस्सलाचीच पोर असावी ती—

चंद्र०:—मग निवडुंगांत कशी सांपडली ?

सगुणा०:—सध्यांच्या या धामधुमीच्या काळांत कुणावर कसा प्रसंग येईल हें काय सांगावं-? पोर खरंच कुलीनाच्याच पोटची आहे.

आप्पा०:--(प्रवेश करून) आईग आई, ते विजापूरचे सरदार शिवाजीवर गेले होते ते, ते आलेत ग ?

सगुणा०:—रावसाहेब आलाय का ?

आप्पा०:--नाहीं ग ! अग पण त्यांच्याबरोबर आणखी एक कोण बुवा आहे. पण काय ग आई, बाजी शामराजांच्या कंबरेला तलवारसुद्धां कां ग नाहीं ? (ते येतात हें पाहून) पण हें बघ हे आलेच इकडे.

पुतळा०:—हे तुमचे बाजी शामराज घ्या आणि मला पावती द्या. राजे चंद्रराव, श्रीशिवाजी महाराजांनीं तुमचा मुलगा रावसाहेब महाडाला पाठविला आहे. आणि या बाजी शामराजाला हत्यार काढून घेऊन जीवदान दिलं आहे. तुमच्याकडे यांना पोंचवून पावती घेऊन येण्याला मला सांगितलं आहे. आपला इसम घ्या हा आणि मला पावती द्या.

चंद्र०:—काय हो बाजी शामराज, असं झालं काय ? उलट तुमच्यावरच शिवाजीचा घाला कसा आला ?

बाजी शामराजः—अहो तुमच्याकडे तो सोंवळेकरी होता ना? तो तर शिवाजीचा प्रख्यात हेर बहिरजी नाईक. त्यानंच आम्हांला खूप बनवलं नी अचानक शिवाजीच्याच तोंडांत नेऊन सोडलंन्! सगळा प्रकार इतका अचानक झाला कीं, हत्यारसुद्धां चाललं नाहीं. त्या बहिरजीनं अगदीं बित्तंबातमी शिवाजीला दिली व तो एकास दोन माणसं घेऊन येऊन आम्हांवर एकदम तुटून पडला.

चंद्र०:—काय सांगता हें! चकमकसुद्धां झडली नाहीं म्हणतां, मोठं आश्चर्य आहे. इतके गाफील राहून तुम्ही करीत तरी काय होता?

पुतळा०:—यात्रेकरूंचे गळे कापीत होते.

चंद्र०:—पाहिलंत कांहीं तरी भलतं करायला गेलांत तें आंगाशीं आलं. यात्रेकरूंच्या आंगावर कशाला गेलांत?

बाजी शाम०:—सगळं त्या बहिरजीचंच कारस्थान! टाळकऱ्यांच्या रूपांत शिवाजीचेच लोक चाललेत म्हणाला, आम्हीं केला झालं त्यांच्यावर हल्ला, पाठोपाठ शिवाजीचा गराडा बसला!

आप्पा०:—आईग आई! ऐकलंस शिवाजीनं कसं फसविलं यांना तें!

सगुणा०:—(त्याला दावून) शिवाजीचा नी आमचा घरोबा आहेच, तो कांहीं रावसाहेबाच्या जीवाला अपाय करणार नाहीं.

चंद्र०:—त्याच्या केंसाला धक्का लागूं दे कीं, नुसता खिसूनच काढीन. आप्पासाहेब, जा रे आधीं सेनापतीला बोलावून आण बरं.

पुतळा०:—मग तर एकूण तुम्ही महाडावर चालून जाणार तर?

चंद्र०:—हो, पहा आतां तूं आणि तुझा शिवाजी महाराज! या चंद्रराव मोऱ्याच्या तलवारीचं पाणी.

पुतळा०:—प्रसंगच आला तर पाह्यलंच पाहिजे. पण प्रसंगच न येऊं दिला तर?

चंद्र०:—मग काय त्या पुंडापुढं माझ्या लेकाच्या सुटकेची भीक मागूं कीं काय?

पुतळा०:—तसंही करण्याची जरूर नाहीं. भीक मागूं नका, पाया पडूं नका, आणि रक्तपातही करूं नका.

चंद्र०:—मग काय करूं? पोर मेला म्हणून स्वस्थ बसूं–?

सगुणा०:—असं काय बोलावं तें ?

पुतळा:—तुमचा मुलगा तुमचा तुम्हांला सुरक्षित मिळावा, आणि तुमचा मानमरातबही कायम रहावा, याला एक युक्ति आहे.

सगुणा०:—कोणती बरं ती युक्ति ?

चंद्र०:—मिसरूडही न फुटलेल्या या पोक्त पुरुषाच्या मसलतीवर भरंवसा टाकून खुशाल घरांत स्वस्थ बसण्याची— !

बाजी शाम०:-आपण ऐकतों तितका कांहीं शिवाजी वाईट नाहीं. त्याचं अदिलशाहीशीं वैर आहे.

चंद्र०:—म्हणजे माझ्याशींही आहेच.

पुतळा०:—प्रसंगीं अदिलशाही तुमच्या उपयोगीं नाहीं पडावयाची !

चंद्र०:—हें पहा, हे शिवाजीचे लोक आणि त्यांचे विचार.

पुतळा०:—हिंदुधर्माच्या रक्षणार्थ शिवाजी महाराजांनीं अदिलशाहीशीं वैर मांडलं आहे. तुमच्यासारख्यांनीं या कार्यांत त्यांना हातभर लावला तर हें स्वधर्मसंस्थापनेचं कार्य झपाट्यानं साध्य होईल.

चंद्र०:—बस्स तोंड आटप. तुझ्या त्या महाराजाच्य गप्पा नी गमजा तुझ्या तुझ्यापाशींच ठेव.

पुतळा०:—राहिलं. रक्तपात करूनच मुलगा सोडविणार असाल तर तुमचा हात कोण धरणार आहे ? श्रीशिवाजी महाराज हिंदुधर्माकरितां अदिलशाहीशीं वांकडे झाले. तुम्हांला हिंदुधर्माशीं कांहीं कर्तव्य असतं तर तुम्हांलाही तोच मार्ग पसंत पडला असता. पण अदिलशाहीकरितां तुम्ही स्वतःचा धर्मही लाथाडणारे, मला वाटतं प्रसंगीं पोटच्या गोळ्यालाही तोडाल. चला द्या मला पावती. श्रीशिवाजी महाराजांना ती दाखविलीच पाहिजे.

चंद्र०:—(तलवार उपसून आंगावर धांवतो) अरे म्हाराच्या कुऱ्या ! (बाजी शामराज ' हां ' ' हां ' म्हणून त्याला आडवितो.)

पुतळा०:—सोडा सोडा त्यांना. एका घावांत त्यांना एक पोटांतला आणि एक ओटींतला असे दोन गोळे तोडूं द्या.अदिलशाहीच्या पुढं स्वतःच्या दोन पोरांचे बळी देऊन राजराजेश्वर किताब त्यांना मिळवूं द्या. आपल्या दिव्य राजनिष्ठेला पोटच्या पोराच्या रक्तानं न्हाऊं घालूं द्या. अदिलशाहीच्या

तत्काला आपल्या मुलांच्या शिरांचा नजराणा पाठवून चंद्रराव किताबाच्या जोडीला सूर्यराव किताब त्यांना मिळवूं द्या. दोन्ही पोरें मेलीं तरी हरकत नाहीं–

चंद्र०:—कुठलीं दोन पोरं ? काय म्हणतोय हा ?

पुतळा०:—पोटचा पोरगा रावसाहेब महाडांत श्रीशिवाजीमहाराजांच्या तुरुंगांत आहे. तो माझ्या जीवाकरितां महाराजांनीं ओलीस म्हणून ठेवला आहे. माझ्या जीवाला अपाय केलात तर रावसाहेबाला तोडल्याशिवाय महाराज रहातील ? आणि मला—

चंद्र०:—तूं कोण ?

पुतळा०:—मी ? (आविष्करण करतां करतां) पहा मी कोण तें ? तुमच्या ओटींतली मुलगी–तुमची आक्का–श्रीशिवाजी महाराजांच्या इथं भेद काढायला गेलेली फड्यांतली नागीण— ! चालवतांना आतां हत्यार ? !

—(पडदा)—

अंक दुसरा समाप्त.



पुतळाबाई:—पहा मां कोण तें! तुमच्या ओटींतली मुलगी—तुमची आक्का!

[अंक २–प्रवेश ३—पृष्ठ ४६.

अंक तिसरा.

—:०:—

प्रवेश पहिला.

स्थळः—महाडच्या नजिकचा भाग.

[कांहीं मावळे पहारेकऱ्यांसह बाजीराव—चंद्रराव मोरे यांचा थोरला मुलगा—फिरत फिरत येतो, बरोबर विश्वास असतो.]

बाजीरावः—काय हो विश्वास, माझी कैद ही इतकी सैल कां बरं झाली ?

विश्वासः—मला तरी काय ठाऊक ?

बाजी०ः—आणि ठाऊक असलं, तरी तें तुम्ही मला कशाला सांगाल ?

वि०ः—तुमच्या मनाच्या स्थितीवरूनच तुम्ही बोललांत हें ठीकच आहे ! पण एकंदरींत जावळीपेक्षां तुम्हांला महाड मानवल्यासारखं दिसतं. स्वराज्यांतलीच ही हवा, स्वबांधव कैदी असला तरी त्याला ती आपला गुण दाखविल्याशिवाय कशी राहील ? मला वाटतं जशी शरीराला ही हवा मानली, तशी ती तुमच्या मनालाही मानवलेलीच दिसते !

बाजी०—कसली, कसली हवा म्हटलंत ?

वि०ः—हवा कसली असणार ? हवेसारखी हवा. पण ही हवासुद्धां स्थलमानाप्रमाणं बरी वाईट असतेच ! एकंदरींत तुम्हांला ही हवापालट चांगली गुणकारक झाली.

बाजी०ः—म्हणजे ! मी शत्रूच्या बंदीखान्यांत असूनही प्रकृतींत सुधारत चाललों म्हणतां—!

वि०ः—शत्रू कोण ? आमचे महाराज ? जे स्वधर्मांकरितां स्वराज्य स्थापूं लागले आहेत, ते ? ते तुमचे, स्वधर्मीयाचे, शत्रू ? आमचे महाराज कांहीं तुम्हांला शत्रू समजत नाहींत. आणि म्हणूनच तुम्हांला ही हवा चांगली मानली आहे.

बाजी०ः—अशानं कांहीं मी बनायचा नाहीं आं !

वि०ः—वाः ! इतकं तरी तुम्हांला समजूं लागलंय म्हणायचं ! तुम्हांला बनवून आम्हांला काय करायचं ? आमच्या महाराजांना बनलेले, मारून

मुटकून म्हसोबा केलेले, बनबीर नकोच आहेत. आम्हांला जातीचेच लोक पाहिजे आहेत. आणि जे जातीचे आहेत, ते आपोआप महाराजांच्या निशाणा-खालीं येतच आहेत. अहो जावळीकर राजे–तुम्ही अगदीं स्वस्थ असा हां–एखाद्याला वनविण्याच्या आधींसुद्धां आम्ही त्याला कस लावून पहात असतोंच. त्या कसाला तुम्ही उतरणार नाहीं, हें अगदीं स्पष्ट दिसत आहे. तुम्ही जावळीकर राजेच आहांत झालं ?

बाजी०:—आहोंतच आहोंत, यांत तें तुम्हांला काय वाटलं ! हा पहा या बाजूचा हा कृष्णेच्या उगमापर्यंतचा सर्व मुलूख आमचाच आहे. या मुलुखाचे राजे आम्हीच आहोंत.

विश्वास:—कोण ? तुम्ही ? काय ही आत्मवंचना ? अहो राजे, तुम्ही या मुलुखाचे मालक कीं अदिलशाही ? तुम्ही अदिलशाही राजे आहांत. ईश्वरकृपेनें तुम्ही चांगले लढवय्ये, धुरंधर वनराज आहांत. पण अदिलशाहीनं ' राजे ' या पदवीचा आपल्या शिक्क्याचा पट्टा तुमच्या गळ्यांत बांधून तुम्हांला तुमची आयाळ हें काय आहे, याचीही विसर पाडली आहे. तुम्ही राजे आहांत, पण अदिलशाहीनं दिलेला राजे हा किताब तुमचा पदोपदीं इतका तेजोभंग करीत आहे कीं, तुमच्यांतल्या त्या स्वाभिमानाच्या रक्ताची खळाळीच बंद पडली आहे. परदेशाच्या हातांतल्या कच्च्याच्या आवाजा-वर नाचणाऱ्या अस्वलाप्रमाणं तुम्ही ' राजे ' या किताबाच्या मोहिनीवर आपल्या भीमपराक्रमाला विसरून खुशाल नाच करतां आहांत. जगांत कोण कुणाला चेपतं विशेषतः तें कां चेपतं, हें पहाण्याची कांहीं स्वतंत्र शक्ति तुम्हां ' राजां ' च्या दृष्टीला राहिली आहे काय ? तुम्ही राजे लोक असे त्रासदायक झालां आहांत कीं, स्वतः तुम्ही तर स्वधर्माच्या उद्धारार्थ कांहीं करण्याचं मनांतसुद्धां आणीत नाहींच पण दुसरा कोणी कांहीं करूं लागला तर त्यालाही तुम्ही आडवे येतां. आपलं नाक कापून दुसऱ्याला अपशकून करणं तें हेंच !

बाजी:०—मी तुमचा कैदी आहें, म्हणून तुम्ही मला वाटेल तें बोलत आहां ! मी कोण, तुम्ही कोण, तुमचा माझा दर्जा काय याचा विचार करा. मी बादशाही ' राजा ' आहें.

विश्वास:—हा पाहिलांत ' राजे ' या किताबानं आणखी केवढा अनर्थ

करून ठेवला आहे तो ! किताब असला कीं, सामान्य प्रजेपेक्षां आपण कोणी विशेष आहों, अशी मनांत दुष्ट भावना बळावत जाते, आणि अर्थात् त्यांच्यापासून फटून राहण्याची इच्छा जोरावते. तुमचे पूर्वज महापराक्रमी. त्यांच्या पराक्रमाचा फायदा स्वबांधवालाच मिळावयाचा—पण अदिलशाही धूर्त. तिनं पदव्यांची खैरात करून त्यांना आपल्याकडे ओढून घेतलं !

बाजी०:—प्रत्येक इसम राजा व्हावा असं तुमचं म्हणणं वाटतं ! आज तरी शिवाजीच्या मुलुखांत, अदिलशाहीचे जसे आम्ही, तसे कोणी शिवाजीचे पदवीवाले असतीलच कीं नाहीं ? उगीच तुम्ही अदिलशाहीच्या नांवानं कां ओरडतां ?

विश्वास:—आम्ही कुणाच्या नांवानं ओरडतों, हेंसुद्धां तुम्हांला कळूं नये, केवढं हें तुमचं घोर अज्ञान ! आम्ही सामान्य लोक कोणत्या विलक्षण परिस्थितींत आहोंत, याची तुम्हांला कल्पनाही येत नाहीं. तुम्ही आमच्यांत मिसळलां असतां कीं, वस्तुस्थितीचं पूर्ण खरं ज्ञान तुम्हांला झालं असतं. या सगळ्या अनर्थाचं कारण तुमचा हा ' राजे ' किताब! आम्ही सामान्य लोक आणि तुम्ही कर्तबगार बहाद्दर यांच्यामध्यें हा किताबरूपी प्रचंड काळसर्प उभा आहे. हा काळसर्प तुमच्या वारुळांत राहून आपणां उभयतांनाहि एकमेकांपासून दूर ठेवण्याचं अदिलशाहीला उपयुक्त असं कार्य साधतो. तुम्ही तुमचा किताब लाथाडा कीं पहा, जग तुम्हांला कसं दिसतंय तें ! आणि खरं जग तुम्हांला दिसलं कीं, तुम्हीही आमच्याप्रमाणंच अदिलशाहीच्या नांवानं खडे न फोडतां, किताबवाल्यांच्याच नांवानं चडफडूं लागाल. अदिलशाही किती धूर्त ! तुम्ही किताबवाले ' राजे ' आणि आम्हीं सामान्य लोक यांच्यांत भांडणं लावून देऊन ती खुशाल चांदरात करीत आहे. पण हें तुम्हांला उमजतंय कुठं ?

बाजी०:—उगीच सुखाचा जीव दुःखांत कोण घालील ? हातचं सोडून पळत्याच्या मागं कोण लागेल ? तुम्हांला काय आंगाला धरला तर रोडका आणि शेंडीला धरला तर बोडका, अशी तुमची स्थिति; तुमच्या नादाला आम्ही लागलों तर, अदिलशाही आमच्या वतनावर गाढवाचा नांगर फिरवील ! नाहीं त्या फंदांत कोण पडेल बाबा. उचलली जीभ लावली टाळ्याला !

दुसऱ्याला उपदेश करायला काय जातं ! शिवाजीचं तरी काय ! गाजराची पुंगी वाजली तर वाजली नाहीं तर चावून खाल्ली !

विश्वासः—तें कसं काय ? सांगा तरी एकदां. श्रीशिवाजी महाराजांची कामगिरी तुम्ही कोणत्या दृष्टीनं पहातां तें तरी समजूं द्या.

बाजी०ः—अहो, शहाजी राजे तिकडे बादशाही मनसबदार आहेतच. स्वधर्म, स्वराज्य, जुल्म, जबरदस्ती, अंधेर नगरी, झोटिंग पाच्छाई, काय वाटेल तें म्हणून नाखूष लोकांना चेतवीत शिवाजी खुशाल मुलूख मारीत आहे. यदाकदाचित् विजापूरकरांनीं धरलाच तर प्रत्यक्ष बापच तिथला मनसबदार, कांहींतरी लटपट करून सुटेलच, प्रसंग पडल्यास नाकसुद्धां घांसून माफी मागेल. इतकं झालं तरी तोंपर्यंत त्यानं केलेली या असल्या लुटमारींतली कमाई त्याच्या पदरांत पडणारच ! बरं, विजापूरकर हरलेच तर चाललंच आहे याचं लूटमारीचं काम ! नुकसान होणार तें तुम्हां सामान्य लोकांचं ! मुलूख मारणार तो, मरणार तुम्ही ! शहाजी राजे लटपट करणार त्याचेकरितां, तोफेच्या तोंडीं जाणार तुम्ही ! गबर होणार तो, भिकारी ते भिकारी असे रहाणार तुम्हीच ! त्याच्या पदरांत तुमच्या जोरावर कमावलेली संपत्ति पडणार, आणि तुमच्या पदरांत त्याचे केलेले जयजयकार आणि त्याच्याकरतां केलेली पायपीट एवढंच येणार ! पण हें तुम्हांला समजायचं नाहीं. स्वधर्मसंस्थापनेच्या गोड नांवावर आज शिवाजी खुशालचंद झाला आहे. त्याचा हा किफायतशीर धंदाच झाला आहे. तुम्हां सामान्य लोकांना अदिलशाहीच काय प्रत्यक्ष द्वापारच्या श्रीरामचंद्राची शाहीसुद्धां सुखावह कधींच वाटणार नाहीं. तुम्ही नेहमींच असंतुष्ट असणार. शिवाजीनं हा तुमचा गुण पुरता ओळखला आहे.

विश्वासः—पण मी म्हणतों, याच गुणाचा फायदा तुम्हीही कां घेत नाहीं ? (संभाजी कावजी, राघो बल्लाळ अत्रे, प्रवेश करितात.) तुम्हीही आमच्या महाराजांप्रमाणंच स्वतंत्र प्रयत्न करा, अगर महाराजांच्या मदतीस या—

संभाजी कावजीः--अगर स्वस्थ बसा. काय विश्वासराव, राजे कोणतं कबूल करतात ?

राघो बल्लाळः--मला वाटतं स्वतंत्र काम करावं असंच म्हणतील.

विश्वासः—पण त्यांना अदिलशाही प्राणापेक्षांही प्यार आहे.

संभाजी०:—पण आतां नाहीं त्यांना तसं वाटणार ?

बाजीः—कां बरं ? आतां असं विशेष काय झालं आहे ?

संभाजी०:—तुम्हांला सोडवावं म्हणून जावळींतून बरेच लोक आले होते, पण रायरीच्या पायथ्याशीं त्यांच्यावर आमच्या लोकांनीं छापा घालून त्यांची दाणादाण करून सोडली !

बाजी०:—छेः ! कांहींतरी म्हणतां झालं !

संभाजी०:—खोटं वाटत असेल, तर हें पहा तुमचं हिरवं निशाणसुद्धां (शिपायांकडून हिरवं निशाण आणवून दाखवितो) आमच्या हातीं लागलं आहे ! तुमचंच ना हें निशाण ? परंड्याच्या लढाईंत तुमच्या पूर्वजाला, यशवंतराव मोरे यांना, अदिलशाहीनं दिलं तें हेंच ना तुमचं निशाण ?

बाजी०:—(आवेशानें) हें निशाण तुम्ही दगेबाजीनं आणलं ?

राघो०:—नाहीं, राजरोस लढून—

बाजी०:—माझे वडील चंद्रराव जिवंत असतां ? तो जावळीचा वाघ जिवंत असतां ? त्याच्या जिभेला हात घातलात ?

राघो०:—कैफ करून लांब जीभ करून पडल्यावर—

बाजी०:—काय ? त्याला बेसावध असतां हें काम केलंत ? शिवाजीचेच लोक तुम्ही. तुम्हांला नीतिन्यायाची किंमत काय ? त्या माझ्या पित्याला कैफांत असतांना फसाविलंत ?

संभाजी०:—रावसाहेब,तुमचा आमचा घरोबा असतां,आम्ही असं कांहीं करूं असं तुम्हांला वाटतं तरी कसं ? तुम्हांला सोडविण्याकरितां जे लोक आले त्यांच्याबरोबर चंद्रराव जातीनं आलेच असते तर कदाचित् बरीच शर्थीची गर्दीही उडाली असती ! इतक्या एवढ्याशा छाप्यानंच तुमच्या लोकांची दाणादाणसुद्धां उडाली नसती !

बाजी०:—मग खुद्द राजे आलेच नव्हते म्हणावयाचे ! मग कोण आले होते ? माझे काका सूर्यराव, कीं दिवाणजी हणमंतराव ?

राघो०:—कोणी का असेनात ! तुमचे वडील नव्हते, एवढं मात्र खरं ! तुमचे ते विजापूरचे सरदार बाजी शामराज ? तेही पुन्हां आले होते. काय हो बाजीराव, बाजी शामराज आले तरी होते किती सैन्यासह ? तुम्ही

जावळीकर राजे खंबीर म्हणूनच असल्या बऱ्या धेंडांची सरबराई करतां! किती बरं लोक आले होते?

संभाजी०:—थोडे थोडके तर मुळींच नव्हते. आम्ही जावळींत होतों, तेव्हां हशमगडाखालीं त्यांच्या लोकांचा तळ पडला होता. हदावीस हजार तरी लोक असतील!

बाजी०:—बारा हजार होते!

राघो०:—अबब! केवढं प्रचंड हें सैन्य!

बाजी०:—अहो, कसलं प्रचंड घेऊन बसलांत! सगळे ऐदगब्बू! आमचा एखादा एकांडा सुटला असता तर त्यानं त्यांची दाणादाण करून सोडली असती. चंद्रराव राजे यांच्या लक्षांत तें आलं. म्हणून त्यांनीं आमच्या लोकांना तुमच्यावर पाठविलं. विजापुरचे ऐदगब्बू लोक आपल्या या पहाडी मुलुखांत तर केवळ मेषपात्रच होत. आमच्या लोकांबरोबर राजे असते तर समजलं असतं तुम्हांला जावळीकरांचं पाणी—

संभाजी०:—कां बरं? तुमच्या लोकांनीं खरोखरच फारच शर्तीचं हत्यार केलं! आतां अडचणीच्याच जागेंत आम्हीं त्यांना गांठलं,त्याला ते काय करतील? बरं राघोपंत, आतां रावसाहेबांना महाराजांची आज्ञा कळवूं या.

राघो०:—हो–महाराजांच्या आज्ञेबाहेर आपणांला मुळींच जातां येणार नाहीं. बाजीराव, आमच्या महाराजांची आज्ञा संभाजी कावजी सांगतात ती ऐका.

बाजी०:—बोला, कोणती बरं– ?

संभाजी०:—पहिली आज्ञा अशी आहे कीं,आम्हीं तुम्हांला कैदेंतून मुक्त करून जावळीपर्यंत सुखरूप पोंचवून द्यावयाचं. राजे बाजीराव, तुम्ही आतां, मोकळे आहांत. आणि बादशाही सरदार या नात्यानं आमचा हा मुजरा स्वीकारा. (सगळे मुजरा करतात.) मान्यतेच्या पदावर चढलेल्या शत्रूचाही आमचे महाराज योग्य मान राखतात, याची जाणीव विसरूं नका. आतां आमचे लोक तुम्हांला तुमच्या ठिकाणीं सुखरूप पोंचवितीलच.

राघो०:—बाजीराव, शहाजी राजांचे शिवाजी महाराज, तसेच आपण चंद्रराव राजांचे बाजीराव व्हाल तर किती बहार होईल?

संभाजी०:—पहा याचा विचार करा. स्वातंत्र्यलक्ष्मीच्या मुकुटांतला हिरा होण्याचं कांचेच्याही नशिबीं नसेल तरी कशावरून? किंवा कांच आणि हिरा

यांची तरी प्रसंगांवरून पारख होईल. स्वातंत्र्यलक्ष्मीच्या मुकुटांतले अनेक हिरे व हिरकण्या कुठं कुठं विखुरल्या आहेत, तें कुणाला आणि कसं समजणार ? हें ज्याच्या त्याच्या कर्तबगारीवरूनच समजून येणार. अशी कांहीं कामगिरी तुम्हीं दाखविली तर पाहिजेच आहे. मग आम्ही तुम्हांला 'राजे' म्हणून मुजरा न करतां—

बाजी०:—नको–नको, संभाजी कावजी, 'राजे' हा किताब. हा अदिलशाही किताब राहून काय करतां येईल तेंच आम्ही करणार.

राघो०:—बरं आपली मर्जी ! संभाजी, मग तर सांगा 'राजे' हा किताब राहून राजांना काय करतां येईल तें.

संभाजी०:—राजे बाजीराव, सध्यांची धर्मस्थिति आणि देशस्थिति तुम्हांला माहीतच आहे. होनाप्पा देशपांडे, मोरो तानदेव, श्रीनिवासरवा वगैरे बादशाही किताबवाल्यांनीं स्वतंत्र निशाण उभारलंच आहे. आमच्या महाराजांनीं तसंच केलं आहे. तुम्ही असंच करा,हें तुम्हांला कोण सांगणार ?

बाजी०:—नको–नको–तें सांगूंच नका.

राघो०:—कां उगीच राजहंस व्हा म्हणतां ? महाराजांची आज्ञा तेवढी त्यांना सांगा.

संभाजी०:—महाराजांचं म्हणणं असं कीं, तुमच्या आमच्या सरहद्दी आतां एकमेकीशीं येऊन अगदीं भिडल्या आहेत. तेव्हां तुमच्या बाजूनं आम्हांला तोशीस पोंचूं नये, अशा स्वतंत्र बाण्यानं वागा, असा राजे चंद्ररावांना आमचा निरोप कळवावा. बाजी शामराज यांना तुम्हीं तुमच्या मुलखांतनं वाट तर दिलीच; पण आणखी ससैन्य मदतही केलीत. तुमच्या आमच्या घरोब्याकडे लक्ष देतां असं होऊं नये. रीतसर या बाबतींत आमचे वकील थैली घेऊन येतीलच. तरी पण तुम्ही हा निरोप म्हणून कळवाच.

राघो०:—उगीच कटकट होऊं नये एवढाच हेतु आहे.

बाजी०:—मी हा निरोप कळवितों.

संभाजी०:—सलोखा राहील असा प्रयत्नही करा.

बाजी०:—पाहूं या कसं काय जमतं तें.

संभाजी०:—चला तर आतां–तुम्हांला पोंचविण्याची सगळी व्यवस्था झाली आहे. (विश्वासखेरीज सगळे जातात.)

विश्वासः--(जंगल पडद्यावर येऊन) हे रावसाहेब, खरोखरच बडे बापके बेटे ! यांचा उपयोग स्वतःच्या वडिलांना तरी होईल कीं नाहीं, याची शंकाच आहे. श्रीशिवाजीमहाराज-(चपापून) काय म्हटलं मीं हें ! मी तरी इथं आलें आहें, ती कांहीं भेद निघतो का पहावा याचसाठीं ना ? मग मला या शत्रूबद्दल आदर कां बरं वाटावा ? माझं मलाच नवल असं वाटतं कीं, स्वधर्म-संस्थापनेचं महत्त्व यच्चयावत् मराठे मंडळांत एकदम कां बरं शिरूं नये ? अदिलशाहीच काय पण निजामशाहीसुद्धां मराठ्यांच्या रक्तावरच वाढली, मराठे वीरांनीं या ब्राह्मणी राज्याच्या तुकड्यांना आपल्या पराक्रमाच्या जोरावरच सांवरलं, पण याच अदिलशाहीच्या अमदानींत मराठ्यांचा जो धर्म-जो हिंदु धर्म-त्याचं रक्षण कां बरं होऊं नये ? यांत कसूर कोणाकडे आहे बरं ? बादशाहाची का खुद्द मराठ्यांची ? बादशाहा मुसलमानी धर्माचा असला तरी तो स्वतः तरी त्या धर्माकरितां विशेष असं काय करीत आहे ? मुसलमान लोकच आपल्या धर्माबद्दल कोणत्याही प्रकारची हयगय न करतां काळजी घेतात. प्रसंगीं हट्टही धरतात. अर्थात् बादशाहाही काय विशेष मेहेरबानी दाखवीत असेल तीच ! आणि आम्हां हिंदूंचं पहावं तर सर्वच विलक्षण ! काय कारण आहे कोणाला ठाऊक. पण पहावं तर स्वधर्माविषयीं आम्ही मराठे जितके उदासीन आहोंत तितके कांहीं मुसलमान लोक आपल्या धर्माविषयीं खात्रीनं तटस्थ नाहींत. यामुळें हिंदुधर्माच्या विरुद्ध कांहीं आगळीक झाली तर तिची दाद कडेपर्यंत जात नाहीं, आणि दोष मात्र बादशाही रिसायतीच्या माथीं बडवतो ! मला वाटतं मुळापासून मराठ्यांनीं कडकपणा धर्माच्या बाबतींत मुसलमानांप्रमाणंच धरला असता तर स्वधर्मसंस्थापनेच्या विशिष्ट कार्याची जरूरच पडली नसती. आज जी श्रीशिवाजी महाराजांची (चपापून) पुनः श्रीशिवाजी ! काय हा चमत्कार ! माझ्या तोंडांतून त्या थोर विभूतीबद्दल एकेरी असं कांहींच कसं बोलवत नाहीं तें ! हें स्वधर्मसंस्थापनेचं कार्य, यांत येणारीं संकटं, याला असलेले गुप्त व उघड शत्रू, या सर्वांचा विचार मनांत आला, कीं शत्रू असला तरी तो थोर पुरुष वंदनीयच वाटतो. माझ्या मनाच्या स्थितीकडे पाहिलं तर मला वाटतं त्या वंदनीय पुरुषाला पाहिलं कीं, वृद्ध स्त्रियांना वात्सल्याचा पान्हा फुटत असेल, विवाहित तरुण स्त्रियांना बंधु-प्रेमाचा उमाळा येत असेल आणि कुमारिकांना-कुमारिकांना काय बरं ? अंतःकपाटांतल्या

सूक्ष्म मनोभावने, कुमारिकांना काय वाटत असेल बरं? पण इश्श ! हा विचार बोलून का दाखवितां येतो—

पद १० वें.

नच मन अधीरा असारा । न थारा मोह सारा ॥ धृ० ॥
मतलब या, दुनिये साधिला । जाणिव घे तो सुख लाधला ।
शिव-नृप-पद-किंकर-दारा ?। मोह सारा ॥ १ ॥

प्रवेश दुसरा.

[**स्थळः**—वासोटा किल्ल्यानजीकचा भाग.]

शिवाजीः—(बहिरजीस) बहिरजी, अरे, ही तर वासोट्याची माची आली. अजून कां बरं सद्गुरुमूर्ति कुठं दिसत नाहीं ? तो मघांचा शेतकरी काय म्हणाला, तूं नीट ऐकलं होतंस ना ? इतके आपण शोधतों आहोंत, अद्याप कांहीं दर्शन होईना. इथं आहेत म्हणून सांगतात आणि मोठ्या आशेनं धापा टाकीत यावं तर कुठं कांहीं थांगच लागत नाहीं ! जा बरं पहा, आसपास कुणाला तरी विचारून पहा.

बहिरजीः—सरकार, हा किल्ला तर खुद्द जावळीकर मोऱ्यांचा. आपण अगदीं सडे असे याच्या अगदीं माचीवर आलों आहोंत. मला वाटतं आपण पुन्हां झाडींत शिरूं या. चला महाराज, चांगल्याशा जाळींत आपण थोडी विश्रांति घ्या. आज एक आठवडा होऊन गेला, आपणांला विसांवा तो कसला नाहीं. आंगावर तर केवढं जोखमीचं काम. तेंही सोडून दिलं. सारखी पायाला पानं पुसलीं आहांत; काय म्हणावं ? ऊन नाहीं, तहान नाहीं, दिवस नाहीं, रात नाहीं, सारखे फिरताहांत, आणि ते तरी कुठं तर चंद्ररावासारख्या काळाच्या मुलुखांत ! सरकार, ऐका, ऐका. थोडंसं माझं. वासोट्याच्या चौकी-वाल्यांनीं अजून आपणांला पाहिलं नाहीं, तोंवर चला, आपण इथनं दूर होऊं या. चला म्हणतोंना सरकार, या आपल्या बहिरजीला एवढी भिक्षा नाहींच का घालायची ?

शिवाजीः—बहिरजी, अरे, सद्गुरुवांचोनी सांपडेना सोय । धरावे ते पाय आधीं आधीं ॥ अशी तर सत्पुरुषांचीच आज्ञा आहे. अरे, व्यक्तिमात्राला

संसारसमुद्रांतून पलीकडे जाण्याला सद्गुरुवांचून दुसरी टिकाऊ नौका नाहीं. व्यक्तिमात्राची ही कथा, तर आपण स्वधर्मसंस्थापनेच्या कार्याची जोखीम आपल्या शिरावर घेतली आहे, तिची अवस्था काय बरं ? यःकश्चित् एखादी व्यक्ति स्वतःच्या सुरक्षित आयुःक्रमाकरितां सद्गुरुपदाचा आश्रय करिते; तर ज्या कार्यांत एक नव्हे, दोन नव्हे, असंख्य व्यक्तींच्या, सर्व महाराष्ट्राच्या अंतिम कल्याणाचा प्रश्न उत्पन्न होतो त्या आपल्या स्वराज्यस्थापनेच्या-स्वधर्म-कार्याच्या व्यवस्थित मांडणीबद्दल आणि प्रपंचाबद्दल आपणांला सद्गुरु नको काय ? स्वधर्मसंस्थापनेच्या कार्यासाठीं तर माझ्या देहावर मीं केव्हांच तुळसीपत्र ठेवलं आहे. सद्गुरूचा शोध मी याच पवित्र कार्याकरितां करीत आहे. एखादा किल्ला सर करतांना शत्रूनीं मला मारलं तर ? अरे, 'देहं वा पातयेत् । अर्थं वा साधयेत्॥' हा तर आपला बाणा आहे. किल्ला सर करतांना तरी जो देह केव्हां ना केव्हां तरी पडणार, तोच सद्गुरूच्या शोधार्थ नाहींसा झाला तर काय नुकसान आहे ? सर केलेला किल्ला शत्रू केव्हांतरी परत घेतील ही धास्ती असतेच. पण एकदां प्राप्त झालेला सद्गुरु कोणत्याही शत्रूला हिरावून घेतां येणार नाहीं. केवळ माझ्या स्वतःकरितां नव्हे,तर सर्व महाराष्ट्रा-करितां मी सद्गुरु शोधीत आहें. एवढ्यासाठीं मी सारा महाराष्ट्रच काय; पण सारं भारतवर्ष पालथं घालीन. संकटांना बेलाशक तुडवीन. मृत्यूला 'हां थांब' म्हणेन. काळाला धाकवीन,पण शेवटीं सद्गुरुमूर्तीला गांठून त्या पवित्र चरणा-वर दंडवत् पडेनच पडेन. महाराष्ट्राकरितां तरी मला हें धाडस केलंच पाहिजे.

बहिरजीः—सर्व कांहीं करा, पण महाराज, सावधपणानं करा. आपण शत्रूच्या मुलुखांत आहोंत.

शिवाजीः—पुनः तेंच ! अरे बहिरजी, तूं आज इतके दिवस माझ्या-बरोबर उपाशीतापाशी कां भटकत फिरतो आहेस ?

बहिरजीः—कां म्हणजे, याच पायांसाठीं--

शिवाजीः—तसाच मीही त्या चरणांसाठीं भटकतों आहें, आतां तरी पटलं का ? आतां तूं म्हणतोस कीं, शत्रूच्या मुलुखांत आपण फिरतों आहोंत, संकटं येतील, कदाचित् प्राणावरही बेतेल. पण तुझ्या एवढं कसं लक्षांत येत नाहीं ? संसारबंधन तोडणारा माझा समर्थ सद्गुरु, या असल्या ऐहिक संकटा-ची उपेक्षा करील ? आणि समज, कीं ऐहिक संकटांनीं आपणांला अपायच

केला, तर मग सद्गुरूच्या चरणांपाशीं राहण्याला आपण योग्यच नव्हे, म्हणजे ज्यासाठीं आपण सद्गुरुचा शोध करितों आहोंत त्या स्वधर्मसंस्थापनेच्या कार्याच्या अग्रभागीं राहण्यालाही आपण अयोग्यच आहोंत, असा नाहीं का आपोआपच निकाल लागणार ? जा, तूं या भागाला सद्गुरुमूर्ति कुठं संचार करते आहे याचा तपास काढून ये, जा.

बहिरजीः—जातों महाराज, पण आपण मी येईतोंपर्यंत इथंच कुठं तरी आसपास असा. चुकामूक पडेल नाहीं तर. येतों तर मी. तरी महाराज, थोडं सावधच असावं हें बरं. (जातो.)

शिवाजीः—(स्वगत) अरे, मी बेसावध राहिलों तरी तुम्हां निःसीम स्वामिभक्तांला दुःख न व्हावं म्हणून तरी माझी काळजी त्या परमेश्वराला घ्यावी लागेलच! सद्गुरो, आतां या दासाचा आपण अंत तरी किती पहाणार?

पद ११ वें.

नता कां तात टाकितां? । गुरुराया पावना आतां ॥ धृ० ॥
दास उदास भवांत रहाया । आतुर अंतर पदा पहाया ।
नेई अहंता । आतां न जातांच ताता धांव ना नाथा ॥१॥

माझं एक जाऊं दे. हजारों पामरं प्रत्यहीं परंधामास जात आहेत, त्यांतलाच मीहि एक. पण सद्गुरो, स्वधर्मसंस्थापनेच्या कार्याची स्फूर्ति माझ्या मनांत उत्पन्न करून मला त्या कार्याला आपण लावलं आहांत. आणि आतां आपणच जर सद्गुरो, माझ्या साह्यार्थ न आलांत तर अपेशाचा धनी मी तरी कसा होईन बरं! सद्गुरो, या आपल्या दीन दासाचं कांहीं उणं दिसलं तर त्याची लाज कुणाला ? हा तुझा बालक तुझ्या मायेच्या सांवलीविना अगदीं उघडा पडला आहे, तरी याचं आतां दैन्य नाहींसं नाहीं का करायचं ? सद्गुरो, सद्गुरो,–(इतक्यांत एक कुणबी प्रवेश करतो त्यास) या बाजूला कोणी एखादा दाढीवाला बुवा तूं पाहिलास काय रे बाबा ?

कुणबीः—दाढीवाला ? उंचा पुरा जवान हाय न्हाई ?

शिवाजीः—होय रे होय ! कुठं बरं पाहिलास ?

कुणबीः—काळीभोर दाढी, आन् डुईचं क्येस बी चांगल लांब सडक ?

शिवाजीः—होय-होय-कुठं, कुठं पाहिलंस ?

कुणबी:—डोळे मोठे, नाक चांगलं सरळ, तेज पुन काय मारतय, जनू डोनींत घातलेला पिवळाधमक गुळाचा रवाचं !

शिवाजी:—होय. तेच रे–सांग, सांग बरं कुठं पाहिलेस ते ?

कुणबी:—आंगांत झगा भगवी कफनी हाय, योका हातांत माल हाय, सारखा जप चाललाया, आन् दुसऱ्या हातामंदी एवढाच–मुंडाहाताएवढाच–दंडुका हाय बगा. (श्रीशिवाजी महाराज—' सद्‌गुरो ' म्हणून उभ्यानेंच सद्‌गुरुस्वरूपी तल्लीन होतात.) पायामंदी खडावा हायती; आन् त्ये कुठं हायती ठाव हाय का ? (पहातो ते डोळे झांकून उभे, आश्चर्यानें) ये बावा, आं, उभ्या उभ्या झोंप घेतुया काय ! ये गिरस्ता, आँ, काय हाय ह्ये !

शिवाजी:—(डोळे न उघडतां) सद्‌गुरो, (त्या कुणब्याच्या पायावर मस्तक ठेवतात.)

कुणबी:—(चपापून त्यांना हालवून शुद्धीवर आणतो.) अर बावा, काय करतुयास र ? कुनाचा र पाय धरतुयास ? त्यो दाढीवाला बुवा तुला हुवा व्हय ?

शिवाजी:—सांग, लवकर सांग रे, नाहींतर जातील आणखी कुठं तरी !

कुणबी:—त्य बग, त्य दिसतंय ना त्य, हां हंग त्यच. त्याच देवळामंदी ग्येलेल म्यां बगितलं बग.

शिवाजी:—कोणत्या ! त्या–त्याच देवळांत का ? (श्रीशिवाजी पळतच जातात.)

कुणबी:— त्या चिचच्या झाडामंदी दिसतंया त्ये,–(ते जवळ नाहींतसे पाहून) आँ ! काय गिरस्त हाय हा ? धूमच ठोकीत ग्येला कीं ! कोन बरं हा असावा–आन् त्या दाढीवाल्याच्या मागं का लागलाया इत्का ! चला, आपुन बी जाऊंया देवळाकड; आन् बगु या काय काय गंमत होतीया ती ! (जातो.)

[इतक्यांत पडदा वर जाऊन किल्ल्याच्या पायथ्याचें देऊळ दिसतें. देवळाच्या पुढील भागाला भिंतीऐवजीं लांकडी गज असून दाराला कुलूप लावलें आहे. आंत महादेवाची मूर्ति असून श्रीशिवाजी महाराज पळत येतात तों त्यांना महादेवाच्या पिंडीच्या ठिकाणीं सिद्धासन घालून बसलेली श्रीसमर्थ रामदासांची अस्पष्ट मूर्ति दिसते. ' आहा हा सद्‌गुरो ' म्हणून श्रीशिवाजीमहाराज आधीं साष्टांग नमस्कार घालतात.]

शिवाजी:—(पुनः पुन्हां नमन करून स्वगत) सद्गुरु माऊली आंत आहे हें न समजतां गुरव कुलूप घालून गेलेला दिसतो. आतां त्या गुरवाला कुठं शोधावा ! गुरवाला शोधण्याची जरूरच काय ? कुलूपच फोडावं आणि आधीं श्रीसद्गुरूची मुक्तता करावी. (श्रीशिवाजी महाराज दगडानें कुलूप फोडूं लागले असतांः—बहु काळ गेले देवासी धुंडितां । देवें पाहो जातां जवळीच ॥१॥ जवळीच असे पाहातां न दिसे । संन्निधची वसे रात्रंदिस ॥२॥ रात्रंदिस देव बाह्य आभ्यंतरी । जीवा क्षणभरी विसंभेना ॥ ३ ॥ विसंभेना परी जीव हे नेणती । जाती अधोगती म्हणोनीयां ॥ ४ ॥ म्हणोनीयां सदा सावध असावें । विमुख नसावें राघवेसी ॥५॥ या ओंव्या देवळांतून ऐकूं येतात. श्रीशिवाजी महाराज प्रत्येक ओंवी लक्ष्य देऊन ऐकतात. प्रत्येक ओंवीच्या अखेरीला ‘ खरं आहे.’ ‘अगदीं खरं आहे. पण समजतं कुणाला ?’ ‘आम्हां जीवांना हें कां बरं समजत नाहीं ?’ ‘अरेरे, केवळ अज्ञानाचा परिणाम !’ ‘नाहीं, कधींहि विमुख होणार नाहीं ?’ याप्रमाणें ओंवीस प्रत्युत्तर देऊन पुन्हां कुलूप फोडूं पाहतात तोंः—अहंभावें राम भेटला न जाये । जवळीच होये दुरी कैसा ॥१॥ या ओंवीला कुलुपावर घांव घालतां घालतां ‘आलों जवळच आलों.’ पुनः आंतूनः—जये ठायीं तुटे सर्वही आशंका । तेंचि लाभे येका गुरुमुखें ॥१॥ गुरुमुखें सत्य मानावें अंतरीं । वेंगीं सोये भरीं आलया रे ॥ २ ॥ ‘आलोंच चरणापाशीं आलोंच, काय दावा साधूं लागलंय हें कुलूप ! ’ पुन्हां एक दगड शोधून आणतात व अखेरीस कुलूप तोडून मोठ्या आशेनें ‘सद्गुरो सद्गुरो, मायबापा’ म्हणून आंत जातात तों काय ! आंत तर कांहींच नाहीं. अगदीं निराश व रडकुंडीच्या घाईला येऊन, स्वगत) सद्गुरु, आपण तर या इथंच याच ठिकाणीं शाळुंकेवर आसनस्थ असे मला दिसलां आणि आतांच कुठं बरं अदृश्य झालां ? आपल्या तोंडची ती अमृत-वाणी, तो अलभ्य लाभ, माझ्या कानीं पडला, होय सगुद्रो, तो मीच इथं ऐकला, या माझ्या कानांनीं ऐकला. सद्गुरो, आपल्या त्या अमृत वाणींत सगळ्या जगाचा उपदेश सांठविला आहे तो मी कसा विसरेन ? “ अहंभावें राम भेटला न जाये । जवळीच होये दुरी कैसा ॥ ” होय. असंच, अगदीं असंच आपण म्हणाला. आणि सद्गुरो, हा बालक मोठ्या उत्सुकतेनं अगदीं आर्त होऊन आपल्या चरणावर लोळण घेण्यासाठीं आला असतां आपण कां बरं असे अदृश्य

झालां ? ' अहंभावें राम भेटला न जाये ।' हा अहंभावाचा परिणाम काय ? अद्याप त्या मांगाचा–त्या अहंभावाचा वास माझ्या ठायीं आहे काय ! श्रीसद्‌गुरूचा सारखा ध्यास करीत असतांही, श्रीसद्‌गुरूंच्या दर्शनार्थ रानोमाळ वाऱ्याकडे तोंड करून पळणाऱ्या या पिसाटाला अजूनहि त्या अहंभावानं सोडूं नये काय ? त्या अहंभावाला जवळ येऊं देऊं नये, त्याचा वाराहि लागूं देऊं नये, असा निकोप भक्तिभाव या पातकी अंतःकरणांत अद्याप उत्पन्न झाला नाहीं काय ? ज्याच्या योगानं श्रीसद्‌गुरूशीं अंतराय घडतो, अशा त्या अहंभावाची संगती अद्याप या मनाला सोडावी असं वाटूं नये काय ? इतकं जर हें हृदय पातकी आहे, इतकं जर हें हृदय हट्टी आहे, इतकं जर हें हृदय आत्मघातकी आहे, तर अशा हृदयानं जिवंत राहून करायचं काय ? ज्या हृदयानं अहंभावाला थारा दिला त्याला हुसकून दे म्हणून सांगितलं असतांहि जें हृदय तसं कांहीं करीत नाहीं, आणि ज्या हृदयाला श्रीसद्‌गुरुपेक्षांहि अहंभावच जवळ करावासा वाटतो असं हें माझं हृदय, अशा या माझ्या हृदयानं, अहंभावाला थारा देऊन श्रीसद्‌गुरुमहाराजाला, माझ्या गुरुमाउलीला, माझ्या जिवींच्या जीवाला, माझ्या अंतिम साध्याला, माझा सर्वस्वाला दूर केलं, असं हें हृदय ठेवून काय करायचं ? ज्यानं माझी व सद्‌गुरूची ताटातूट केली, त्या या माझ्या हृदयाला आधीं माझ्यापासून दूर करतों ! याच्या या बंदिवासांतून मला आधीं मुक्त झालंच पाहिजे. सद्‌गुरो, आलोंच आलोंच पहा आपल्या चरणापाशीं. (मस्तक आपटून प्राण देऊं पहातात. इतक्यांत कडकडाट होऊन देऊळच त्यांच्या आंगावर कोसळतें. इतक्यांत वासोट्याचा किल्लेदार गांग नाईक आपल्या लोकांसह धांवत येऊन घाबऱ्या घाबऱ्या आपल्या लोकांस देवळाचा पडलेला भाग एके बाजूस करून घ्यावा म्हणून हुकूम करतो.)

गांग नाईकः—काढा रे, सावकाश पण लवकर काढा ! दगड माती, काढा, पण मोठ्या सावधगिरीनं काढा. (देहभानावर न राहतां) माझा प्राण आंत सांपडलाय रे, लवकर काढा रे, आहा हा ! साधू महाराज, तुम्ही ' देऊळ पडलंय, लवकर जा, आंत शिवबा सांपडला आहे, त्याला आधीं काढ, आणि त्याच्या स्वाधीन या किल्ल्याच्या किल्ल्या कर ' म्हणून सांगितलंत आणि चालते झालांत. पण माझे शिवराय मला सुखरूप मिळतील ना ? एकाएकीं देऊळ पडायला तें काय झालं ? वासोटा किल्ला घेण्याकरितां महाराज, आपण

स्वतःच कशाला आलांत ? नुसत्या निरोपावर मी किल्ला खालीं केला असता. महाराज, वासोट्याच्या किल्ल्याच्या माचीवर आपणांला अपघात झाला, हें अपेश या गांग नाईकाला नका देऊं. साधू महाराजा, माझे महाराज मला सुखरूप मिळूं देत. स्वधर्मसंस्थापनेच्या कार्यांत झिजणाऱ्या त्या थोर पुरुषाच्या पायावर ही वासोट्याची किल्लेदारी ठेवून अदिलशाहीच्या ताबेदारींतून सुटणार म्हणत होतों, आणि तसा योग्य वखत आला असतां, ऐन वेळीं असा घात कां बरं ? स्वधर्मसंस्थापनेचा रोपटा असा अकालींच वठून जायचा आहे काय ? आणि त्याचं अपेश या गांगनाईकावर फुटणार आहे काय ? लोक म्हणतील, महाराज देवळांत आहेत हें पाहून गांग नाईकानंच शिस्त धरून तोफ डागली व महाराजांना दगा केला. पण देवा नारायणा, मी तर महाराजांच्या भेटीची आर्त धरून बसलों होतों. मी का चंद्रराव मोरे आहे.–महाराजांच्या कार्यांत आडवा यायला ? (लोकांस) काढले काय रे ? बेतानं काढा रे. ढका लगेल, दुखापत होईल ! हाय रे शंभू महादेवा, देऊळ कोसळलं तेव्हां महाराजाचं काय झालं असेल ? (इतक्यांत ' सांपडलं, सांपडलं–हे पहा–हे पहा–कसं बसलं हायती ते ! नाईक, अहो नाईक, हे पहा तरी ध्यानस्थ कसं बसलं हायती ते ! इतक्या दगडाची रास पडली होती, पण कुठंबी एक ओरखडासुद्धां निघाला नाहीं बगा' असा एकच गलबला उठतो.) आहा हा ! खरोखरच वरदी पुरुष आहे. अशा पुरुषाला कसला धोका नी कसलं काय ? करा रे, दंडवत करा. (आपण पाया पडतो, त्याचे सर्व लोक त्यांच्यापुढें साष्टांग नमस्कार घालतात.) ऐका, माझे शूर शिपाई गड्यांनो, ऐका ! अदिलशाहीबरोबर स्वधर्माकरितां झगडणारा महात्मा तो हाच. आज तोरणा घेतला, उद्यां, तुंग पाडला, परवां तिकोना सर केला, पुरंदर, चाकण, कोंडाणा, सारे किल्ले ज्याच्या पायाशीं नुसत्या सहज लीलेनं लागले तो थोर पुरुष, तो स्वधर्मसंस्थापक हाच ! यानंच अदिलशाहीच्या जवड्यांतून आपणाला सोडविण्याकरितां कंबर बांधली आहे. यानंच अदिलशाहीच्या कडेकोट घनगंभीर बादशाही तक्ताला धक्के दे देऊन आपणांला स्वतंत्र करण्याचं कंकण बांधलं आहे. करा, याला नमस्कार करा. चंद्रराव मोरे कांहीं आपण नव्हत. आपण मराठे गडी आहोंत. आपणाला आपला धर्म पाहिजे ना ? धर्मासाठीं तुम्ही मरणार, कीं अदिलशाहीकरितां धर्म सोडणार ? बोला, तुम्हांला काय प्यार आहे ? तुमचा धर्म कीं अदिलशाही ?

सर्व लोकः—आमचा धर्म, आमचा धर्म, आमचा धर्म आम्हांला प्यार आहे. धर्माला एकीकडे करून आम्हांला अदिलशाहीची ताबेदारी नको.

गांग नाईकः—मग धर्मासाठीं झगडणाऱ्या या महात्म्याला मुजरे करा. (सगळे मुजरे करीत असतां, स्वतः किल्ल्यांचा जुडगा श्रीशिवाजी महाराजांपुढें ठेवून) महाराज, ह्या वासोटयाच्या या किल्ल्या आणि हा गांग नाईक यांचा स्वीकार करावा. हे माझे लोक, मी आणि हा वासोटा किल्ला आतां आपला आहे. स्वधर्मसंस्थापनेच्या कार्यांत आपण आमचा वाटेल तो उपयोग करून घ्यावा. (इतका प्रकार होत असतांना श्रीशिवाजी महाराज हळू हळू देहभानावर येतात. सर्व लोक आनंदित होऊन मुजरे करतात.) महाराज, आपण सुखरूप आहांत! हा गांग नाईक, या वासोटयाचा किल्लेदार, आपला दास, या सर्व लोकांसह आपल्या आज्ञेची वाट पहात आहे.

शिवाजीः—(उठून) श्रीसद्गुरुमूर्ति कुठं पाहिली काय ?

गांग नाईकः—वर किल्ल्यांत येऊन मागील दरवाजानं उतरून रानांत निघून गेले.

शिवाजीः—तुम्हांला दर्शन झालं ? गांग नाईक,तुम्हांला ती गोजरी मूर्ति दिसली ! नाईक, तुमच्या दृष्टीला तें सुंदर स्वरूप पडलं ? आणि मीच मात्र अभागी ! नाईक, कशाला मला या दगडांखालून बाहेर काढलंत ? श्रीसद्गुरु महाराज, आपण जर माझ्यापासून दूर दूर होऊं पहातां, तर मला जिवंत तरी कशाला ठेवलंत ? आयतं हें देऊळ कोसळलं होतं, यांतला एखादा लहानसा धोंडाही माझा कपाळमोक्ष करायला पुरला असता ! हे गुरु माउली,हे सद्गुरो, धांव-धांव आतां—(देहभानावर नसल्यामुळें पडणार इतक्यांत गांग नाईक वगैरे सांवरतात.)

गांग नाईकः—पाहिलंत ? आजवर तुम्हीं चंद्रराव राजांनाही पाहिलंत आणि आतां या तुमच्या नव्या मालकाला पहा. कैफामुळं हेलपाटे जात असतां त्यालाही तुम्हीं कितीदां तरी सांवरलं आहांत ! आणि याही मालकाला पहिल्याच मुजऱ्याला तुम्हांला सांवरावं लागत आहे. चंद्रराव राजाचा कैफ अमली आणि आपल्या या राजाचा हा कैफ कसला आहे बरं ? स्वधर्मसंस्थापनेची तंद्री मस्तकाला भिनली आहे त्याचाच हा परिणाम ! श्रीसद्गुरु मूर्तीच्या चरणकमलाच्या स्वर्गीय मधुर सुवासाला हा मराठा भ्रमर भुलला

असून गुंगला आहे. याला स्वधर्म आणि सद्गुरु या विलक्षण मादक दैवी पदार्थांचा कैफ चढला आहे. चंद्रराव राजाप्रमाणं हा कैफ अफूचा अगर माजुमाचा नाहीं. तसा कैफ करून स्वधर्मसंस्थापना करण्याची योग्यता यायची नाहीं. भक्तिभावानं लोण्यापेक्षांही मृदु झालेलं हें अंतःकरण कोणीकडे आणि मादक पदार्थानं जळून, होरपळून गेलेलं तें चंद्ररावाचं अंतःकरण कोणीकडे! बोला–बोला श्रीशिवाजी महाराजकी जय. (श्रीशिवाजी महाराजांच्या नांवचा जयजयकार चालला असतां बहिरजी धांवत येतो व श्रीशिवाजी महाराजही सावध होतात.)

बहि०:—महाराज, महाराज, साधू महाराज, त्या पलीकडील ओघळांतून वर त्या डोंगरांत जातांना मला दिसले.

शिवाजीः—चल–चल तर लवकर, आधीं त्यांना गांठूं या.

गांग नाईकः—(पायावर पडून) आधीं महाराज, या गरिबाचा स्वीकार करा. हा वासोटा किल्ला आपला आहे. या घ्या याच्या किल्ल्या! आधीं, किल्ल्यांत चला व थोडी विश्रांति घ्या. साधु महाराज नेहमीं कुठं असतात ती जागा मला ठाऊक आहे, ती जागा मी आपणांला दाखवीन.

बहि०:—नाईक, वासोटा किल्ला चंद्ररावाचा ना?

गांग नाईकः—होता–आतां तो महाराजांचा आहे. आम्ही तर संधी केव्हां येईल तेंच पहात होतों, पण अनायासेंच हा योग आला. ही कृपा त्याच साधु महाराजांची! देवळांत सरकार स्वारी सांपडली आहे, याची बातमी साधु महाराजांनींच मला दिली.

शिवाजीः—कोणीं? सद्गुरूंनीं?

गांग नाईकः—होय. त्यांनींच अगदीं धांवतच आले—

बहि०:—आणि?—

गांग नाईकः—आणि माचीवरच्या देवळांत माझा शिवबा सांपडला आहे—

शिवाजीः—**माझा** शिवबा–**माझा** शिवबा–सद्गुरो, या आपल्या शिवबाला अजून दर्शन कां बरं द्यावंसं वाटत नाहीं? अजून माझा अभिमान गळाला नाहीं काय?

बहि०:—साधू महाराजांनीं आणखी काय सांगितलं?

गांग नाईकः—वासोटयाच्या किल्ल्या चरणावर वहा म्हणून सांगितलं—

शिवाजीः—बहिरजी, सद्‌गुरूंनीं या वासोटयाच्या रूपानं आपल्या मार्गांत मोहपाश टाकलाय. या वासोटयाच्या नादीं लागून सद्‌गुरुमूर्तीची वाट आपण सोडतो का, पहाण्याची ही युक्ति आहे. पण हा श्रीसद्‌गुरूंचाच शिवबा आहे. हा या असल्या पाशांत कधींच सांपडायचा नाहीं. चल, चल बहिरजी, आधीं मला ती साजरी मूर्ति कुठं आहे ती दाखीव, चल.

गांग नाईकः—आम्हीं काय करायचं तें सांगा महाराज. त्याशिवाय आम्ही नाहीं सोडणार!

सर्व शिपाईः—जायचं तर आम्हां सगळयांना तुडवून चला. आम्ही नाहीं जाऊं देणार. (सर्व पुढें आडवे पडतात.)

शिवाजीः—पाहिलास बहिरजी, हा सद्‌गुरूंनीं कसा विलक्षण प्रसंग उभा केला तो! स्वधर्मसंस्थापनेच्या पवित्र कार्यांत मला लोकसंग्रहही पाहिजे आणि सद्‌गुरु-कृपाप्रसादही पाहिजे. हे लोक चंद्रावाचे, सद्‌गुरूंनीं एका चुटकीसरशीं माझ्या बाजूला आणून माझ्याच वाटेवर यांना आडवे पाडले आहेत. किती हा विलक्षण प्रसंग. पण यांतूनही मार्ग काढलाच पाहिजे. आधीं सद्‌गुरूंनाच गांठलं पाहिजे. लोक हो, उठा, उठा. या तुमच्या शिवबाकरितां तरी उठा. (सर्व उठतात.) तुम्हीं मला आपला म्हटलंच आहांत. सद्‌गुरु महाराजांच्या भेटीला मी चाललों आहें. आपल्या कार्याला सद्‌गुरु पाहिजेतच. तेव्हां त्यांना प्राप्त करून घेण्याकरितां मी निघालों असतां माझी वाट आडवूं नका. त्यानं आपल्या कार्याची हानि होईल. सोडा, सोडा माझी वाट. सद्‌गुरूंना गांठी पाडल्याशिवाय कसल्याही प्राप्तीला शाश्वति नाहीं. चला व्हा एका बाजूला. आधीं सद्‌गुरूंचं दर्शन आणि मग तुमचा पाहुणचार! (धांवतच जातात. पाठोपाठ बहिरजी जातो.)

गांग नाईकः—तुम्हीं सगळे किल्ले संभाळा. मीहि जातोंच. बोला शिवाजी महाराजकी जय! (जयजयकारांत निघून जातो. तेव्हांच पडदाही पडतो.)

प्रवेश तिसरा.

[**स्थळः**—हशमगडचा आंतला भाग.]

पुतळाबाईः—(उडीयानबंदी म्हणजे चिमटेवाले आलख गोसाव्याच्या वेषांत प्रवेश करून.)

पद १२ वें.

वो कहा प्रभू अगम अपारा। अरु कहा तूं मुग्ध गवारा ॥ ध्रु० ॥
जिनके गुण रवी सकारे। शशि वायु अग्नि सितारे।
षड् ऋतु और बन्सारे। गागाके निती पुकारे।
गये गुजर अनंत महंत योगी। सुर संत अनंत निकारा ॥ १ ॥

किती विलक्षण हें सोंग! माझ्या खऱ्या स्वरूपाचा स्फोट न होतां वाटेल तिथं निर्भय जातां यायला, या सोंगाखेरीज मला दुसरं सोईस्कर असं दुसरं सोंगच दिसेना. (विचार) महाराजांचा पत्ताच कसा नाहीं, मोठं आश्चर्यच म्हणायचं! बरोबर बहिरजी आहे, त्यानं तरी कांहीं बातमी कळवायची कीं नाहीं? कां महाराजांची आणि बहिरजीची दोघांचीही चुकामूक पडली! (विचार) आईसाहेब सारख्या काळजी करीत आहेत. सरदारमंडळ तर बुचकळ्यांतच पडल्यासारखं झालं आहे! (विचार) शत्रूनं पकडलं असेल काय? काय आहे तें आतां इथं या हशमगडामध्यें समजेलच! या हशमगडाची मला तर खडान् खडा माहिती. इतके लोक निघाले महाराजांच्या शोधाला, तेव्हां आईसाहेबांच्याकड मीहि आज्ञा मागितली. त्यांनीं विचारलं, कीं तूं शत्रूच्या मुलुखांत कोणत्या वेषानं फिरणार. आणि मी हा वेष घेऊन आईसाहेबांच्या पुढं उभी राहिलें तेव्हां त्यासुद्धां थक्क झाल्या! (विचार) पुतळाबाई! किती परस्परविरोधी कार्याची जोखीम तूं आपल्या शिरावर घेतली आहेस? पितृकार्य कीं–(चाचरते) दुसरं कोणतं बरं कार्य? महाराजांचं ना? होय महाराजांचंच! आणखी कोणाचं–मी आपलं त्याला स्वधर्मकार्य म्हणतें! मी कोणतं बरं कार्य साधूं? श्रीशिवाजी महाराजांची अंतरांतली बातमी काढून ती माझ्या वडिलांना द्यावी म्हणून मीं या कार्यांत पाय घातला, तर मला आतां श्रीशिवाजी महाराजांचीही कामगिरी करावी

लागत आहे! मी कोणाची बातमी कोणाला देऊं? यांची बातमी त्यांना, आणि त्यांची बातमी यांना अशी कामगिरी मला करतां येईल काय? आणि अशा कामगिरीनं माझा तरी निभाव लागेल का? (विचार) दोन्ही कामगिऱ्या तर केल्या ह्या पाहिजेच. आपण एवढंच करावं कीं, दोहींकडेही मूळ माणसांच्या जीवाला जपावं. बाकीच्या पंचायतींत आपण पडूंच नये म्हणजे झालं! (विचार) या हशमगडांत, या माझ्या ओळखीच्या ठिकाणीं, ज्या ठिकाणीं मी लहानाची मोठी झालें, त्या या जागेंत, या विचित्र वेषांत पाय टाकतांना मला किती विलक्षण वाटतंय पण. श्रीशिवरायांना यांनीं कैद केलं आहे कीं काय, एवढी बातमी इथं आपणांला काढायची आहे. तेवढी निघाली, कीं झालं आपलं काम! (विचार) मना, या वेळीं चांचरूं नकोस. मोठ्या सावधगिरीनं पाऊल पुढं टाक. तो पहा, ज्या ठिकाणीं तूं खेळलास बागडलास तो वाडा आला. तो पहा, आंतल्या बाजूस तुझा लहानगा भाऊ आप्पासाहेब खेळतो आहे. पोर इतका उदासीन कां बरं दिसतो? (वैराग्याच्या वेषाच्या अनुरोधानें) आहाल्लक! आल्लक!! आहाःल्लक!!! बं-बं-बं भैरवनाथ!

आप्पासाहेबः—(दाराशीं येऊन) बुवाजी, अंगारा!

पुतळाबाईः—हां-हां-लेव बेटा! (अंगारा लावते.)

आप्पा०ः—बुवाजी, माझी आक्का कुठं आहे हो? केव्हा हो येईल ती? आमचे रावसाहेब आलेत हो-पण आक्काच कां आली नाहीं, काय कीं!


पुतळा०ः—आतीहै बेटा! जरूर आतीहै. बेटा, फिकीर मत करो. तुमारी आक्का तुमकू मिलती है!

आप्पा०ः—केव्हां हो बुवाजी? का शिवाजीनं तिला पकडली? का शिवाजीची ती बायको झाली? काय झालं हो? कां हो ती येत नाहीं? मला बघा किनई तिच्यावांचून चैनच पडत नाहीं बघा.

सगुणाबाईः—(भिक्षा घेऊन येते व घालतांना) काय विचारतोस रे बुवाजींना?

आप्पा०ः—आक्का-माझी आक्का केव्हां येईल तें? लवकरच येईल म्हणतात बुवाजी! आईग, आक्का अजून कांहीं शिवाजीची बायको नाहीं झाली! झाली काय हो बुवाजी?

पुतळा०ः—नही बेटा! नही हुवी—



पुतळाबाई:—तुमारा दर्शन हुवा तो हमारे मातांके दर्शन हुवां हमकू!

[अंक ३-प्रवेश ३—पृष्ठ ६७.

आप्पा०:—आईग आई ! नाहीं झालं म्हणतात ग लगीन अजून ? मग रावसाहेब काय सांगत होते ? खोटंच वाटतं सगळं ?

पुतळा०:—सब झूट ! सब झूट ! अबतक शादी नही हुवी ! और कैद भी नही हुवी.

आप्पा०:—मग कुठं आहे ?

पुतळा०:—घूमती है !

आप्पा०:—मला केव्हां भेटेल ? माझी आक्का मला केव्हां भेटेल ?

पुतळा०:—मिलती है ! जरूर मिलती है ! (डोळयांत पाणी येतें.)

सगुणा०:—(बुवाजीच्या डोळयांत पाणी आलेलें पाहून तिचा संशय दुणावतो.) बुवाजी, इतक्या लहान वयांत कशाला या पंथांत पडलांत ?

पुतळा०:—हमारी माता और पिता बचेपनसे हमकू छोडकर गई ! दुसरी आपनासरीखी माता और सज्जन पिताने मेरा शंभाल किया. उनके साथ तरी कित्ती दीन रहना ? आपने तखदीरमे सौख्य नहीं तों किदरभी तें नही मिलतें है ! हमारा मालक पिताजीनें हमकूं जानेकूं परवानगी दिये हमबी भगवानपर विश्वास रखकर जगपर घुमते है.

सगुणा०:—तुमच्या पालक आईनें कांहींच कसा प्रयत्न केला नाहीं ?

पुतळा०:—ओ ! यह तर देवी है ! हमपर उसकी माया तो बहुत है ! फेर पिताके सामने उसका क्याभी नही चलता है-ओ हमारी मा देखो अमा- तुमारा माफकच हैं. तुमारा दर्शन हुवा तो हमारे माताके दर्शन हुवा हमकूं ! (वंदन करून) माते, (डोळयांत पाणी येतें.)

सगुणा०:—(तिच्याही डोळयांत पाणी येतें, हुंदका न आंवरून दोन्ही हातांनीं तिला उठवून) आक्का—आक्का ! (पोटाशीं धरते व आपल्याबरोबर आंत नेतांना) चल बाळा ये, चल, या तुझ्या घरांत ये. खरोखरच तूं निवडुं- गांत सांपडलेली अस्सल नागीण आहेस. माझ्या घरांत ये आणि पुन्हां एकदां त्याला शोभा दे.

पुतळा०:—आई—आई ! (पायांवर हात ठेवून) स्वधर्मसंस्थापना आणि पितृरक्षण या दोन परस्परविरोधी कार्याच्या तलवारीच्या धारेवर मी उभी आहें. या वेळीं तुझाच आशीर्वाद मला दे !

पद १३ वें.

सदा मज विजया । दे माय—वाणी । होई पूर्ण शिराणी करी दया ॥ धृ० ॥ सुखवायाते दाविती पंथा । संकट जें येई नाशि त्यास । विनाश खास कुजना त्रास व्हाया ॥ १ ॥

सगुणा०:—(तिच्या डोईवर हात ठेवून) धन्य, धन्य आहेस तूं.

—[पडदा.]—

प्रवेश चवथा.

[**स्थळ**:—शिवथर खोरें. कसबें शिवथरमधील काळी नदीच्या कांठची एक मांडववजा अर्धवट निवाऱ्याची जागा.]

गांग नाईक:—ही काळ नदी अगदीं काळासारखी आड आली. बरं तर बरं ! या भयंकर नदींत उडी घेऊन पलीकडे जावयाचा हट्ट महाराजांनीं शेवटास नेला नाहीं ?! नाहीं तर काय करायचं? केवढा भयंकर हा वेग ?

बहिरजी:—नाईक, आज महाराज या नदींत उडी न घेतां कसे राहिले, या ठिकाणीं, या झोंपड्यांत, बाजल्यावर, झोंपा म्हटलं असतां कसे झोंपले, कांहीं समजत नाहीं. मला तरी वाटतं, आज आपणांला कांहींतरी चमत्कार दिसणार ! नाहींतर इतकं महाराज ऐकणार ?! छेः! कशाला नांव घेतां ?

गांग नाईक:—बहिरजी, हा गांव, दादजीचा ! दादजी मोठा पुंड आणि उफराट्या काळजाचा ! तेव्हां सावध असलं पाहिजे बरं.

बहिरजी:—आपण दोघे दोहों बाजूला खडान्त्र पहारा करूं या म्हणजे झालं.

गांग नाईक:—नको–नको–तशानं संशय येईल. तुम्हीं झोंपडीच्या एका बाजूला पडून रहा–मीहि दुसऱ्या बाजूला पडून रहातों.

बहि०:—बरं तर चला. (दोघेही बाहेर दोहों बाजूंनीं जातात. नंतर एकदम आवाज होऊन श्रीशिवाजी महाराजांच्या पायथ्याशीं श्रीरामदासांची मूर्ति दृश्यमान होते. त्या वेळीं चोहींकडे मंजुळ वाद्यें वाजलेलीं ऐकूं येतात. श्रीशिवाजी महाराज उठून खालीं उतरून श्रीरामदासांच्या चरणीं मस्तक ठेवतात. श्रीरामदास त्यांचे मस्तकीं वरद हस्त ठेवितात. श्रीरामदास प्रसादाचा नारळ श्रीशिवरायाच्या पदरांत टाकतात. श्रीशिवराय पुन्हां पूर्ववत् निजतात. निजल्या स्थितींत पांघरूण एके बाजूस करून स्वप्नांत पाहिल्याप्रमाणें श्रीराम-

दासांना पहातात. त्यांचें दर्शन घेण्याकरितां उठून त्यांच्यामागें लागतात तों ते अदृश्य होतात. हें इतकें चाललें असतां—“महाराष्ट्रा, पहा, नीट लक्ष्य देऊन पहा. तुझं नष्टचर्य संपलं. तुझ्या दुर्दैवाची काळरात्र नाहींशी होऊन सुदैवाचा उषःकाल हा झाला पहा! महाराष्ट्रा, हें पहा, तुझी शक्तिदेवता आणि युक्तिदेवता यांचं मीलन झालं! महाराष्ट्रा, या संयुक्त शक्तीचं दर्शन घे. या पर्वकालाचा विसर पडूं देऊं नकोस. ऊठ, ऊठ, जागा हो, आणि मिळालेल्या वरापासून योग्य बोध काय घ्यावयाचा तो घे!” यानंतर श्रीशिवाजी महाराज झोंपेंतच ओरडत धांवत पुढें येतात. पाठीमागून पदरांत बांधलेला नारळही आपटत आपटत येतो.)

शिवाजीः—बहिरजी–बहिरजी–चालले–चालले–सद्गुरु चालले बघ.

(दोहीं बाजूनें दोघे येतात व आश्चर्यानें उभे रहातात.)

शिवाजीः—श्रीसद्गुरूंनीं स्वप्नांत–(डोळे चोळून) होय, स्वप्नांतच दर्शन दिलं, आणि प्रसादाचा नारळ दिला—

बहि॰ः—(पदरांतला नारळ उचलून) महाराज, हा पहा प्रसादाचा नारळ! सद्गुरु स्वप्नांत दिसले—पण प्रसाद खरा दिला–!

(नारळ श्रीशिवाजी महाराजांच्या हातीं देतो.)

शिवाजीः—आहाहा! सद्गुरो, हा प्रसाद! हें श्रीफल! हें स्वधर्मसंस्थापनेचं श्रीफल, हें स्वराज्याचं श्रीफल, हें आपल्या कृपेचं श्रीफल. महाराष्ट्रा, तुझ्या भाग्योदयाचा कोंबडा आरवला, तुझ्या पदरांत सद्गुरूंनीं स्वधर्मसंस्थापनेचं श्रीफल टाकलं. आतां अदिलशाही ढांसळलीच ढांसळली समजा. हिंदुपदपादशाहीचं हें श्रीफल महाराष्ट्राच्या पदरांत टाकून सद्गुरो, आज आपण या आपल्या शिवबाला खरोखर धन्य केलंत!

—[पडदा]—

अंक तिसरा समाप्त.

अंक चवथा.

———:०:———

प्रवेश पहिला.

[**स्थळः**—जावळी. चंद्रराव मोरे याच्या खास तैनातींतल्या कोमलसानी नांवच्या नायकिणीच्या घरांतील रंगमहाल. कोमलसानीची पाळलेली तरुण मुलगी सुंदरसानी गात आहे. चंद्रराव, संभाजी कावजी, राघो बल्लाळ अत्रे वगैरे मंडळी बसली आहे. कांहीं निवडक चिजा झाल्यावर शराबाचा कार्यक्रम होण्याचे आधीं.]

चंद्रराव:--घ्या पानसुपारी, तुम्ही कांहींच घेत नाहीं हें काय ?! कोमल, अग,तूंही अशी स्वस्थच ! अग, हे कोण आहेत माहीत आहे का तुला ? शहाजीराजांचे चिरंजीव शिवाजीराजे, त्यांचे हे वकील आहेत !

कोमलः—(अदबीनें मुजरा करून) आधींच सांगायचं नाहीं का हें !

चंद्र०:--आणि आतां सांगितलं म्हणून काय झालं ! अग, हे आतां आमचेच होणार आहेत—पाहुणे होणार आहेत. (मध्येंच) दे बरं माजुमची वडी. (ती देते ती घेऊन) पाहिजे का तुम्हांला संभाजी, काय राघोपंत, पहातां का मासला ?

कोमलः--नको, त्यांना कशाला ? त्यांना मी साध्या वड्या देतें. ह्या आपल्या वड्या ह्यांना झेंपतील तरी का !

चंद्र०:—मुळींच नाहीं ! कशा झेंपतील ! हा सारा तुझा प्रताप ! इनं हो-इनंच पहा मला हा नाद लावला.

संभाजी०:—मग त्यांत वाईट तें काय आहे ?

राघोपंत:—तसं कांहीं वाईट असतं, तर तो पदार्थ उत्पन्न तरी कशाला झाला असता—!

संभाजी०:—प्रत्येक वस्तु उपयुक्तच आहे. मात्र तिचा उपयोग करून घेण्याचा सराव पाहिजे.

चंद्र०:—हें कसं, अगदीं बरोबर बोललांत बघा ! (मध्येंच) वडी ! अशी कपाळाला आंठ्या घालून देऊं नकोस !

कोमल:—अती तिथं माती ! माजुम घ्यायचा तरी किती तो मेला ! हे पाहुणे तरी काय म्हणतील !

चंद्र०:—ते काय म्हणाले ते आतांच ऐकलंस ना ! अग, प्रत्येक वस्तूचा उपयोग करून घेण्याचा सराव पाहिजे. तसा मला सराव आहे कीं नाहीं तूंच सांग !—वडी—!

कोमल:—आतां नाहीं द्यायची हां !

चंद्र०:—बरं,राह्यलं ! वडी जाऊं दे ! नको देऊंस.आज पाहुण्यांच्या देखत इतकीच पुरे ! पण आतां शराब देणार ना ? कां सुंदर, चांगली फक्कडशी चीज म्हणणार असलीस तरच घेईन हां !

कोमल:—आतां पुनः आणखी शराब पाहिजेच का ? हा इतका कैफ प्रकृतीला मानवणार नाहीं हां !

चंद्र०:—कोमल, तुझ्यासारखाच का मी कोमल आहें ? अग, माजुमच्या वड्या घेऊन वर जर मी शराब नाहीं घेतला तर हे पाहुणे तरी काय म्हणतील ? कैफ करतां करतां डरला असं नाहींत का म्हणणार ? असा का मी डरणारा आहें ? तूंच सांग हां ! मी असा कधीं डरलों आहें का ? मग आजच तूं असं जें तें नको नको काय म्हणत्येस ? सुंदर, काय तयारी आहे कीं नाहीं ? चीज-सुद्धां सुंदरच पाहिजे हां ! शराब सुंदर, चीज सुंदर, तूं सुंदर, मी सुंदर, हे पाहुणे सुंदर, तुझी ही आई सुंदर ! सगळेच सुंदर ! होय कीं नाहीं संभाजी आपण सारे सुंदर आहोंत कीं नाहीं ?

संभाजी०:—अलबत्,एकदां वृत्ति तन्मय झाली, कीं सौंदर्याशिवाय दुसरं काय दिसणार ?

चंद्र०:—आहाहा ! किती सुंदर बोललांत ! याबद्दल ही सुंदर घ्या बक्षीस तुम्हांला. आणि राघोपंत, तुम्ही कांहींच बोलत नाहीं म्हणून ही कोमल तुम्ही घेऊन चला. मला सुंदरच्या हातची शराब मिळणारच आहे ! चल, सुंदर, आज तुझी काय करामत आहे ती दाखवली पाहिजेस हां ! पाहुणे कसे पण खूष झाले पाहिजेत ! कोमल, सांग तिला एक इष्कबाज चीज. सुंदर, आदा केला पाहिजे हं ! संभाजी, पोर पण पोर आहे हो ! आमच्या रावसाहेबाला

बरी आहे नाहीं हो! काय राघोपंत, तुम्हांला नाहीं का वाटत ही पोर, सुंदर आहे असं?

कोमलः—इतकी का सुंदर आहे ती? कांहींतरीच म्हणायचं झालं!

चंद्र०ः—समजलं मला तूं असं का म्हणतीस तें. तुझी स्वतःची पोटची मुलगी असती तर तूं असं कधींच म्हटलं नसतंस! दुष्काळांत आली, पायलीभर साळीला घेतलीस—(संभाजी, राघोपंत हंसतात.) अहो, खरंच! इनं ही पोरगी अग्दीं पायलीभर साळीला घेतलीन्!

कोमलः—पुरे म्हटलं आतां! सुंदर,तूं खरंच सुंदर आहेस बरं! झालं आतां!

चंद्र०ः—जुलुमाचा रामराम! सुंदर, पहिल्यानं पाहुण्यांना दे हं!

कोमलः—नाहीं तोच आग्रह! पाहुण्यांना कशाला ती आणखी!

चंद्र०ः—वाः! मोठी दीड शहाणीच आहेस कीं! पाहुण्यांना दिल्याशिवाय मी घेऊं काय? काय हो संभाजी, अहो राघोपंत, पाहिलंत का ही काय उपदेश करते ती!

संभाजी-राघोपंतः—पण आम्हांला त्याचा कांहीं सराव नाहीं. आम्हांला नकोच तें, आम्ही कांहीं घेणार नाहीं. माफ करा.

चंद्र०ः—हो विसरलोंच! मला वाटलं तुम्ही आपले अदिलशाही दरबारचेच मनसबदार आहांत. तुम्ही त्या शिवाजीचे हस्तक, हें मी विसरलोंच! पहा हा आमच्यामध्यें नि शिवाजीमध्यें केवढा फरक आहे तो!

संभाजी०ः—आमच्या महाराजांना या पदार्थाचा विटाळही खपत नाहीं.

राघो०ः—याबद्दल आमच्या तिकडे कडक शिस्त आहे.

चंद्र०ः—हीच पहा, त्याची केवढी घोडचूक झाली आहे ती! अहो,शराब म्हणजे केवढी उपयुक्त वस्तु! प्रथम भेट खात्रीनं व्हायला आणि मग स्नेह कायम व्हायला, या शराबाशिवाय दुसरा कोणता बरं रामबाण उपाय आहे? शराबाला हद्दपार करून शिवाजीनं आमच्या सारख्यांच्या मैत्रीच्या साधनालाच कायमचं सोडलं आहे. अहो, आम्ही अदिलशाहीला चिकटलों आहोंत ते या शराबामुळेंच आणि शराब आहे तोंपर्यंत आम्ही कांहीं अदिलशाहीला सोडणार नाहीं. आहाहा! केवढी पण या शराबाची थोरवी. जाऊं द्या तें! शिवाजीच्या बाजूला आम्ही येत नाहीं, त्याचं कारण हेंच. शराबाचा कंटाळा करतो म्हणजे काय?–हं सुंदर, म्हण, सुरेख चीज म्हण. अशी म्हण, अशी

मजा कर, कीं तुझ्या हातांतला शराबचा पेला या पाहुण्यांनीं हिसकावूनच घेतला पाहिजे. (सुंदरसानी एक चीज म्हणतां म्हणतां चंद्ररावाला शराबचे पेल्यावर पेले देते.)

चंद्र०:—अहो संभाजी, मी अदिलशाहीचा चंद्रराव आहें, जावळीचा राजा आहें. कसं आहे माझं ऐश्वर्य ? असा माझा वडेजाव तुमचा शिवाजी ठेवील काय ? काय ठेवतो तो ! अहो, ज्याच्या हद्दींत शराब नाहीं, त्याच्या हद्दींत आम्ही बादशाही राजेही येणार नाहीं. कोमल, शराब पण शराब आहे बघ. तुझ्या हातचा एक पेला देग ! त्याशिवाय चांगला रंगच येणार नाहीं बघ ! अग, मी बादशाही राजा, तूं माझी कोमल, बादशाही राणी ! आणि ही शराब, बादशाही मेहेरबानी ! दे, एका पेल्यानं काय होणार आहे ? एक प्याला मी मागत असतां, तूं दिला नाहींस तर हे पाहुणे तुला काय म्हणतील ? आणखी एकच प्याला दे ग. मी का असा भ्याड आहें ? (सगळे मिळून त्याला नेऊन निजवितात. त्याचे आधींच सुंदरसानी गेलेली असते. नंतर पडदा पडतो. कोमलसानी, संभाजी व राघोपंत पुढील महालाच्या पडद्यावर येतात.)

कोमलः—पाहिलात राजांचा हा प्रकार !

संभाजी०:–केवढा प्रतापी पुरुष,पण या कैफानं केवळ मातीमोल झाला आहे.

राघो०:—मग काय, कोमलसानी, आम्ही म्हटलं त्याचा काय विचार केलात ?

संभाजी०:—तुम्ही राजे चंद्ररावांच्या खास आश्रयाला आहांत, तेव्हां आम्ही तुमच्या ऐश्वर्यांत टाकूं म्हटलं तरी अशी ती भर काय टाकणार ? आज आमच्या सर्व ऐश्वर्यासह आमच्या महाराजांना विकत घेण्याची तुमची शक्ति आहे. तेव्हां आम्ही तुम्हांला देणार काय नी तुम्ही घेणार काय ?

राघो०:—आमचं म्हणणं इतकंच, की कार्याकडे लक्ष्य द्या. देऊन घेऊन कोणीं कुणाला पुरवलंय. आमच्या महाराजांनीं केवळं महत्त्वाचं कार्य शिरावर घेतलं आहे, त्याला हातभार लावा.

कोमल०:––सरदारसाहेब, तुमच्या म्हणण्यावर मीं पुष्कळ विचार केला, मला असं वाटतं, कीं आत्मा राखून धर्म करावा.

संभाजी०:—तुमचा काय विचार आहे, तो तरी एकदां समजूं द्या बरं !

राघो०:--म्हणजे पाहूं या कुठं कांहीं जमतं का तें. सांगा बरं एकदां.

कोमल:—आम्ही बोलून चालून धंदेवाल्या. तेव्हां आम्हीं कांहीं म्हटलं तरी त्यावर तुमचा विश्वास कसा बसावा ? आम्हीं अगदीं जीव तोडून कांहीं सांगितलं तरी तुम्ही म्हणणार ही तोंडांत सूत घेऊनच बोलली आहे. एक नी दोन-माझ्यावर तुमचा विश्वास तरी कसा बसणार ? आणि विश्वासा-शिवाय ही तुमची कामगिरी कशी होणार ? काय, खरं म्हणतें ना मी हें ?

संभाजी०:—अहो, भांगेंतसुद्धां तुळस उगवतेच कीं नाहीं ?

राघो०:—तुमच्या दानतीविषयीं आम्हीं चवकशी केलीच नसेल असं का तुम्हांला वाटतं ?

संभाजी०:—तेव्हां विश्वासाबद्दल अगदीं बोलूं नका.त्याबद्दल आम्हीं पूर्ण खात्री करून घेतली आहे.

राघो०:—अहो, तसं नसतं तर आम्हीं तुमच्याकडे असली जोखमीची गोष्ट तरी काढली असती का ?

कोमल:—तेव्हां आतां पुढं बोलायला कांहीं हरकत नाहीं. हें पहा, तुम्ही मला जें काम करा म्हणतां तें करणं म्हणजे मी निमकहराम होण्यासारखंच आहें. मीं निमकहराम व्हावं असं तुम्ही माझ्याकरतां काय करतां, बोला ? राजांच्या तैनातीस राहून आज मी अगदीं सुखांत आहें. सुखांतला जीव दुःखांत मी कां टाकावा ? तसं कांहीं तुम्ही करायला तयार आहां का ? मला तुमचा पैका तर मुळींच नको. मीच पाहिजे तर तुम्हांला माझी सगळी जिंदगी देतें. तुम्ही करतां का मला पाहिजे तें? कार्याच्या महत्त्वाप्रमाणंच बक्षिसाचंही महत्त्व पाहिजे, होय ना ?

संभाजी-राघोपंत:—तुमची मागणी कसली आहे, ती एकदां सांगा पाहूं. उगीच मागेंपुढें कशाला ?

संभाजी०:—हो, असेल कबूल करण्यासारखं तर करूं कबूल.

कोमल:—तुम्ही माझी सुंदर पाहिली आहेच. ती कांहीं माझी मुलगी नव्हे, मी तिला खरोखरच दुष्काळांत केवळ पायलीभर साळीलाच घेतली आहे.

संभाजी०:—बिचारी कोणाची आहे कुणाला ठाऊक !

राघो०:—योगायोग काय पहा बरं ! कोणत्या धंद्यांत येऊन पडली आहे बिचारी !

कोमलः-आमचा हा धंदा म्हणजे प्रत्यक्ष यमपुरी आहे. मागील जल्मीं काय घोर पातक केलं असेल त्याची या धंद्यांत जल्म घालवून अशी ही झाडेझडती घ्यावयाची !

संभाजी०ः--मग एकंदरींत तुमचा हा धंदा तुम्हांला आवडत नाहीं म्हणायचा !

राघो०ः--माझी तर कल्पना अगदींच निराळी होती !

कोमलः--प्रत्यक्ष नर्कवास आहे हा आमचा धंदा, आणखी तें काय सांगूं ?

संभाजी०ः--असं आहे, तरी पण या धंद्यांत कांहीं कमी बायका नाहींत !

राघो०ः--या बायका लग्न करून सुखानं संसारी कां होत नाहींत !

कोमलः-कारण कां एकच आहे ? पण हौसेनं या धंद्यांत जल्म काढणाऱ्या फारच थोड्या ! ज्यांना यांत मजा वाटत असेल, त्यांना काय म्हणावं, तेंच समजत नाहीं. पण पुरुष तरी उदार मनाचे कुठं आहेत ? आमच्या धंद्यांतून कोणी बाहेर निघूं पाहील तर हात द्यायला कोण बरं धीराचा पुरुष आहे ?

संभाजी०ः--पण बिघडलेल्या स्त्रीचा नवरा आपण होऊन कोण होईल ?

राघोपंतः--प्रश्न खरोखरच बिकट आहे, तसा पण विचार करण्यासारखाही आहे.

कोमलः--तेव्हां तुम्ही आतां खरोखरच विचार करा. एकदम कांहींच सांगूं नका. आणि एकदम सांगतांही येण्यासारखं नाहीं हें.

राघोपंतः--तुम्ही असं आम्हांला गोंधळांत पाडूं नका.

संभाजी०ः--खुशाल तुम्हांला काय सांगायचं असेल तें सांगा. त्यांत ती भीड कसली ?

कोमलः--तुमच्यासारखीं रत्नं शिवाजीला मिळालेलीं पाहून मलासुद्धां वाटतं, कीं आपणही कांहीं तरी काम करावं. पण आम्ही बोलून चालून धंदेवाल्या ! तेव्हां हरएक गोष्टींत आम्हांला धंदा दिसतो. राघोपंतदादा, तुम्ही आहांत ब्राह्मण, तेव्हां तुमच्याच पायाची शपथ घेऊन सांगतें, कीं मला माझ्या या धंद्यांत माझ्या सुंदरनं पडावं असं नाहीं वाटत. पण नुसतं वाटून काय उपयोग ? कोणी चांगला माणूस तिच्याशीं लग्न करून घ्यायला तयार होईल तर मी त्याला माझं सर्व कांहीं देईनच; पण आणखीही एखादं साहसाचं काम करीन. राघोपंतदादा, माझ्या सुंदरला माझ्या धंद्याचा गाण्या-नाचण्याशिवाय दुसरा

कसलाही अद्याप वारा लागलेला नाहीं. अगदीं माझ्या शब्दावर विश्वास ठेवा. बरं, पोरीचं तरी लक्ष्य धंद्याकडे आहे म्हणतां? छेः हो, मुळींच नाहीं. हरा कीं शिवा. पदर काय लांब काढते, कुंकू तरी केवढं लावते, वेणी काय घालते, जणूं अगदीं गरतच! आमच्या धंद्याच्या दृष्टीनं पाहिलं तर आतां तिनं चार पुरुष मंडळींत बसावं उठावं. पण ती पुरुषाच्या वाऱ्यालाही उभी रहात नाहीं. तेव्हां माझ्या सुंदरकरितां मी वाटेल तें-फार काय पण खुद्द चंद्ररावाचा, माझ्या पोशिंद्याचाही घात करीन. राघोपंत दादा, विचारा, तुमच्या संभाजीरावांना विचारा, करतात का पहा मी म्हणतें हें धारिष्ट. पहा, विचार करा नी मग मला सांगा. (जाते.)

राघोपंतः--काय संभाजी, कसं काय करतां? बाईनं पेंच तर मोठा विलक्षण घातला आहे.

संभाजी०ः—तुम्ही जितक्या अडचणीची कामगिरी तिच्यावर टाकूं पाहतां तितक्याच अडचणीची मागणी तिनं तुम्हांला सांगितली आहे. कोणीही झालं तरी असंच करणार! कामाच्या मोठेपणाप्रमाणं देणगीचीही किंमत वाढायचीच.

राघोपंतः—येथला हा सर्व प्रकार, आणि ही मसलत तडीस नेण्याचा आपला विचार, याची इत्थंभूत हकीगत, चला आपण महाराजांना लिहून कळवूं या.

संभाजी०ः—पण त्यांत हें, या बाईचं कारस्थान नाहीं आं कळवायचं! चला, याचा आधीं आपण पुरता विचार करूं या. स्वधर्मासाठीं देहावर तुलसीपत्र ठेवणाऱ्याला ही असली कामगिरी म्हणजे कांहीं विशेष नाहीं. पण पूर्ण विचाराअंतींच काय ठरवायचं तें ठरवूं या चला. (जातात.)

सुंदरः—(त्यांच्याकडे पहात पहात प्रवेश करते.) यांच्या या बोलण्यावरून मला थोडीशी आशा वाटते. आईच्यासुद्धां मनांत माझं कल्याण करावंसं आहे. देवा नारायणा, खरंच का मी या धंद्यांतनं सुटेन? असा धंदा बायकांच्या मागं लावून देवा त्यांची तूं कां बरं विटंबना करीत आहेस? या धंद्यांतच रमणाऱ्या त्या बायका कसल्या! नको-नको-बायकांचा हा असला जल्म! केवळ नर्कवास! आई, देवी अंबाबाई, माझं कुणा तरी चांगल्याशीं लगीन होऊं दे. खरोखर मी त्याच्याबरोबर चांगली वागेन. तसं जर न होईल तर मी वीष खाईन पण या धंद्यांत कांहीं पडणार नाहीं. माणूसपणा नाहींसा करणारा हा वेश्येचा धंदा. आग का लागेना याला. मी तरी प्राण गेला तरी



सुंदरसानीः—देवा! माझ्या जन्माचं मातेरं करूं नकोस एवढीच या अनाथ पोरीची तुझ्या चरणांशीं प्रार्थना आहे.

[अंक ४-प्रवेश १—पृष्ठ ७७

यांत कांहीं पडायची नाहीं. (विचार) आईनं माझ्याकरतां किती चांगलं पण घर पाह्यलंन्? पण ते होतील का कबूल? बघूं या आपोआप होतात का ते. नाहींतर मला बुद्धि होईल तसा प्रयत्न मी करीनच. देवा, भाग्योदयाची आशा मला लाविली आहेस. निराशा मात्र करूं नकोस. लहानपणींच आईबापांनीं टाकलेली ही पोरकी पोर, कोणत्या जातीची की गोताची कोण सांगणार? पण देवा, तुला तरी सगळं माहीतच आहे ना? तेव्हां माझ्या जन्माचं मातेरं करूं नकोस एवढीच या अनाथ पोरीची तुझ्या चरणाशीं प्रार्थना आहे.

पद १४ वें.

बारे ललना–विहारी । पुरवी विनती मुरारी ॥ धृ० ॥ मज न रुचत हरि ही काया रे । जीवन हें दुखकारी ॥ १ ॥

[जाते; पडदा.]

प्रवेश दुसरा.

[स्थळः—महाड; श्रीशिवाजीमहाराजांच्या वाड्याच्या नजिकचा भाग.]

पुतळाबाईः—(विश्वासाचे वेषांत–स्वगत) जावळी प्रकरण तर जोरास लागलेलं दिसतं! महाराजही परत आले आहेत. या वेळीं मला स्वस्थ राहून कसं चालेल? माझे बाबा चंद्रराव, आणि महाराज यांच्यामध्यें सलोखा होईल,असं मला तरी वाटत नाहीं. तेव्हां उभयपक्षीं हत्यारं बाहेर निघणारच. तेव्हां आतां या सोंगाचा खरा उपयोग करण्याची हीच खरी वेळ आहे. (विचार) मला वाटलं होतं कीं, या जावळी प्रकरणांतली कांहीं ना कांहीं कामगिरी आपणांकडे येईलच. पण अजून तरी तसं कांहीं होईलसं वाटत नाहीं. संभाजी कावजी आणि राघोपंत अत्रे दोघेजण पुन्हां जावळीला गेले आहेत तें कां? (पाहून) हे ढालाईत जावळीकडूनच आलेले दिसतात. काय बातमी आणली आहे, तें कसं समजणार? (विचार) जावळी प्रकरणांत कांहींच कामगिरी मला सांगत नाहींत, माझ्याविषयीं कांहीं यांना संशय आला आहे का? महाराज आल्यापासून तर आईसाहेबसुद्धां माझ्याबरोबर कांहीं पहिल्यासारख्या वागतातशा दिसत नाहीं! काय कारण असावं समजत

नाहीं. (विचार) आणि यांना जर खराच माझा संशय आला असला तर ? तर काय ? आहेच मग कडेलोट ! काय होईल तें खरं. पण आधीं बाबांना कळवितां येईल, अशी कांहीं बातमी काढतां येते का पाहूं या. (पाहून) ढालाईत तर सदरेला जाऊन पोंचले. चला, आपणही गेलंच पाहिजे तिथं ! कदाचित्. बोलावलं तर ? जवळ असावं हें बरं. देवा, या पुण्यपुरुषाच्या जवळ अक्षय्य असावं असा कांहीं योग आहे का ?—

पद १५ वें.

सुखवी प्रेमें राया । झिजवीन काया ।। धृ० ।। निर्मल बाला
लवलाहीं । रमाया सुखें या पाया ।। १ ।।

[जाते. पडदा.]

प्रवेश तिसरा.

[स्थळः—महाड. श्रीशिवाजी महाराजांचा खास राहण्याचा वाडा. घरच्या श्रीदेवीची आरती चालली असून श्रीशिवाजी महाराज ध्यानस्थ बसले आहेत. जवळ चिटणीस बाळाजी आवजी दौत लेखणी, कागद घेऊन बसले आहेत, बहिरजी उभा आहे. आरती झाल्यावर धूप टाकतात. श्रीदेवीचा महाराजांच्या आंगांत संचार होतो. महाराज बोलतात तें चिटणीस टिपून घेतात.]

श्रीशिवाजीः—(संचार झाला असतां) लेंकरास म्हणावें, कीं आपण प्रसन्न आहोंत, तूं कांहीं चिंता करूं नको. सर्वस्वें साह्य तुला आहें. चंद्रराव मोरे यास मारल्याविरहित राज्य साधत नाहीं. संभाजी कावजी आणि राघोपंत अत्रे यांच्यावांचून हें कर्म कोणास न होय. त्यांचे हातीं यश तुजला देतों. ” (यानंतर महाराज स्वस्थितीवर येतात. सगळे मुजरे करतात.) काय चिटणीस, मातुःश्रींची आज्ञा काय आहे ? (चिटणीस उतरलेलें तें वाचून दाखवितो.) मातोश्रींची आज्ञा शिरसामान्य आहे. असला बलाढ्य स्वजातीय फुकट मारला जातो, उपाय नाहीं. कांहीं ताळ्यावर येण्याला जागाच नाहीं म्हणूनच मातुःश्रींनीं तरी ही आज्ञा दिली.

बहि०:—राजे चंद्रराव, बादशाही किताबवाले, फार अभिमानी, प्राण देतील पण बादशाहीशीं बेमान होणार नाहींत.

बाळाजी आवजी:—ती सगळीच मंडळी तशी आहेत. इतक्या जमातीचा आणि अशा हिंमतीचा हिंदुराजा या भागाला चंद्रराव मोरे हाच आहे. हा जर आम्हांला मिळता तर आमचं कार्य केवढ्या जोराला लागलं असतं !

शिवाजी:—हे आपल्याच जातींचे प्रतिरोधक फारच जाचक ! अदिलशाहीबरोबर टक्कर देण्याकरितां आम्हीं जी शक्ति एकत्र केली आहे, तिचा बराचसा क्षय चंद्रराव मोरे यांजसारख्या स्वजातियांबरोबर झगडण्यांत होतो. म्हणजे प्रत्यक्ष अदिलशाहीला पोंचेतोंपर्यंत आमचेच लोक, अदिलशाहीच्या अभिमानाला पडलेले आमचेच धर्मबांधव, आम्हांला शक्य तितके हतबल करतात. अदिलशाहीकरतां आडवे आलेले जरी धर्मबांधव असले तरी कापून काढावे लागतात, ही एक हानी. आणि या अशा कापाकापींत शक्तिक्षय होतो ही दुसरी हानी. आमचेच लोक आमच्या तोंडावर ठेवून अदिलशाही आमचं असं दुहेरी नुकसान करीत आहे. अर्थात् यांत तिचा आयताच फायदा होत आहे. भांडून भांडून मरणार आम्ही. त्यांत अदिलशाहीचं काय नुकसान होतं ? उलट तिला स्वसंरक्षणाची जास्तीच जास्त तयारी करण्याची सवड मिळते. असं हें नेहमींच चाललं आहे. आम्ही आपआपसांत न भांडतों तर देवगिरीचे जाधव तरी कां पडते ? आणि ब्राह्मणी राज्य तरी या बाजूला कां होतं ? चालायचंच असं हें. उगीच खेद करून तरी काय उपयोग ?

बाळाजी आवजी:—मी मी म्हणणारे शहाणेसुद्धां उमगत नाहींत, काय करावं ?

शिवाजी:—चिटणीस, हिंदुधर्मीयांचाच हा असा विशिष्ट गुण असावा, असं आतांशा मला फार वाटूं लागलं आहे ! आपल्या या पश्चिम समुद्र किनाऱ्याला फिरंगी लोक व्यापाराच्या वखारी घालून आहेत. बहिरजी म्हणतो त्यांची एकी मोठी विलक्षण आहे.

चिटणीस:—हबसाणांत मी असतांना सुद्धां मीं असंच ऐकलं आहे. मला वाटतं, हे फिरंगी एकीच्या जोरावर आम्हां हिंदु-मुसलमानांना उभयतांनाही पुढें कदाचित् भारी होतील.

शिवाजीः—तसंच झालं तर त्यांत कांहीं नवल नाहीं. एकीच्या अक्षय्य वटवृक्षाचा विस्तारही अक्षय्यच असतो. त्याचप्रमाणें त्याच्या सांवलींत दुसरा झाडझाडोरासुद्धां जगायचा नाहीं, इतका त्याचा स्वतंत्रतेचा बाणा अचाट असतो. एकीचं बल कांहीं विलक्षण आहे. दिसण्यांत नाजूक असलेले कमलनाळ एकीच्या भावनेनं एकत्र झाले कीं मत्तगजालाही आवरूं शकतात. एकीच्या बळावर यः-कश्चित् माकडं रावणाला वज्रप्राय धडकी देऊन उलथा पालथा करूं शकतात. एकी हीच खरी शक्ति. इच्या प्रसारावर प्रत्यक्ष जगन्नियंता पुढं उभा करतां येईल, मग इतरांची गोष्ट कशाला? एकीच्या अमृत शक्तीवरच पांडव भारतीय युद्धांतून यश घेऊन बाहेर पडले आणि तीच एकीची कांस सोडल्यामुळं प्रत्यक्ष योगेश्वर श्रीकृष्णाच्या घरांत यादवी माजली आणि तिचा अखेर कुलक्षयांत झाला! किती भयंकर, किती अनर्थकारक, किती प्रलयकारक हा एकीचा अभाव! ज्याला ज्याला म्हणून आपलं सर्व प्रकारें कल्याण करून घ्यायचं असेल, त्यानं एकीलाच प्रसन्न करून घेतलं पाहिजे. संसारिक मोक्ष असो अगर राजकीय मोक्ष असो त्या ठिकाणीं एकी या कामधेनूचं दोहन चाललंच पाहिजे.

पद १६ वें.

निजानंद अद्वैत देई । मना! प्रेम-सुख दिव्य घेई ॥ धृ० ॥
मन-मीलनाचे निज-रूपीं सुख तें विलयास विपदांस नेई ॥ १ ॥
एकांत एकीं निजता विलोकी । कालासही वंद्य होई ॥ २ ॥

एकीला लाथाडून, एकीला विन्मुख होऊन, एकीला तुच्छ करून, कोणाला कोणच्याही कार्यांत यश येणार नाहीं; हा महत्वाचा सिद्धांत लक्षांत ठेवा.

चिट०:—अधोगतीला लागलेल्या पामरांच्या लक्षांत हा सिद्धांत भरायचाच नाहीं.

बहि०:—अर्थात् त्याचीं कडू फळं ते चाखतीलच. (विश्वास प्रवेश करतो.) काय विश्वासराव, काय आहे?

विश्वासः—जावळीकडचे ढालाईत आले आहेत.

शिवाजीः—जा, त्यांच्याकडची थैली घेऊन ये. (विश्वास जातो.) बहिरजी, विश्वासाबद्दल तुझा कांहीं विचार ठाम झाला?

बाहि०:--मला तसा वेळच मिळाला नाहीं महाराज--

चिट०:—परवां त्यानं फारच बेमालूम वेषांतर करून जावळीकडून बातमी आणली. आईसाहेब तर विशेष खुष झाल्या.

शिवाजी:—मलाही समजलंय तें. प्रस्तुतच्या कामगिरींत पुनः त्यालाच घालावा काय ? मोऱ्यांनीं आम्हांला कैद केलं कीं नाहीं ही बातमी त्यानं फारच शिताफीनं—

चिट०:—आणि विलक्षण तातडीनं आणली महाराज.

बाहि०:—(विश्वास येतो आहे हें सुचविण्याकरितां) तर मग मला वाटतं जरूर त्या आज्ञा--(इतक्यांत विश्वास थैली घेऊन येतो, ती जाऊन घेतो, व महाराजांच्याकडे देतो.)

शिवाजी:—(विश्वासाला) विश्वास, जा तूं दरवाजावर ऐस, आणि राबता बंद कर. (विश्वास नाखुषीनें जातो, हें लक्षांत आणून) अद्याप मला याचा पुरता विश्वास लागत नाहीं. (एवढ्यांत चिटणीस थैली खोलतात व आंतील लखोटा काढून आदबीनें महाराजांपुढें ठेवतात. महाराज त्यांना) फोडा, पहा काय आहे तें.

चिट०:—(मनांतले मनांत वाचून) श्रीदेवीच्या आज्ञेप्रमाणंच सर्व बरोबर लिहून आलं आहे.

शिवाजी:—बरं तर ठेवा. मग विचार करूं. (इतक्यांत विश्वास प्रवेश करतो त्यास) काय ?

विश्वास:—कोणी साधू आला आहे ?

शिवाजी:--(एकदम उठून) साधू ?

विश्वास:--दिवाकर गोसावी म्हणून नांव सांगतो.

शिवाजी:--दिवाकर गोसावी कोण बरं ?

विश्वास:--रामदास गोसाव्याकडनं आलों म्हणतो.

शिवाजी:—रामदास गोसावी ? सद्गुरु तर नसतील ?

विश्वास:--शिवथरच्या घळींतनं आलों म्हणतो—

शिवाजी:--आहाहा ! गुरुमाऊली ! आपल्याचकडून खास आपल्याचकडून. (तांतडीनें बाहेर जातो, पाठोपाठ इतरही जातात. श्रीशिवाजी दिवाकर गोसाव्याला मोठ्या आदरानें घेऊन आणून उच्चासनावर बसवितात. आपण

अत्यंत नम्र होऊन पायां पडतात. नंतर इतरही नमस्कार करतात. श्रीशिवाजी कंठ गहिंवरून येऊन) श्रीसद्गुरूंची दासाला काय आज्ञा आहे? दर्शनाचा योग तर अजूनही नाहीं! धिःक्कार असो या ऐहिक व्यापाला!

दिवाकरः--हां-हां-हां! शिवाजी राजे, या ऐहिक व्यापाकरितांच तर तुमचा अवतार आहे. याशिवाय तुमचं मुळीं अस्तित्वच नाहीं.

शिवाजीः—पण यामुळें श्रीसद्गुरुचरणाचा अंतराय घडतो.

दिवा०:--हें अज्ञान होय. श्रीसद्गुरु आपणांजवळच आहेत. " कृपाळूपणें अल्प धारिष्ट पाहे " इतकंच!

शिवाजीः—हें अज्ञानपटलही दूर होत नाहीं.

दिवा०:—प्रसादाचं श्रीफल मिळालं तेंव्हांच तें दूर झालं आहे! हा तुमचा लडिवाळपणा आहे इतकंच!

शिवाजीः—आज्ञेप्रमाणं पुन्हां इकडे आलों. कामकाज पाहूं लागलों.

दिवा०:—आणि कामकाजांत इतके गुंतून गेलांत कीं, पुन्हां तुम्हांला स्मरण द्यावं म्हणून श्रीसद्गुरुंनीं मला हें पत्र देऊन इकडे पाठविलं. ध्या बरं हें पत्र.

शिवाजीः—(आनंदातिशयानें) प्रत्यक्ष श्रीसद्गुरूंचंच दर्शन झालं म्हणायचं! (पत्र डोईवर ठेवून सद्गुरु-स्मरणपूर्वक नाचूं लागतो.) श्रीसद्गुरुमाउली बालकाला काय बरं आज्ञा आहे?

दिवा०:—शिवाजी राजे, तुम्ही खरोखरच सच्छिष्य आहांत. तें पत्र आतां वाचून पहा बरं.

शिवाजीः—(आनंदाश्रूंनीं पहावत नाहीं व कंठ सद्गदित झाल्यामुळं वाचवत नाहीं.)

दिवा०:—तुम्ही कोणी तरी वाचून दाखवा.

चिट०:—(पत्र हातीं घेऊन नमन करून) निश्चयाचा महा मेरू। बहुत जनांसी आधारू। अखंड स्थितीचा निर्धारू। श्रीमंत योगी॥ १ ॥ परोपकाराचिया राशी॥ उदंड घडती जयाशी॥ जयाचे गुणमहत्वाशी॥ तुलना कैचीं॥ २ ॥ नरपति, हयपति। गजपति, गडपति। पुरंदर आणि शक्ति। पृष्ठभागीं॥ ३ ॥

शिवाजी:—श्रीसद्गुरो, दासाचं इतकं वर्णन कशाला पाहिजे!

दिवाकर:—कर्तबगार मुलाचं गुणानुवादन सहृदय मातेशिवाय कोण करील?

चिटणीस:—(पुढें वाचतात) तीर्थक्षेत्रें तीं मोडलीं। ब्राह्मणस्थानें बिघडलीं। सकळ पृथ्वी आंदोळली। धर्म गेला ॥ ४ ॥

शिवाजी:—तो संस्थापण्याकरितांच तर सद्गुरूचा अवतार आहे.

दिवाकर:—आणि सद्गुरूंची ही कामगिरी मूर्त स्वरूपांत आणण्याकरितांच तर श्रीशिवाजीराजे अवतरले आहेत.

चिटणीस:—(पुढें वाचतात) देवधर्म गोब्राह्मण। करावयाशी रक्षण। हृदयस्थ झाला नारायण। प्रेरणा केली ॥ ५ ॥ या भूमंडळाचे ठायीं। धर्मरक्षी ऐसा नाहीं। महाराष्ट्रधर्म राहिला कांहीं। तुम्हांकरितां ॥ ६ ॥

शिवाजी:—केवढा हा भलता अधिकार—

दिवाकर:—पण सद्गुरूंनीं दिलेला आहे तो—

चिटणीस:—(पुढें वाचतात) आणखी कांहीं धर्म चालती। श्रीमंत होऊनी कितेक असती॥ धन्य धन्य तुमची कीर्ती। विश्वीं विस्तारिली ॥ ७ ॥

शिवाजी:—त्या त्या धर्मांचे पुरस्कार करणारे आहेतच.

दिवाकर:—सनातन धर्माचं पुरस्कर्तृत्व तुमच्याकडे आलं आहे, म्हणूनच तुमची कीर्ति होत आहे.

चिटणीस:—(पुढें वाचतात) तुमचे देशीं वास्तव्य केलें। परंतु वर्तमान नाहीं घेतलें। ऋणानुबंधें विस्मरण झालें। वा काय नेणुं ॥ ८ ॥

शिवाजी:—झाली खरी चूक—

दिवाकर:—पण क्षमा करणार सद्गुरु समर्थ आहेतच.

चिटणीस:—पण सरकार यांतही प्रसादवाणी आहे. श्रीसद्गुरूंचा वास सध्यां चंद्ररावांच्या हद्दींत असतां, श्रीसद्गुरु म्हणतात. "तुमचे देशीं वास्तव्य केलें॥" अर्थात् ही प्रसादवाणी असत्य कशी होईल? चंद्ररावाचा मुलुख आपलाच झाला.

दिवाकर:—सत्यच आहे तें. कोणी तरी प्रत्यक्ष करणारा निमित्तमात्र होणार इतकंच!

चिटणीसः—(पुढें वाचतात) उदंड राजकारण तटलें। तेथें चित्त विभागलें। प्रसंग नसतां लिहिलें। क्षमा केली पाहिजे ॥ ९ ॥

शिवाजीः—श्रीसद्गुरो, दासाची का क्षमा मागायची? आम्हीच सर्वस्वीं अपराधी आहोंत. कितीही राजकारण असलं तरी आपल्या चरणाचा विसर पडेल असं का चित्त विभागूं यायचं?

दिवाकरः—शिवाजीराजे, आमचं काम झालं, आतां आम्हांला अनुज्ञा असावी.

शिवाजीः--असं काय हें! थोडी सेवा घ्यावी. अगदींच इतक्या तांतडीनं?

दिवाकरः--तशीच सद्गुरुंची आज्ञा आहे. जावळी राजकारण झाल्यावर मग सद्गुरुंच्या भेटीला या—अशीही आज्ञाच आहे समजाना. आणखी हें ऐका—

समर्थाचिया सेवका वक्र पाहे।
असा सर्व भूमंडळीं कोण आहे ॥
जयाची लिला वर्णिती लोक तीन्ही।
नुपेक्षा कदा रामदासाभिमानी ॥ १ ॥

म्हणा जय जय रघुवीर समर्थ।

[जयजयकारांत पडदा पडतो.]

प्रवेश चौथा.

[**स्थळ**:--जावळी; संभाजी कावजी आणि राघो बल्लाळ प्रवेश करतात.]

संभाजीः—मला वाटतं आतां आपण उगीच माशा मारीतच का इथं बसायचं? खरं म्हटलं म्हणजे महाराजांकडून आमच्या पत्राचा जबाब आतांपर्यंत यायला पाहिजे होता.

राघो०ः—शिवाय अजून कोमलसानीची तरी समजूत कुठं निघाली आहे?

संभाजीः—राघोपंत, मला वाटतं यांत कांहींतरी तोड निघते का पहा. अहो, लग्नाचे प्रसंग माझ्यावर आजपर्यंत थोडेथोडके का आले? पण श्रीशिवाजीमहाराजांना राज्याभिषेक झाल्याशिवाय मी संसारांत पडणार नाहीं, असा तर माझा निर्धार आहे. बरं, हा माझा निश्चय कांहीं चोरून नाहीं, तुम्हां सर्वांना ठाऊक आहे.

राघोपंतः—तुमचा निश्चय आहे, आम्हां सर्वांना ठाऊक आहे. हें सारं खरं, पण याचा कोमलसानीवर काय परिणाम होणार?

संभाजीः—पहा कांहीं युक्ति काढून पहा, आम्ही महाराजाकडून कोणा-तरी चांगल्याशीं सुंदरचं लग्न लावून देण्याची खटपट करूं म्हणून सांगा तिला. जा, तुम्ही एकटेच व्हा पुढं, आणि कोमलसानीला वळवायला अगदीं आपली शिकस्त करा. तोंपर्यंत पहातों महाराजांकडचा कोणी हलकाऱ्या येतो कां तों

राघोपंतः—पहातों माझ्याकडून होईल तितकी खटपट करून. पण मला नाहीं वाटत ती कांहीं थापाथापीला वळेल अशी. (जातो.)

संभाजीः—(जातांना) प्रयत्न तरी करा, मग पुढच्यापुढं हरी आहे. (तो गेल्यावर) काय करावं, महाराजांकडून कांहींच कसं पत्र नाहीं? का पत्र घेऊन येणाऱ्यांना जावळीच्या लोकांनीं कैद केलं? काय समजावं तरी काय? महाराजाकडचं कांहींच वर्तमान नाहीं आणि ही कोमलसानी—

सुंदरसानीः—(प्रवेश करून) नव्हे, सुंदरसानी—

संभाजीः—सुंदर, तूं इकडे कां? राघोपंत आलेत ना तिकडे?

सुंदर०ः—होय, म्हणूनच तर मी इकडे आले.

संभाजीः—कांहीं काम आहे का?

सुंदर०ः—त्याशिवाय कशाला येऊं?

संभाजीः—कोणतं बरं तें?

सुंदर०ः—तें आपणांला ठाऊकच आहे.

संभाजीः—नाहीं, मला केव्हां काय सांगितलं होतंस?

सुंदर०ः—आईनं सांगितलं होतं तें?

संभाजीः—(चपापतो) आईनं सांगितलेलं? कोणतं? केव्हां बरं तें?

सुंदर०ः—असे आढेवेढे कांहीं घेऊं नका. मला कांहीं तसं ठाऊक नाहीं. अगदीं सरळ सांगा. नाहीं म्हणून स्पष्ट सांगा पाहिजे तर. जुलमाचा रामराम कांहीं नको.

संभाजीः—तुझ्या लग्नाबद्दल का?

सुंदर०ः—दुसरं कशाबद्दल? आपण काय ठरविलंत?

संभाजीः—माझं अद्याप कांहींच ठरलं नाहीं. (इतक्यांत दुरून जासूद आलेला पाहून) सुंदर, थोडावेळ तूं आंत हो. जासूद आला आहे. काय पत्र

आहेत तीं पहातों, अन् मग आपण बोलूं हं. (ती एके बाजूस होते. जासूद येतो) कांहीं थैली आहे का जानोजीराव ?

जानोजीराव:--हां, हायना ही ध्या कीं—(थैली देतो.) जबाब पुन ताबडतोब मागितलाया. पायदळ, हेटकरी बी सम्दं निसणीच्या घांटापतोर आलंया.

संभाजी:—ताबडतोबच देतों. जा, तुम्ही तोंवर भाकरपाणी करा जा. (जानोजी जातो. संभाजी पत्रें पहातो.) महाराज तर सगळी कामगिरी आमच्यावर टाकून मोकळे झाले! इतकी जोखमीची कामगिरी आमच्यावर येईल असं नव्हतं मला वाटलं. आतां राघोपंत आले कीं, नक्की दिवस कोणता तो ठरवून महाराजांस कळवूं या. महाराजांच्याकडनं आजूबाजूच्या घोलांत सैन्य तर येऊन बसलं. आतां काय तो आमच्याकडूनच उशीर! एकदां नक्की विचार ठरवून असा बार उडवून देतों—

सुंदर:--(प्रवेश करून) पण तो या सुंदर शिवायच!

संभाजी:—सुंदर!

सुंदर०:—हें पहा, मी बोलून चालून नायकिणीच्या इथं वाढलें. मला कसं बोलावं, काय बोलावं हें कांहीं समजत नाहीं. तुम्हांला राजे यांची मसलत पार पाडायची ना? नसेल तर मग वादच मिटला!

संभाजी:—असली विलक्षण अट का कोण घालतं? न कर्त्याचा वार शनिवार तो हाच!

सुंदर०:—यांत विलक्षण कांहीं नाहीं. मी नायकिणीच्या इथं लहानाची मोठी झालें असलें तरी अद्याप या तुमच्या पायाशपथ शुद्ध आहें.

संभाजी:—पण असला हा भलताच आग्रह काय कामाचा?

सुंदर०:—माझ्या आईनं आपल्या पोटींच्यावर उठावं, असा तिला आग्रह करता, तो मात्र भलता नव्हे ना? हें पहा, मला जास्त काय बोलावं हें मुळींच समजत नाहीं. नायकिणीचा धंदा मला करायचा नाहीं. तुम्हीं एवढं मोठं कार्य शिरावर घेतलं आहांत; त्यांत का हें माझं एवढंसं काम कठीण आहे? आदिलशाहीच्या तडाक्यांतून सर्वांना तुम्ही सोडविणार म्हणता, मग या दुष्ट कसबाच्या धंद्याच्या तडाक्यांतून एकट्या मला का तुम्हांला सोडवितां येत नाहीं? सर्व हिंदुधर्मांतल्या लोकांचा पारतंत्र्यांतनं उद्धार करणार म्हणून

आयुष्याला कस्पटासमान लेखतां, त्या तुम्हांला या नीचवृत्तीच्या चिखलांत रुतलेल्या गाईचा उद्धार करण्याइतकं मोठं मन करवत नाहीं ?

संभाजीः—सुंदर, तूं म्हणतेस तें सारं खरं; पण माझी अडचण तुला माहीत नाहीं.

सुंदर०ः—लोक काय म्हणतील, हीच का ? (तो मानेनें नाहीं म्हणतो) खुद्द महाराजांची आज्ञा पाहिजे काय ? मी विचारतें शिवाजी महाराजांना. पाहूं या ते कशी परवानगी देत नाहींत ते ? तुमच्या थोर कामाला कदाचित् उपयोगाला येणारं माणूस तुम्ही वेश्येच्या धंद्यांत कुजविणार काय ?

संभाजीः—सुंदर, सांगूंच का तुला ? हें पहा, मी भलत्या लोकापवादाला भीक घालणारा नव्हे. माझे महाराजही मला तुझ्याबरोबर लग्न करून घ्यायला ना म्हणणार नाहींत. तुझ्याबद्दल तर मला संशय नाहींच नाहीं—

सुंदर०ः—मग अशी आणखी कोणती बरं अडचण आहे ?

संभाजीः—माझ्या प्रतिज्ञेची

सुंदर०ः—प्रतिज्ञेची ! कोणती ? कसली बरं प्रतिज्ञा ?

संभाजीः—माझे महाराज-माझे शिवाजी महाराज, सिंहासनावर बसतील, तेव्हांच मी लग्न करून घेईन.

सुंदर०ः—वाः ! महाराज, आपली ही प्रतिज्ञा मला मान्य आहे—

संभाजीः—काय म्हणतेस तूं हें सुंदर ? तो सोन्याचा दिवस उगवेतोंपर्यंत काय काय प्रसंग गुदरतील कोणीं सांगावं ? सुंदर, तूं लहान आहेस अजून, उगीच भलत्या भरीला पडूं नकोस.

सुंदर०ः—कांहींतरी हुरळून मी बोललें नाहीं बरं. आपण कोणत्या आगींत उभे आहांत, हें मला माहीत आहे. त्या आगींत तुमच्याबरोबर उभी राहून वेश्येचं अन्न आजवर खाल्लं त्या पातकाला खाक करून शुद्ध होईन. राज्याभिषेकोत्सव झाला, कीं आपली दोघांचीही प्रतिज्ञा पूर्ण होईल. मग आपण आनंदानं प्रत्यक्ष संसार करूं.

संभाजीः—अग, पण या घोर रणयज्ञांत धारातीर्थी मी पडलों तर–? नको, सुंदर, तूं आपला सुखांतला जीव दुःखांत लोटूं नकोस ! मी धारातीर्थी पडल्यावर—

सुंदर०ः—वाः ! तो तर मी माझ्या भाग्याचाच प्रसाद समजेन. स्वधर्माच्या

कामासाठीं आपण देह ठेवलात, तर त्याच वेळीं मीही ठेवीन. तशी संधीच नाहीं मिळाली तर मी सहगमन करीन. महाराज, किती आतां अंत पहातां-?

संभाजीः—सुंदर, दे, तुझा हात दे! स्वधर्मसंस्थापनेच्या कार्यार्थ तूं माझी सहचारिणी होतेस; (तिचा हात आपल्या हातीं घेतो.) पण एका अटीवर. श्रीशिवाजी महाराजांना राज्याभिषेक होईल, त्यानंतरच आपण संसारसौख्याचा स्वीकार करावयाचा. तोंपर्यंत स्वधर्मसंस्थापनेच्या कामांतच देह झिजवावयाचा. सुंदर, ही माझी प्रतिज्ञा लक्षांत ठेव. या प्रतिज्ञेचं स्मरण देऊन सुंदर, मी तुझा स्वीकार करतों.

सुंदर०ः—(नमस्कार करतांना) महाराज, माझ्या आयुष्याचं सार्थक केलंत.

संभाजीः--जा, तर आतां तुझ्या आईला ही बातमी सांग जा.

सुंदर०ः--ही चाललेंच! (पुढील पडद्यावर येऊन) मला किती पण आनंद होत आहे हा!

पद १७ वें.

नाचत हें हृदय कसें। आनंदें डोलत किती गुंग असे ॥धृ०॥
सकल धीर होई गलित। करित काय व्याकुल हा। सहन
केवि होइ। हां हां प्रिया ॥ १ ॥ (जाते.)

प्रवेश पांचवा.

[**स्थळः**—जावळी; पुतळाबाई स्त्रीवेषांत येते.]

पुतळाबाईः-इतकी धांवपळ करीत त्या बहिरजीचा-त्या बहिरी ससाण्याचा डोळा चुकवून पुढें आलें तर, इथं काय आहे! बाबा कुठं दिसत नाहींत-रावसाहेब असून नसून सारखाच! दिवाणजी हणमंतराव कुठं तळ कोंकणांत आहेत, तर चुलते सूर्यराव कोणत्याशा शिकारीलाच गुंतले आहेत. काय करावं आतां. शेवटीं जावळी लढविणार कोण? शिवाजी महाराज तर महाबळेश्वराहून निसणीच्या घाटांत उतरूं लागले. हां हां म्हणतां ते जवळ येतील. आम्ही त्यांचे हेर, खुद्द जावळींत, हशमगडांत तर येऊन दाखल झालोंच. आतां या जावळीचं कसं होणार? बाबा कुठं तरी कैफ करून पडले असतील झालं! एवढ्या मोठ्या बलाढ्य राजाची काय ही दैना! माझ्या आईचं मात्र दुर्दैव ओढवलं हेंच खरं. कांहीं तरी करून आधीं बाबांना सावध केलंच पाहिजे. ते



सुंदरसानी:—महाराज, माझ्या आयुष्याचं सार्थक केलंत.

[अंक ४- प्रवेश ४- पृष्ठ ८८.

कंबरबंद होऊन पुढं आल्यावर मग होऊं दे काय व्हावयाचं तें! (जाऊं लागते तों पुढून बहिरजी येतांना दिसतो) अग बाई! हा बहिरी ससाणा इकडनंच आला ग बाई! (दुसऱ्या बाजूनें निघून जाते. हशमाच्या वेषांत बहिरजी प्रवेश करतो.)

बहिरजी:—(स्वगत) कुठं झुकांडी दिलीन् त्या विश्वासरावानं समजेना! त्याच्यावर चांगली नजर ठेव म्हणून तर महाराजांनीं बजावून बजावून सांगितलं. पण पहातां पहातां कुठं गडप झाला तेंच समजेना! (विचार) आम्ही आलोंत जावळी सर करायला. आणि जावळीकर बघावेत तर बसलेत जांभया देत! कोणताच मालक कोणच्याच ठिकाणावर नाहीं. वेळ चांगली असली म्हणजे हें असं जुळून येतं. नाहींतर १० हजार हशमांची ही जावळी अशी का झोंपेंत सांपडली असती? संभाजी कावजीला भेटून चला आधीं महाराजांना बातमी देऊं या. पण तो विश्वासराव, आतां कुठं शोधावा? मोठा गुणाचाच पुतळा दिसतो! (जातो.)

प्रवेश सहावा.

[**स्थळः**—कोमलसानीचा रंगमहाल. चंद्रराव, राघोबल्लाळ, संभाजी कावजी, कोमलसानी, सुंदरसानी वगैरे.]

राघो बल्लाळः—मग आतां आम्हांला सांगा काय तें. आमच्या अटी तुम्हीं ऐकल्यात ना? पुनः एकदां सांगतों पाहिजे तर.

चंद्रराव:—थांबा. आधीं एक चीज होऊं दे. (सुंदर एक चीज म्हणते, तिची आस्ताई झाल्यावर) थांब ग सुंदर. हां, काय तुमच्या अटी सांगा पाहूं.

राघो बल्लाळः—स्वधर्मसंस्थापनेच्या कार्याची जोखीम तुम्ही पाहिजे तर आपले शिरावर घ्या.

चंद्रराव:—म्हणजे आयतंच तोफेच्या तोंडीं जावं—

संभाजीः—आम्ही तुमच्या झेंड्याखालीं येऊं. मुद्दा हा कीं, मोठेपणाचा प्रश्न नाहीं, कार्याचा प्रश्न आहे.

चंद्रराव:—असं का! ही तुमची अट कबूल नाहीं. (सुंदरसानीस) चालूं दे ग सुंदर! (चीज खलास झाल्यावर) वडी—! हां बोला, आणखी कांहीं?

राघो बल्लाळः—तुमची आमची सोयरीक व्हावी. पुतळाबाई महाराजांना द्याव्या.

चंद्रराव:—खुशाल घेऊन चला. कबूल-ही अट कबूल-वडी? आणखी कांहीं एखादी चीज म्हण ग! आणखी अट कोणती?

राघो बल्लाळ:—तुमच्या हद्दींतून अदिलशाहीचे लोक येऊन आमच्या मुलखाला त्रास देतात. तुम्हींही त्यांस मदत करतां, असं होऊं नये.

चंद्रराव:—कबूल नाहीं. चीज म्हण ग! तुमच्या मुलखाला आम्ही त्रास देणार. तुमची अट कबूल नाहीं. वडी-चीज म्हण ग-शराबा (चीज म्हणतां म्हणतां सुंदर शराबचे पेल्यावर पेले देते.)

चंद्रराव:—हां-हां-हां. थांब ग थांब सुंदर थांब. आणखी कांहीं अट आहे काय? शराब. (दारूचा पेला हातीं घेऊन अट ऐकतो.)

राघोपंत:—हें कांहींच होत नसेल तर तुम्ही स्वस्थ बसा. आम्हांला पांच हजार लोक द्या. अदिलशाहीपासून तुमचं रक्षण आम्ही करूं.

(इशारा मिळतांच संभाजी व राघोपंत खेरीज सगळे जातात.)

चंद्रराव:—काय! या चंद्ररावाला नौकर व्हा म्हणतां? या आदिलशाहीच्या राजाला चाकरी करा म्हणतां. तुमच्या त्या शिवाजीच्या गमजा फार चालल्यात हो! ठोंकरेसरशीं उडवून देऊन कांकडीसारखा चिरून काढीन ठाऊक नाहीं? पण तो शिवाजी केव्हां सांपडेल तो सांपडो म्हणा; पण लांब जीभ काढून मला नौकर व्हा म्हटलंत. माझा अपमान केलात, त्याचं आधीं प्रायश्चित घ्या.

राघोपंत:—(तरवार सरसावून येणाऱ्या चंद्ररावास) राजे चंद्रराव, भलता अविचार करूं नका.

चंद्रराव:—अरे जा, शहाण्याच्या कांद्या, माझा अपमान करतोस? जीभच छाटून टाकतो तूं काय समजलास?

राघोपंत:—संभाजी, पहातां काय?

संभाजी:—हा पहा पुरा केलाच. (चंद्ररावाला मारून, एकमेकांस 'चला चला' म्हणून धांवत जातात. दुसरे बाजूनें पुतळाबाई 'बाबा' 'बाबा' म्हणून हांका मारीत येते व झालेला प्रकार पाहून 'हाय! हाय! शेवटीं घात झालाच! 'बाबा!' म्हणून चंद्ररावाचे आंगावर मूर्च्छित पडते.)

अंक चवथा समाप्त.



चंद्रराव:—हां-हां-हां. थांब ग थांब, सुंदर थांब. आणखी कांहीं अट आहे काय? शराब—

[अंक ४-प्रवेश ६—पृष्ठ ९०.

अंक पांचवा.

प्रवेश पहिला.

[स्थळः---जावळी, पुतळाबाई चंद्ररावाच्या वधामुळें कष्टि अशी प्रवेश करते.]

पुतळाबाई—(स्वगत)

पद १८ वें.

मोहुनि मुकवी माया मोद महान । भास खरा भासवी भुलवी
भाट ॥ धृ०॥ जनक जननी जी निज मानी । ममता लावि
तहान । अंतीं शांती सकलही हरी । रडवी थोर लहान॥

एकंदरींत बाबांचा शेवट असा व्हावा काय? ज्याच्या तरवारबहाद्दरीवर आदिलशाही सुस्त होती, तो माझा पिता, तो राजा चंद्रराव असा मारला जावा आं ! कोण दुर्दैव हें ! बाबा, कसलं विलक्षण प्राक्तन हें तुमचं ? हाडाचीं काडं करून तुम्हीं या बाजूला आपलं नांव केलंत, खरं म्हटलं तर तुमच्यासारख्या योद्ध्याला रणमैदान हीच मृत्युशय्या योग्य ! किती अपमानकारक मृत्यू हा ! हा सारा प्रताप त्या कैफाचा ! कैफाच्या भुलीं भुलून चंद्ररावासारखा कर्दनकाळ ढेंकणासारखा चिरडला गेला ! हाय ! धिक्कार असो अशा व्यसनाला आणि त्याच्या आहारीं जाणाऱ्या आत्मघातकी पशूंना ! बाबा, त्या व्यसनाच्या पायींच हो तुमचे गुण मातीमोल झाले. आणि असली दुष्कीर्तीची अखेर तुमच्या नशीबाला आली ! (विचार) पण बाबा, माझ्या इतक्या श्रमाचा कांहींच का उपयोग होऊं नये ! जावळीवर शिवाजी चालून येतो आहे, ही खबरसुद्धां तुम्हांला नव्हती–काय तुमची बातमीदार मंडळी तरी काय करीत होती ? इतके गाफील कसे राहिलांत ? जावळी राजकारण महाडला शिजत आहे, हें तुम्हांला माहीत असतां तुम्ही केवळ बादशाही घमेंडीवर गेलांत आणि आपली धूळधाण करून घेतलीत झालं ! (विचार) जावळी राजकारणाची वाटाघाट चालली होती, त्यामध्यें हा असला दुष्ट हेतु होता

म्हणायचा आं! दगा करावा अशी 'आज्ञा होती म्हणायची एकूण! थोर कार्याला उभे राहिलेले कर्तबगार पुरुष दगा करूं पहातात! राजकारणांत बरंवाईट, पापपुण्य, कांहीं नसतंच कीं काय! माझ्या बाबांचा खून करणारा स्वधर्मसंस्थापनेच्या पवित्र कार्याचा पुढारी व्हायला अगदीं योग्य नाहीं. पवित्र कार्याच्या मार्गावर पातकी कृत्यांची वाटमारी व्हावयाचीच, पण त्या फांसांत न सांपडतां निभावून जाईल तोच थोर. अशा थोर कसोला माझ्या बाबांचा शत्रू कांहीं उतरला नाहीं. मला वाटतं सध्यांच्या लोकांच्या मनच्या विचाराचा फायदा घेऊन यथेच्छ स्वार्थसाधूच अवतरला आहे. कोण राक्षसी दांभिकपणा हा! असल्या दांभिक माणसाला, माझ्या बाबांच्या खुनी पुरुषाला मी या जगांतनं जशास तसं याच न्यायानं पार हुसकून दिलं तर काय हरकत आहे! एक तर बाबांच्या खुनाबद्दल सूड घेतल्यासारखा होईल, आणि दुसरं असं कीं उगीच मोठ्या नांवाखालीं लोकांना फसविणारा ढोंगी नाहींसा करून लोकांचंही कल्याण केल्यासारखं होईल. एवीं तेवीं गोष्टी या थराला आल्या आहेत खऱ्या. आतां पुढं पाऊल टाकून एकदांचा सोक्ष कीं मोक्ष काय होतो पाहूं या. (सगुणाबाई येते तिला) आई, काय ही तुझी अवस्था! एवढ्या धुरंधर घराण्यांतली तूं!

सगुणाबाई:—घरांत कामधेनू असली तरी तिचा योग्य उपयोग करून न घेतला तर दोष कोणाचा? बाळ, आपल्याच हातानं आपल्या पायावर धोंडा पाडून घ्यायचा आणि उगीच भलत्याच्या नांवानं खडे फोडायचे? आम्हांला कमी काय होतं? आली का आदिलशाही आमच्या वेळेला धांवून? अजून तरी येते आहे का?

पुतळाबाई:—आदिलशाहीचं आदिलशाहीला पुरें झालं आहे! तिचं तिला बूड सांवरेना! ती येते आहे तुमच्या मदतीला! नांव कशाला पाहिजे!

सगुणाबाई:—मग आतां तूंच सांग भलत्याच अभिमानाला पडून आम्ही सर्वस्वाला मुकलों कीं नाहीं? शिवाजीबरोबर सख्य करायचं नव्हतं तर निदान बंदोबस्तानं, सावधगिरीनं तरी राह्याचं कीं नाहीं? मग शिवाजीनं दगा केलान् तर का दोष त्याला? मला तरी असं वाटतं, कोणत्याही बाबींत दुसऱ्याला दोष देण्याचे आधीं आपली करणी कशी आहे हें पहावं! बसलों कीं नाहीं शेवटीं सारं गमावून!

पुतळाबाई:—कांहीं–कांहीं उपयोग झाला नाहीं माझ्या श्रमाचा!

सगुणाबाई:—कसा होणार बरं उपयोग? अग, जिकडे न्याय तिकडे जय.

पुतळाबाई:—दगा करणं हा न्यायच का?

सगुणाबाई:—प्रत्यक्ष समोरासमोर येऊन निभाव लागणार नाहीं अशी शिवाजीला पुरती खात्री वाटली असं नाहीं का दिसत यावरून?

पुतळाबाई:—म्हणून शिवाजीनं दगा करावा?

सगुणाबाई:—मला नाहीं वाटत यांत शिवाजीचा कांहीं दोष आहेसा! बाजी शामराज आल्यापासून शिवाजी आमच्याशीं मोठ्या दिलदारपणानंच वागतो आहे. अपमान न करतां बाजीरावाला पाठवून दिलान! आमचं निशाणसुद्धां मोठ्या आदरानं परत केलंन! नाना प्रकारानं आमची मनधरणी करून पाहिलीन! तरी आम्ही आमचा हट्टच चालविला तर तो तरी काय करील? त्याला आदिलशाहीबरोबर भांडायचं आहे. आमचे लाड पुरवीत तो बसला असता तर त्याचा निभाव लागताना. राजकारणांत हे दगेफटके चालायचेच.

पुतळाबाई:—मग असं दगाबाज वर्तन कोणींही करावं?

सगुणाबाई:—करतातच! कोण करीत नाहीं? सगळे करतात! दुसऱ्याला दगाबाज म्हणून दोष देण्यापेक्षां, त्याला दगा न करतां येईल असा सावधपणा आपणच कां बरं न ठेवावा? जगांत धक्काबुक्की सारखी चाललीच आहे. एकदां शत्रू असा कोणी ठरला, कीं त्याच्याविषयीं सावध तर राहिलं पाहिजेच, पण त्याचं नुकसानही करतां येईल तितकं केलं पाहिजे. असं न करील तो या जगांत राह्यलाच योग्य नाहीं म्हणेनास!

पुतळाबाई:—मग आई, जशास तसं असंच मी वागलें तर?

सगुणाबाई:—काय म्हणतेस तूं? तूं कुणाला दगा का करणार?

पुतळाबाई:—होय! माझ्या बाबांच्या खुनाचा सूड घेणार—

सगुणाबाई:—होऊं नये तें झालं खरं! पण बाळे, तो खून नव्हे, शत्रूला नाहींसा करण्याचा एक मार्गच आहे.

पुतळाबाई:—त्याचप्रमाणें मीही माझ्या शत्रूला मारतें—

सगुणाबाई:—पण यांत हेतु काय बरं?

पुतळाबाई:—हेतु आणखी कसला? बाबांच्या खुनाचा सूड—

सगुणाबाईः—म्हणजे केवळ एकटा तुझा स्वार्थ—? यांत राजकारण तें काय आहे बरं?

पुतळाबाईः—राजकारणसुद्धां यांत आहेच. मी यंव करतों नी त्यंव करतों म्हणून उगीच बडेजाव माजविणाऱ्याला नाहींसा केला तर लोकांची तरी फसगत तितकीच कमी होईल? स्वार्थ साधायला असंच ढोंग माजवावं लागतं!

सगुणाबाईः—केवळ लूटमार करावी आणि देश हाताखालीं घालावा एवढाच हेतु असतां तर शिवाजीनं आमचा मुलूख आमच्याचकडे कधींही ठेवला नसता.

पुतळाबाईः—म्हणजे कांहीं तो ढोंगी नाहीं असं नाहीं म्हणतां येत. मी तरी जशास तसं अशीच वागणार. त्याला दग्यानं ठार करणार!

सगुणाबाईः—नको बाळ, असं करूं नकोस. आज मी ज्याकरितां शोक करतें आहें, त्याच शोकांत सईबाईला तूं पाडूं नकोस. आज शिवाजीचे आईबापही हयात आहेत! त्यांनाही दुःख होणारच! आपल्या सूडाची इच्छा भागविण्याकरितां एवढा अनर्थ माजविण्याचं पातक तूं डोईवर घेऊंच नकोस. शिवाय दांभिकपणानं असो अगर कसंही असो, त्यानं स्वधर्मरक्षणासाठीं स्वराज्य स्थापण्याचं मोठं काम शिरावर घेतलं आहे. शिवाजीला नाहींसं करून तूं त्याही कार्याला दगाच आणणार ना? नको, असलं कांहींच करूं नकोस बाई! शिवाय, बाजीरावाला जावळीचं राज्य देऊन शिवाजीनं आमच्या-वर उपकारच केले आहेत. त्यालाही आम्ही जागलंच पाहिजे. (बाजीराव प्रवेश करतो.) रावसाहेब, कुठं गेला होतास? कांहीं भलत्या भानगडींत पडूं नकोस हं! दिवाणजी आणि भावोजी दोघांचीही काय गत शिवाजीनं केली ऐकलीसच आहेस!

बाजीरावः—सारं कळतं आहे मला. एवढ्याच करतां का बोलावलंस?

पुतळाबाईः—विजापुराशीं तुम्ही सूत बांधतां हें शिवाजीला समजत नाहीं असं कां तुम्हांला वाटतं? त्याचे हेर तुमच्याभोंवतीं सारखे डोळ्यांत तेल घालून फिरत आहेत.

बाजीरावः—त्यांतलीच तूंही एक आहेस. आमच्या इथली सारी बातमी शिवाजीला तुझ्याशिवाय दुसरं कोण देणार? एवढा घरभेद्या मिळाल्यावर—

सगुणाबाई:—अरे, तुझ्या नशिबीं तरी काय आहे ? तुझ्या आंगीं नाहीं कर्तबगारी, नाहीं शहाणपण, नाहीं तलवार बहाद्दरी, नशिबानं पदरांत पडलं आहे, तें तरी गरीबीनं राहून राख, कीं तुझे पराक्रमी वडील—

बाजीराव:—त्यांचा तसा घात व्हायला कारण ही ! ही राक्षशीण, ही पांढऱ्या पायाची, कोणत्या वेळेवर आमच्या घरांत आली आहे काय कीं ! आमच्या घराण्याच्या राशीलाच लागली आहे.

सगुणाबाई:—आहाहा ! तुझं तुलाच शोभतंय झालं बोलणं हें !

पुतळाबाई:—बोलूं दे, वाटेल तें बोलूं दे. पण हें बघ आई, यांच्यावर असलेल्या हेरांत मीहि एक आहेच. यांचा अन् विजापूरकरांचा पत्रव्यवहार चालू आहे, असा शिवाजीला पक्का संशय आला आहे. त्याकरितां यांचे कागदपत्र मुद्देदस्त करण्याचीही आम्हांस आज्ञा झाली आहे. रावसाहेब, तुम्ही अद्याप शुद्धीवर या. शिवाजीबरोबर स्पर्धा करण्याची लायकी तुमच्यांत नाहीं, स्पष्ट सांगतें. उगाच प्राणाला मुकाल आणि आधींच दुःखानं होरपळलेल्या या माझ्या माउलीला आणखी पुत्रशोकाच्या खाईत ढकलून द्याल. याशिवाय दुसरं कांहींही तुमच्या हातून व्हायचं नाहीं.

बाजीराव:—बरं, बरं. तुझाच आधीं चांगला बंदोबस्त करतों. तूं काय समजलीस ! (रागानें निघून जातो.)

पुतळाबाई:—आई, आतां यापुढं मी इथं रहाणं अगदीं सुरक्षित नाहीं. मला आतां माझ्या नशिबाची परीक्षाच पाहिली पाहिजे. मी मनांत योजल्याप्रमाणं साहस तर करणारच. त्यांतच माझा भाग्योदय नसेल कशावरून ? रावसाहेबाच्या मूर्खपणाच्या रागाला बळी पडण्यापेक्षां त्या साहसांत मरण आलेलं बरं. चल तर आई, मला आतां कायमचा निरोप दे. माझ्यापासून तुला सुख कांहीं नसेलच तर मी तरी काय करणार ?

पद १९ वें.

विकल करित हा काल । कसा भना ? । स्वहित न कळत
जना । हृदया समज ना ॥ धृ० ॥ समजत सारें सुख सुख-
भासा । भोग विभोगा भाल ॥ १ ॥

(जातात.)

प्रवेश दुसरा.

[स्थळः--सुंदरमठ.]

श्रीरामदासः—(स्वगत) जेणें फेडिला पांग ब्रह्मादिकांचा। बळें तोडिला बंद त्या त्रीदशांचा ॥ म्हणोनी कथा थोर या राघवाची। जनीं ऐकतां शांत होते भवाची ॥ १ ॥ जयजय रघुवीर समर्थ ॥ श्रीरामा, आपल्या अनुज्ञेप्रमाणें धर्म-प्रभावनेचं कार्य आतां चांगलं नेटास लागलं आहे. चंद्ररावाचा कांटा अखेरीस निर्दयपणें उपटूनच काढावा लागला. काय करावं? अशी शक्ति आणखीही पुष्कळ ठिकाणीं फुकट जावयाचीच आहे, त्यासाठीं खेद तरी किती करावयाचा? धर्मग्लानीचा जोर इतका भयंकर कीं, उच्च वर्णाचे ब्राह्मणसुद्धां स्वकर्म काय, याची भूल पडून स्वधर्माच्या मार्गांत सराट्याच्या कांट्याप्रमाणं जाचक होत आहेत. 'ब्राह्मण बुद्धीपासून चेवले। आचारापासून भ्रष्टले। गुरुत्व सांडून झाले। शिष्य शिष्यांचे ॥' हें तर दिसतच आहे! याच शिवथर खोऱ्यांत दादजी शिवबावर उठला होता तो ब्राह्मणच! शेवटीं त्याचे डोळे काढून त्याला सोडावा लागला! त्यानं तरी तो अंतर्मुख होईल तर पाहिजेच आहे! (विचार) तरीपण इतके दिवस संतमंडळी स्वधर्मसंस्थापनेच्या कार्याची पूर्वपीठिका तयार करीत आली आहे, म्हणून तरी श्रीरामा, थोडा फार धर्म शिल्लक राहिला आहे; नाहीं तर केवळ या भारतीयांवर अनर्थच कोसळला असता. आम्ही म्हणजे एका चांगल्या राष्ट्राचे घटक आहोंत हीच भावना आधीं आमची नष्ट होत चालली होती. संतमंडळींच्या लक्षांत ही गोष्ट आली, आणि त्यांनीं त्या आपत्तीचं निदान धर्मसुधारणा हें ठरविलं. धर्मसुधारणेवांचून राष्ट्रोन्नति व्हावयाची नाहीं, राष्ट्रोन्नतीचं मुख्य अंग धर्मच, असं संतमंडळांनीं हेरलं, व त्याप्रमाणें त्यांनीं धर्मजागृति चालू ठेवली, श्रीशंकराचार्यांनीं पुनरुज्जी-वित केलेल्या आर्यधर्माची ग्लानि होऊन ढोंगी कर्मठपणाचं स्तोम मात्र माजलं आणि दांभिक मूर्तिपूजेला महत्व येऊन अनाचाराचा प्रादुर्भाव खूप झाला. पारमार्थिक सुखाच्या काल्पनिक हांवेच्या भरीः पडून ऐहिक कर्तव्याची हेळसांड झाली. चातुर्वर्ण्यव्यवस्थेचा विपर्यास झाला, भलतीं सामाजिक बंधनं उत्पन्न झालीं. त्यामुळं विशिष्टवर्णाचं विशिष्ट तेज लुप्त होऊन एकमेकांच्या द्वेषाचं बीज मात्र रुजलं गेलं आणि गुप्तागुप्त वर्णसंकर होऊं लागला. श्रीरामा, अशी अन-

वस्था या भारतवर्षांत उत्पन्न झाल्यामुळें अर्थातच शत्रू बळावले आणि त्या बरोबरच अनर्थपरंपराही वाढली! सध्यां तर अशी स्थिति झाली आहे कीं, कितेक म्लेंछ होऊनी गेले। कितेक फिरंगणांत आटले। देशभाषेनें रोधले। कितीएक॥ महाराष्ट्र देश थोडा उरला। राजकारणें लोक रोधला। अवकाश नाहीं जेवायला। उदंड कामें॥ (पड्यांतः—**दिवाकर गोसावीः**-जनीं भक्त ज्ञानी विवेकी विरागी। कृपाळू मनस्वी क्षमावंत योगी॥ प्रभू दक्ष वित्पन्न चातुर्य जाणे। तयाचेनि योगें समाधान बाणे॥ जयजय रघुवीर समर्थ) शिवबाकडे गेलेला दिवाकर गोसावी परत आला वाटतं [दिवाकर प्रवेश] काय राजे भेटले? कुशल आहेत ना?

दिवाकर गोसावीः—(वंदन करून) भेटले. कुशल आहेत; पण भेटीची आर्त फार.

रामदासः—मग काय सांगितलंस—?

दिवाकरः—जावळीराजकारण झाल्याशिवाय होणें नाहीं असं सांगितलं!

रामदासः—फारच जवळचा काल सांगितला—बरं, पण आणखी कांहीं?

दिवाकरः—हें एक पत्र दिलं आहे!

रामदासः—शिवबानं—!! मग त्याला लिहितां वाचतां येतं तर!

दिवाकरः—महाराज, पत्र अभंगात्मक आहे, साधं नाहीं!

रामदासः—शिवबाच आधीं अभंग, मग त्याचं पत्रही अभंगात्मकच असलं तर नवल काय! वाच बघूं तें पत्र.

दिवाकरः—सद्गुरु बापा तूं माहेरा। मातें तुझाचि उबारा। पार कीजे भवसागरा। पूर्ण उदारा स्वामिया॥१॥ अनन्याच्या प्रतिपाळका। दारुण भवभयहारका। रक्षा आपुल्या बालका॥ नका नका उपेक्षूं॥ २॥ भवसर्पें गुंडाळलें। तेणें मन हें व्याकुळ झालें। हित अहित विसरलें। सांभाळिलें पाहिजे॥३॥ मोकलिलें तुम्हीं जरी। निरवावें म्यां कवणेंपरी। तुम्हांविण गति दुसरी। मातें नाहीं दयाळा॥ ४॥ शुद्ध करोनिया मन। पूर्ण निजरूप जाणून। रामदासीं लोटांगण। शिवराजानें घातलें॥ ५॥

रामदासः—पाहिलंस दिवाकर? चंद्रराव आणि शिवबा यांत किती जमीन अस्मानाचें अंतर होतं तें!

दिवाकरः—(चपापून) आहे कीं होतं महाराज!

रामदासः—वाणी अन्यथा वदलीच नाहीं. येईल थोड्या वेळांतच प्रत्यय. देवद्रोही म्हणजेच देशद्रोही. चंद्ररावाला या असल्या पातकाबद्दल कुत्र्यासारखं मरावं लागलं! देवद्रोह्यांचं नशीबच हें!

दिवाकरः—अखेरीस चंद्ररावाला मरावंच लागलं आं!

रामदासः—त्याच किंमतीचा तो. त्याला कांहीं रूप यावं म्हणून मी सुद्धां कांहीं दिवस प्रयत्न करून पाहिला. पण अदिलशाही–अदिलशाही करीत ठार झाला! आतां तरी इतर देवद्रोही सावध होतील काय?

दिवाकरः—नाहीं तर चंद्ररावासारखेच तुटले जातील!

रामदासः—पण शक्तिक्षय केवढा होतो बरं! हाच चंद्रराव आणि शिवबा एक होऊन अदिलशाहीवर उठले असते तर? पण उभयतांचे प्रकृतिगुणच भिन्न! दोघेही आदिलशाही किताबवाल्यांचे चिरंजीव, दोघेही हुषार, दोघेही बलाढ्य, दोघेही कर्तबगार; पण एकानं परिस्थितीची उशी घेऊन उड्डाण केलं आणि दुसरा तिच्याबरोबर विरोध करून उलथा पडला! म्हणून मी नेहमीं म्हणतोंः—बरें पाहा, बरें पाहा। करील प्रेत्न जीतुका। तयास लाभ तीतुका ॥ अरे, प्रसंग हा कठीण हो। बहुत पावले मोहो। परंतु येत्न पाहाती सुखेंचि तेचि राहाती ॥ आपल्या हातून काय होणार? असं म्हणत हातपाय गाळून कां बसतां? अरे, केल्यानें होत आहे रे। आधीं केलेंची पाहिजे। येत्न तो देव जाणावा। अंतरीं धरितां बरें ॥

दिवाकरः—आज इतकीं शतकं परराज्याखालीं गेल्यामुळें चंद्ररावासारख्यालाही स्वतःच्या शक्तीचा विसर पडला. आत्मविश्वास उत्पन्न व्हावयाला कांहीं तरी अंतरंगींची जागृति पाहिजे होती. पण अदिलशाहीच्या सत्तेचा दरारा त्याला हूं कीं चूं करून देईना. फुकट बिचारा प्राणास मुकला.

रामदासः—हा सारा प्रताप एक धैर्याच्या अभावाचा. मीं चंद्ररावाला पुष्कळ टोंचून पाहिलं. पण काळ कठीण आहे म्हणून हात पाय मात्र जास्तीच गाळूं लागला. जगांत सारखी घडामोड चालली असतां, हें तुम्ही समस्त देखतां आणि कठीण काळ धाकतां? आतां काय म्हणावं या असल्या अवसान घातकी लोकांना! अरे, धीर धरा, धीर धरा, तकवा ॥ हडबडूं गडबडूं नका ॥

अरे, भिण्याचं तें कारण काय? काळ देखोनि वर्तावें ॥ सांडावें भय पोटिंचें ॥ पण चंद्रावासारखीं " अधीर माणसें खोटीं। काम कांहीं कळेचिना ॥ " हीं असलीं माणसं कर्त्यांच्या मार्गांतले खांच खळगे होत.

दिवाकरः—महाराजांच्या संगतींत राहूनही चंद्रराव कोराच राहिला, खरो-खरच हतभागी तो. इतका स्वधर्मभ्रष्ट, स्वकर्मविमुख तो कसा होता?

रामदासः—हा केवळ अदिलशाही अन्नाचा परिणाम! त्या अन्नामुळं त्याचे थोर गुण मातीमोल झाले.

दिवाकरः—मग हाच दोष शिवाजी राजांमध्यें कां बरं दिसूं नये?

रामदासः—शहाजी राजे यांनीं पारतंत्र्यांतलं अन्नही सारखे संस्कार देऊन देऊन जिवंत ठेवलं म्हणून! शहाजी राजे म्हणजे का कोणी सामान्य पुरुष आहेत? निजामशाही ज्यानं आपल्या मांडीवर खेळविली, मोंगलाला ज्यानं माहुलीपासून अहमदनगरपर्यंत सहज लीलेनं नाचविला, विजापूर-करांना धाकांत ठेवून जो आपली भाकरी मिळवीत आहे, त्याचा हा शिवबा बापसे बेटा सवाई कां नाहीं होणार? अरे शुद्ध बीजापोटीं, रसाळ गोमटीं फळंच यावयाचीं.

दिवाकरः—इतके का शहाजी राजे पराक्रमी आहेत?

रामदासः—नुसते पराक्रमीच काय; पण राजकार्यधुरंधरही आहेत. अरे, आपल्या या सांप्रदायाचं त्रिकांडात्मक रूप जें " मुख्य हरिकथानिरूपण। दुसरें तें राजकारण। तिसरें तें सावधपण। सर्व विषयीं ॥ " याचं बाळकडू शिवबाला आपल्या वडिलांकडूनच मिळालं आहे. भोसल्यांनीं पारतंत्र्यांतही आपली बीजशक्ति कायम राखली तशी ती मोऱ्यांनीं राखली नाहीं. दोन्हीही मराठी घराणीं अस्सलच. पण एकानं पारतंत्र्यांतल्या भाकरीला पचवलं, आणि दुसऱ्याला त्याच भाकरीनं पिचविलं. हाच चंद्रराव आणि शिवबा यांतला फरक. कालाच्या दुर्गतीमुळें परदास्य कपाळीं बडवलं तरी आदिशक्तीचं हृद-यस्थ ठाण भ्रष्ट न होऊं देणं हीच तर खरी कर्तबगारी. भोसल्यांनीं ही कर्तब-गारी बजावली आणि मोरे—

दिवाकरः—कां बरं महाराज, मोरे बलाढ्य का कमी होते?

रामदासः—रेडे, बैल, हत्ती का कमी बलाढ्य असतात? पण त्यांच्या

शक्तीला आदिस्थान कुठं आहे. शारीरिक बळाला आत्मिक शक्तीचा बंधारा पाहिजेच पाहिजे. अरे हा धकाधकीचा मामला आहे. इथं दुर्बळाचें काम नाहीं. ज्याला माणसासारखं जगायचं आहे, त्याला या शक्तिदेवीचा प्रसाद पाहिजेच पाहिजे. अरे, "शक्तीनें चालतो देहो। शक्ती नसतां देहे पडे । अरे प्रत्यक्ष रामचंद्रांनीं "मुक्त केल्या देवकोडी । सर्वही शक्तिच्या बळें।" शक्तीशिवाय सर्व व्यर्थ आहे. "शक्तीनें मिळतीं राज्यें । युक्तीनें लाभ होतसे । शक्तियुक्ति जये ठाईं। तेथें श्रीमंत धांवती ।" असा तिचा प्रभाव आहे. दिवाकर, अरे आम्हांलासुद्धां तिचाच आधार आहे. "समर्थ भवानी माता । समर्था वर दीधला । बोलणें हें प्रचीतीचें । अन्यथा वाउगें नव्हे ॥" अशा या दिव्य शक्तीला चंद्रराव पाठमोरा झाला, त्याचं प्रायश्चित्त त्याला मिळालं. (पाहून) हे कोण येतात?

दिवाकर:—कोणी हत्यारी दिसतात. (बाहेर जातो.)

रामदास:—आहाहा! धन्य या रामोपासनेची! सर्व कांहीं क्षणभंगुर आहे, होणार तें होणार, कर्ता करविता परमेश्वर आहे; अशी अद्वैत, निःसंग, निरामय वृत्ति नाहींशी होऊन "लोकांमध्यें तरे आणि जना तारी। धन्य तो संसारीं॥" ही वृत्ति या रामोपासनेमुळेंच तयार होते. "संसारीं दोनि साधावीं। येहलोक साधती परत्र हा यहलोक सर्वं। शक्तीन्सार घरोघरीं॥" माझा स्वतःचा अनुभव तर असा आहे. "कांस या रघुनाथाची। धरितां सुख पावलों ॥ सांकडीं तोडिलीं माझीं । राघवें करुणालयें ॥ सेविला देवदेवांचा । तेणें मी धन्य जाहलों ।" मानवप्राणी आधींच नचि; त्याला "नीचाश्रय कामा नये ॥" रामचंद्रासारख्या प्रतापसूर्याचा दास व्हावं. कारण "महत्कीर्ती श्रीरामाची। फावला महादाश्रयो ॥" हा माझा प्रत्यक्ष अनुभव आहे. "विवेकें देहबुद्धि सोडूनि द्यावी । विदेहीपणें मुक्ति भोगीत जावी॥" हें चिरंतन ज्ञान मलाही रामकृपेनेंच झालें. म्हणून "धन्य हे रामउपासना." माझ्या आवडत्या महाराष्ट्राला मी विशेष काय सांगूं? "रामदास्य घडे ज्याला । ते सर्वत्र रामदास हो ॥" बाबांनो, "अंतरींची वेथा श्रीरामा समर्था। जाणवल्या चिंता दुरी करी॥" हें लक्षांत ठेवा. तुम्हांला आत्रिक आणि पारत्रिक मोक्ष पाहिजे असेल तर महाराष्ट्रा, ऐक, माझे प्रचीतीचे बोल ऐक. "तत्काळची मोक्ष हें ब्रीद रामाचें। होत

आहे साचें येणें काळें ॥ येणें काळें मोक्ष जरी मी देईना । दास म्हणवीना राघवाचा ॥" आणि एवढ्याचसाठीं हा सगळ्या रंजल्या गांजल्यांचा आप्त, हा दुःखितांचा कैवारी, हा पीडितांचा उद्धारकर्ता, हा रामदास महाराष्ट्रा, तुला छातीला हात लावून सांगतों कीं, मी "राघवाचा वर, पावलों सत्वर." हा कांहीं माझ्यासाठीं नव्हे, तर "जनाचा उद्धार करावया," हें पक्कें लक्षांत ठेव. (दिवाकर गोसावी, संभाजी कावजी, राघोपंत, विश्वास, बहिरजी, बाजीराव येतात.) भवाच्या भयें काय भीतोसि लंडी । धरी रे मना धीर धाकासि सांडी । रघूनायकासारिखा स्वामि शीरीं । नुपेक्षी कदां कोपल्या दंडधारी ॥ म्हणा, "जय जय रघुवीर समर्थ" (जयजयकार होतो. सर्व वंदन करितात.)

दिवाकरः—हे संभाजी कावजी, हे राघोपंत अत्रे, जावळी राजकारणांतले प्रमुख सरदार; हे बहिरजी, हे विश्वास, शिवबाचे प्रत्यक्ष डोळे; हे बाजीराव, चंद्रराव मोऱ्यांचे चिरंजीव.

रामदासः—वाः! हे सर्वच समर्थ कार्याचे चांगले पुरस्कर्ते आहेत. विश्वास, तुम्ही या, या बाजूला उभे रहा.

राघोपंतः—हा जावळीप्रांत महाराजांच्या कृपेनं श्रीशिवाजी महाराजांच्या हातीं आला.

रामदासः—नुसता जावळीच काय, पण आतां तुम्ही जें घेऊं म्हणाल तें तुमच्या हातीं येईल. श्रीकृष्णानदीच्या उगमाच्या प्रांतांत तुम्ही धर्मप्रभावनेच्या कार्याला प्रकट केलं आहांत. चंद्रराव मोरे स्वजातीय असतांही स्वधर्मकार्यार्थ तुम्ही त्याची भीडभाड कांहीं धरली नाहींत, आणि श्रीरामचंद्राच्या महाराष्ट्रधर्माचा झेंडा महाबळेश्वरच्या पुण्यतम शिखरावर फडकावलात. आतां तुम्हांला काय कमी आहे? कृष्णा व गोदा यांना मिळणाऱ्या नद्या, या एवढ्या प्रांताला आतां चेतना उत्पन्न झाली आहे. म्हणूनच मी याला—या प्रांताला आतांच्या या शुभप्रसंगीं **आनंदवनभुवन** हें नांव देतों. "पूर्वी जे मारिले होते । तेचि आतां बळावले । कोपला देवदेवांचा । आनंदवनभूवनीं ॥१॥ त्रैलोक्य गांजिलें मागें । ठाउकें विवेकीं जना । कैपक्ष घेतला रामें । आनंदवनभूवनीं ॥२॥ भीमची धाडिला देवें । वैभवें धांव घेतली । लांगूळ चालिलें पुढें । आनंदवनभूवनीं ॥३॥ येथून वाढला धर्मू । रमाधर्म समागमें । संतोष मांडला मोठा । आनंद-

रामदासः—आत्तांच आला होता तो. उपदेशाचे दोन शब्द सांगितले आहेत. त्याच्या नशिबाचा तो. सगुणाबाई, आतां कांहीं खेद करूं नका. राव-साहेबाला स्वतःचं कल्याण कशांत आहे हेंच समजत नाहीं, याला तुम्ही तरी काय कराल? तुम्ही आतां हळूहळू श्रीरामचंद्राकडेच लक्ष्य द्या. त्यानं तुमच्या मनाला समाधान वाटेल. या आतां.

सगुणाबाईः—(वंदन करतांना) निदान अखेर साधली तरी मिळवलं म्हणायचं.

रामदासः--अशा निराश होऊं नका. जगाचा पुष्कळ भाग अझून तुम्हांला पाहायचा आहे. (ती जाते.) विश्वास, तुला आम्हीं मुद्दाम आमच्या-कडे मागून घेतला आहे. दिवाकर, दिवाकर, अरे मी असा बोलत काय बसलों! अरे, कोण कुठं चालला आहे आणि कोण कुठं बसला आहे, हें काय? अरे दिवाकर, बहु वोखटी वेळ येऊन गेली। कृपासागरें धांवणी सीघ्र केली। सुतालागिं झेंपावला व्याघ्र जैसा। जगजन्नका तूं समस्तांसि तैसा ॥ अरे दिवा-कर, कोण कुणाची वाट पहात आहे आणि कोण कुठं प्रकट होत आहे, पहा तें. (सुंदरमठाच्या अंतर्भागीं तुळजामाता प्रगट होते.) या सुंदरमठांत मी अंतर्निष्ठ अखंडध्यानीं आहें हें पाहून ती पहा, ती पहा, "संनिध राम-वरदायनी। विश्वमाता त्रैलोक्यजननी। मूळमाया।" प्रगट झाली. हे आदि-शक्ति, तुझ्या चरणापाशीं एकच मागणें मागतों. "येकची मागणें आतां। द्यावें तें मजकारणें। तुझा तूं वाढवी राजा। शीघ्र आम्हांचि देखतां ॥ १ ॥ दुष्ट संव्हारिले मागें। ऐसें उदंड ऐकतों। परंतु रोकडें कांहीं। मूळ सामर्थ्य दाखवी ॥ २ ॥ देवाचीं राह्यलीं सत्वें। तूं सत्व पाहासी किती। भक्तांसी वाढवी वेगीं। इच्छा पूर्ण परोपरीं ॥ ३ ॥ रामदास म्हणे माझें। सर्व आतुर बोलणें। क्षमावें तुळजे माते। इच्छा पूर्णचि ते करीं ॥ ४ ॥ उदयोऽस्तु, उद-योऽस्तु, जगदंबे, उदयोऽस्तु. (पडदा.)

प्रवेश तिसरा.

[**स्थळः**—सुंदरमठाच्या नजिकचा भाग.]

विश्वासः--(प्रवेश करून स्वगत) जें पहावं तें विलक्षणच! हा खरो-खरच सिद्ध पुरुष आहे. अशा सिद्धपुरुषाचं पाठबळ असल्यावर धर्मसंस्था-

पनेचं कार्य यशस्वी होणारच! यांत कांहींच शंका वाटत नाहीं! (स्वगत) मलाच तैनातीला निवडून घेण्यांत महाराजांचा काय हेतु आहे कळत नाहीं. माझा छद्मवेष महाराजांना समजला असावा काय? आणि आतां तो समजला तरी हरकत नाहीं. मला या सिद्धपुरुषाजवळ राहूनही माझ्या मनांतली गोष्ट साधून घेण्याची संधी येईलच. (इतक्यांत बाजीराव मुसलमान वेषांत कांहीं मुसलमान सैनिकांसह प्रवेश करतो.)

बाजीराव:--पकडो, ये हरामजादीकू पकडो. (विश्वासच्या भोंवतीं गराडा पडतो. विश्वास निःशस्त्र असल्यामुळें गोंधळतो.)

विश्वास:—बेवकूब! खबरदार! ये राजा शिवाजीकी अदालत है. किसके उपर तुम् हत्यार चलाता है?

बाजीराव:—(उतावळेपणानें वेषाविष्करण करून) तुझ्यावर, तुझ्यावर हत्यार चालवितों समजलीस?

विश्वास:—समजलें, पुरतं समजून चुकलें—

बाजीराव:—काय?

पुतळाबाई:—तूं सूर्यापोटीं शनैश्वर निपजलास हें.

बाजीराव:--तोंड आटप. पकडा रे इला, पहातां काय?

पुतळाबाई:--मांगा, यांना कशाला तुझ्या पापाचे वांटेकरी करतोस? बाबांनो, अरे, तुम्ही त्या चंद्रराव राजांचंच मीठ खाल्लंत ना? चंद्रराव राजे मारले गेले, त्यापेक्षां हा कुत्रा कां तोडला गेला नाहीं, मी म्हणतें!

बाजीराव:--अरे, तुम्ही इच्या बडबडीकडे काय आ वासून पहातां?

पुतळाबाई:--माझा बाप चंद्रराव खरोखर राजा होता. नाहींतर हें पहा खापर! परस्त्रीवर माझ्या त्या पराक्रमी पित्यानं कधीं तरी हात टाकल्याचं तुम्हांला ठाऊक आहे का? आणि हा लांडगा प्रत्यक्ष स्वतःच्या बहिणीवर हत्यार सरसावून येतो, हें तुम्हांला पहावतं काय?

बाजीराव:-नाहीं, नाहीं, अरे ही माझी बहीण नाहीं. फड्यांत सांपड-लेली आहे. ही माझी बहीण होण्यापेक्षां माझ्या जनानखान्यांत लाथखाऊ दासीच होऊन इनं राह्यलं पाहिजे. तुम्ही इचं कांहीं ऐकूं नका. आधीं इचं तोंड बंद करा. काय नेभळे आहांत रे तुम्ही? यःकश्चित् ही बटीक तुम्हांला ऐकत नाहीं?

पुतळाबाई:—नेभळटा, माझ्या बाबांच्या शूर सैनिकांना नेभळट म्हणतोस ? अरे, ज्यांनीं शिरक्यांचं शिरकाण केलं, महाडिकांची हड्डी नरम केली, गुर्जरांना घागरा नेसविला, त्या या शूर पठ्ठ्यांना नेभळट म्हणतोस ? अरे, नेभळट कोण ? तूं. तूं नेभळट. माझ्या बाबांनं, त्या चंद्रराव राजानं, तोंडचा घांस देऊन वाढविलेले हे मर्द, बायकावर हात टाकण्याइतके भ्याड आहेत असं तुला वाटतं ? माझ्या वडिलांच्या, त्या चंद्रराव मोऱ्यांच्या, त्या चंडप्रतापी जावळीच्या राजाच्या हिरव्या निशाणाखालीं आपल्या मर्दपणाची शिकस्त करून निढावलेल्या रणबहाद्दर वीरांनो, ही पहा त्याच चंद्ररावानं पाळलेली ही पुतळाबाई, (रूपाविष्करण) चालवा माझ्यावर हत्यार, आणि करा खाल्लेल्या अन्नाचं चीज. (त्यांच्यापुढें ठाण मांडून उभी रहाते.) तुमच्या तलवारीची चमक भल्या भल्या शत्रूंना दाखविलीत. त्या तुमच्या मर्दानी समशेरी या अनाथ पोरीच्या काळजांत एकदम भोंसका आणि शूरत्वाला काळोखी फांसा. माझे समरप्रतापी वडील चंद्ररावांनीं तुम्हांला तरवार बहाद्दर केलं, त्यांचे उपकार त्यांच्याच या मुलीचे तुकडे तुकडे करून कायमचे फेडा.

शिपाई:—नही ! नहीं ! हम् लोक कभी भी ऐसा बूरा काम करते नही !–

बाजीराव:—(त्वेषानें) काय, तुम्ही इला पकडीत नाहीं ? इच्यावर हात उचलीत नाहीं ? बेमान ?

शिपाई:—(उलटून) खबरदार !

पुतळाबाई:—खरोखर तुम्ही माझ्या वडिलांचेच मर्द शिपाई आहांत.

बाजीराव:—आणि तूं मोठी दिवटी आहेस !

पुतळाबाई:—दाखवितेंच आतां मी कोण आहे तें !

बाजीराव:—(शिपायांस) ए पागल, हरामखोर, क्या बाता सूनकर चुप खडे है. करो, गिरफदार करो ए हैवान कूं.

पुतळाबाई:—(खवळलेल्या शिपायांस) मर्द हो, मर्दासारखे वागा ! तुम्ही शांत असा. द्या माझ्याकडे एक हत्यार.

बाजीराव:—खबरदार, हत्यार मत देव—

पुतळाबाई:—खुषी असेल तर द्या बाबांनो. माझा कांहीं तुमच्यावर जोरा नाहीं. पण तुम्ही आहांत मर्द, या नामर्दाशीं तुमचा प्रसंग नको, म्हणून मी तुम्हांला हत्यार मागतें, देतां का ? खुषीनं देतां का ?

बाजीराव:—सब हराम बन गये, कोई मत येव–हत्यार मत येव. गिरफदार करो बोलते तों कोई हुकूम भी नही सुनता! क्यों सुवर, क्या भूल गये—?

शिपाई:—खबरदार. (खवळतात.)

पुतळाबाई:—तुम्ही असे खवळूं नका. मला हत्यार द्या. मात्र खुषी असेल तर द्या हां:—(तो नको म्हणत असतां कित्येक आपल्या तरवारी पुढें करतात.)

शिपाई:—खुषीसे लेव. चाहीयेसे लेव.

पुतळाबाई:—(हत्यार घेऊन) आतां ये. बाजीराव, बोल मुकाट्यानं हत्यार खालीं ठेवतोस कीं दोन हात करतोस ?

बाजीराव:—कुकर्मानं जगांत आलेल्या हडळी, काय तोरा दाखवीत आहेस पण. एकदां माझ्या अंतर्महालांत आलीस म्हणजे तुझी ही वटवट कायमची बंद पडेल. चल, उभी रहा सरळ. कमअस्सल ती कमअस्सल आणि डौल काय आणते पण कुलीनपणाचा!

पुतळाबाई:—तुला दोष देऊन माझ्या पवित्र आईला, म्हणजे तुझ्याच सख्ख्या आईच्या शीलावर शिंतोडे उडविण्याचं पातक करण्याचं धारिष्ट मला कधींही होणार नाहीं. ती शीलवंत माउली कोणीकडे आणि तूं–तूं काय! मीं आधींच म्हटलं आहे कीं, तूं सूर्यापोटीं शनैश्वर! मोरे घराण्याच्या राशीस तुझी साडेसाती चांगली भोंवली. साऱ्या घराण्याची राखरांगोळी केलीस. त्या माउलीला तरी सुख द्यायचं होतंस. पण तेंही तुझ्या नशीबीं नाहीं. चल, ये, रहा, सरळ उभा रहा आणि दाखीव तुझी काय करामत आहे ती!

बाजीराव:—माझ्या घराण्याला तुझा पांढरा पाय बाधला. तुला माझ्या आईनं दूध पाजविलं त्याचे उपकार चांगले फेडलेस. घे, घे त्याचं हें प्रायश्चित्त. (हत्यार सरसावून तिच्या आंगावर जाणार इतक्यांत सगळे शिपाई, 'खबरदार हल्ला मत करो. औरत के उपर हत्यार चलाता है, शरम नही आती?' असें म्हणत गराडा घालतात.)

पुतळाबाई:—शाबास मर्दानो, पकडा त्या मूर्खाला आणि चला घेऊन सुभेदार संभाजी कावजीकडे. (त्याला पकडतात.) कुलांगार, पहा तुझे हे धिंडवडे! न्या, त्याला सुभेदाराकडे न्या. बाजीराव—

पद २० वें.

कांहीं लाज न हृदया । स्वहित न तव नेलया । तव मूढ कसा अहंकार न्यायाला स्वसुख लया । कवण जन्म तुज देई । स्मरणांत ठेवुनी हें । टाकितोस अरि–भया ॥ १ ॥ रामा–समान शिव हा । मानितास, आणितास स्वालया ॥ २ ॥

तुझीं शंभर वर्षं भरलीं–तुझ्याविरुद्ध इतक्या कागाळ्या सुभेदारांकडे आल्या आहेत कीं, तूं कांहीं आतां निभावत नाहींस. पण नको, याला कारण मी नको. माझ्या आईला दुःख होईल. तूं तिच्या काळजाचा तुकडा, जीवींचा जीव, प्रेमाचा झरा, अंतरींचा जिव्हाळा, तुला नाहींसा करून तिच्या हृदयाला धक्का, तिला प्रत्यक्ष मृत्यु देण्याची माझी छाती होत नाहीं. (शिपायांस) मर्दांनो, हा तुमच्या चंद्रराव राजांचाच मुलगा आहे. द्या, द्या त्याला सोडून. त्याचं हत्यारसुद्धां काढून घेऊं नका. जाऊं द्या, त्याला खुशाल जाऊं द्या. आपल्याच दुष्कर्मानं त्याला मरूं द्या. बाजीराव, जा, तुला कांहीं सांगण्याची अवश्यकताच नाहीं, कारण तुझे डोळे तूं मेल्यावर तरी उघडतील कीं नाहीं याची शंकाच आहे. जा, जा, जा तुम्ही त्याच्या बरोबर आलेत तसे चला. मधला प्रकार विसरून जा. (ते मुजरा करतात व जातात.) अखेरीस आईला पुत्रशोक होणारच ना? काय भवितव्यता आहे कळत नाहीं!

पद २१ वें.

करुणा कुणाला? काला न तूं सदय ॥ धृ० ॥ भारत–भालीं–काय कळेना ॥ १ ॥

(जाते.)

प्रवेश चौथा.

[स्थळः—चाफळ खोरें, शिंगणवाडीच्या नजिकचा भाग.]

बहिरजीः—(स्वगत) श्रीसद्गुरु महाराज या चाफळखोऱ्यांत आले आहेत म्हणून हेळवाकला समजलं. तांतडीनं इकडं आलों. सद्गुरुमहाराजांनीं बांधलेलं देऊळ पाहून श्रीरामाचं दर्शन घेतलं. तिथं समजलं, कीं सद्गुरु शिंगण-

वाडीच्या रानांत आहेत. तसेंच पुढं झटकलों आणि या शिंगणवाडीच्या रानांत आलों. सद्गुरूंचा शोध करतां करतां महाराजांची व माझी चुकामूक झाली. काय करावं आतां? हा प्रांत तर शत्रूचा. कोणी पाळत राखून दगा केला तर काय करावं? महाराज तर या बाबतींत अगदींच बेफिकीर झाले आहेत. गुरुमाउली रक्षण करणार समर्थ आहे म्हणावं, दुसरं काय? (इतक्यांत, पडद्यांतः–' बोलो दीन, दीन ' असा आवाज ऐकूं येतो.) आं, चाफळच्या सुभेदाराच्या लोकांनीं रोखलंच वाटतं. आतां ही दाढीच काय रक्षण करील तें खरं (घाईघाईनें दाढी घालून मुसलमानी तऱ्हेचा रुमाल बांधून, नमाज पढूं लागतो.) या बाबांनो आतां, काय सुखसोहळा आहे पाहूं या. (' दीन दीन ' करीत मुसलमान शिपाई येतात.)

हवालदारः—करो, इसकू गिरफदार करो. ए काफर, काय कूं फसाता है, उठाव, सालेकू एकदम गिरफदार करो. (शिपाई बहिरजीला हिसकाहिसकी करून उठवतात. एकजण त्याचा रुमाल व दाढी काढतो.) क्यौं बे, तुम क्या मुसलमीन हो! बोल लौंडी तुम कौन है? नहीं तो एकदम कांट डालूंगा.

बहिरजीः—आतां तुम्हांला कोण पाहिजे आहे, हें तरी मला काय ठाऊक? तुम्हांला कोण पाहिजे? मीच पाहिजे का?

हवालदारः—बोल तुम ऐसे मुसलमीन काय कूं बन गये?

बहिरजीः—अलीकडे मुशाफरी मोठी कठीण झाली आहे पहा. मला वाटलं कोणी मराठे मुसलमानी वेष घेऊन दीन दीन करीत आले आहेत; पण पहातों तों तुम्ही खरंच मुसलमान! मी पहा ही दाढी मुद्दाम सोईस्कर अशीच केली आहे. दाढी लावली, कीं मी तुमचाच आहें. या ती इकडं तुमच्या माणसाला असा त्रास कां बरं देतां?

हवालदारः—अरे ए तो लफंगा है! और वो काफर शिवाजीभी लफंगाच है! (शिवाजीचं नांव ऐकतांच बहिरजी जास्त घाबरल्याचा बहाणा करतो.) दोस्त, ए देखो, ए कैसा करता है. इसका क्या हवाल हुवा देख.

बहिरजीः—पायां पडतो, नाईकसाहेब, हवालदारसाहेब, सरदारसाहेब, पायां पडतों, मी शिवाजी नाहीं, मी दिसतों शिवाजीसारखा तरी मी शिवाजी नाहीं, खरंच नाहीं हो.

कित्येक:—अरे, एच शिवाजी है, खास एच शिवाजी है. काफर बडा बदमाष है. देखो कैसा फसाता हैं तों !

बहिरजी:—नाहीं हो, फसवीत नाहीं हो. मीच हो शिवाजी. धरूं नका हो मला. (तो गयावया करतो. त्याला नेऊं लागतात, इतक्यांत श्रीशिवाजी महाराज प्रवेश करितात.)

शिवाजी:—खबरदार, सोडा, आधीं त्याला सोडा! (मुसलमान शिपाई झटक्यासरशीं त्याला सोडून देतात.)

हवालदार:—तूं कोन?

शिवाजी:—तुझा बाप—

हवालदार:—अरे, यही है, शिवाजी तो यही है, ये देख कैसा डुरडुर करता है ?

बहिरजी:—नाहीं रे बाबांनो, मीच आहें रे शिवाजी, हा कोण भुरटा आला आहे. (श्रीशिवाजीवर उसळतो) माझं नांव घेतोस ? बरं पाहून घेईन. (शिवाजी महाराज हंसूं लागतात.) काय, दांत काय काढतोस ? इथं जीव चाललाय आणि तुला हंसूं येतं होय ? हवालदारसाहेब, हा शिवाजी नव्हे मी शिवाजी.

हवालदार:—ये तर मर्द, मेरेकू, मेरा वालीद बोलते है.

बहिरजी:—अहो साफ खोटं. हा तुमचा बाप होणार नाहीं, तसा शिवाजीही होणार नाहीं. हा बडा चोर दिसतो. माझं नांव चोरतो, तसं तुमचं वालिदपणही चोरतो आहे. ए चोरा, याद राखून ऐस, पुन्हां घे माझं नांव, कीं दाखवितोंच. चल हो चालता इथून, चल, जा, हो, आधीं चालता हो, नाहीं तर घेतों पहा तुझ्यापुढं डोकं आपटून देतों प्राण. माझं नांव घेतोस ? माझ्या आईबापांना मी एकटाच आहें ! (रडूं लागतो.)

हवालदार:—अरे ए, सैतानके बच्चे, रोता हैं काय कू ?

बहिरजी:—अरे बाबा, हा भामटा माझं नांव घेतो, माझं नांव घेतलं म्हणून मला रडूं येतं. हवालदारसाहेब, तुमचा बाप आहे म्हणतो हा, तरी तुम्हांला रडूं येत नाहीं, त्याला काय करूं मी ! (श्रीशिवाजीस) अरे ए गृहस्था, जा कीं रे बाबा तूं, कां उगीच माझ्या राशीला लागला आहेस ?

हवालदार, इसकू हकाल देव. नहीं तो देख हम् डोका फोडकर घेतां हैं ! (इतक्यांत पडद्यांतः—जया चक्षुनें लक्षितां लक्षवेना । भवा भक्षितां रक्षितां रक्षवेना ॥ क्षयाभीत तो आक्षौ मोक्ष देतो । दयादक्ष तो साक्षिनें पक्ष घेतो॥ १ ॥ जयजय रघुवीर समर्थ असा कल्याणस्वामींचा आदेश ऐकूं येतो.)

सर्व मुसलमानः—सांई महाराज आये, सांई महाराज आये,—(कल्याणस्वामी प्रवेश करतात, त्याला सगळे अगदीं जमिनीवर पडून कुर्निसाद करतात. श्रीशिवाजी महाराजही नमस्कार करतात.)

हवालदारः—(बहिरजीला) अरे ए पागल, करो, बंदन करो. (तो भीत भीत नमस्कार करतो.)

बहिरजीः—साधू महाराज, मी शिवाजी आहें हो— (रडूं लागतो.)

हवालदारः—शिवाजी है तो रोता है कैसा—!

कल्याणः—अच्छा है ! हवालदार, जाने येव इनकू. कोई हिंदु मुशाफीरकू तोशीस मत देव.

हवालदारः—हां हुकूम. (सर्व वंदन करून जातात.)

कल्याणः—श्रीसमर्थांची स्वारी ती पहा, त्या मारुतीच्या पारावर बसली आहे.

श्रीशिवाजीः—(पाहून) आहा हा ! सद्‌गुरुमाउली !—(धांवतच जातात.)

प्रवेश पांचवा.

स्थळः—[शिंगणवाडीच्या मारुतीच्या देवालयाच्या कट्ट्यावर श्रीसमर्थ बसले असून श्रीशिवाजी त्यांच्या चरणावर मस्तक ठेवून नम्र झाले आहेत, जवळ बहिरजी आणि श्रीकल्याण उभे आहेत; असा पडदा उघडतो.]

रामदासः—(शिवाजी महाराजांच्या मस्तकीं हात ठेवून) शिवबा,

शिवाजीः—महाराज !

रामदासः—स्वानुभवाचें पालवी । शुद्ध गाळिले आघवी ॥ सघनीं हरपलें गगन । सहज गगन तें सघन ॥ सदा शुद्ध स्वप्रकाश । अवकाशाविणें

आकाश ॥ रामी रामदास म्हणे। अनुभवाची ही खूण ॥ १ ॥ (शिवाजी महाराजांना समाधी लागते) कल्याणा, राजे साक्षात्कारी आहेत, मूळचेच स्वानुभवी आहेत.

कल्याणः—लोह-परिसाची उपमा द्यावीशी वाटते.

रामदासः—कल्याणा, हा पृथ्वीदेवीचा कुंकमतिलक, स्वराष्ट्रभूचा उद्धारक, स्वधर्माचा संस्थापक, आपल्या इथं आला आहे, याला प्रसाद द्यायचा आहे, तयारी आहेना ?

कल्याणः—सर्व तयारी सन्निधच ठेवली आहे.

रामदासः—कल्याणा, म्हणा, मना गूज रे तूजला प्राप्त झालें ॥ परी अंतरीं पाहिजे यत्न केले ॥ सदा श्रवणें पाविजे निश्चयासी ॥ धरी सज्जनीं संगतीं धन्य होसी ॥ १ ॥ जयजय रघुवीर समर्थ ॥ उठा, शिवाजीराजे उठा, हा प्रसाद घ्या.

शिवाजीः—महाराज, आपल्या पायाचा प्रसाद मिळाला आहे. आतां मला आणखी दुसरा प्रसाद कशाला पाहिजे ?

रामदासः—शिवबा, तुमचं म्हणणं सत्य आहे. आम्ही हा प्रसाद तुमच्या पदरांत टाकणार हा तुमच्याकरतां तर मुळींच नाहीं. अरे, तुला आमच्या पायाच्या प्रसादाचीसुद्धां आवश्यकता नाहीं. तुला आम्ही प्रसाद देणार, देत आहोंत, तो आपल्या महाराष्ट्रधर्माकरितां. शिवबा, या आपल्या महाराष्ट्रांत जिकडे तिकडे स्वधर्माची अवहेलना होत असलेली पाहून " प्रस्तुत कोपला देवो। देवद्रोही पुरे पुरे॥ सर्वही चालिल्या फौजा। सेनाभार परोपरी॥ देव तो चतला आहे। भडसा पूर्वीतसे ॥ काये होईल पहावें। राहावें सुख-भुवनीं ॥" अशी स्थिति आली आहे. आतां देवद्रोह्यांनीं आपला कारभार पुरे करावा. लोकजागृति झाली आहे. तीच श्रीरामाचें चैतन्यस्वरूप होय. लोकांच्या इच्छा तद्वाराच पुऱ्या होणार आहेत. या सुखभुवनांत, या आनंदवनभुवनांत, या महाराष्ट्रांत राहूनच आपणांला हें पाहायचं आहे; घडवून आणायचं आहे. एवढ्यासाठीं शिवबा, आम्ही हा प्रसाद तुमच्या पदरांत टाकतों आहोंत.

बहिरजीः—(श्रीरामदास श्रीशिवाजी महाराजांचे पदरांत प्रसाद टाकीत



रामदासः—या सुखभुवनांत, या आनंदवन-भुवनांत हें आपणांस घडवून आणायचं आहे. एवढ्यासाठीं शिवबा, आम्हीं हा प्रसाद तुमच्या पदरांत टाकतों आहोंत.

[अंक ५-वा प्रवेश ५-वा पृष्ठ—११२.

असतां, स्वगत) काय ! मूठभर माती ! दोन मुठी लीद ! चार मुठी खडे ! काय हो हा विलक्षण प्रसाद ?! (प्रसाद घेतल्यावर शिवाजी महाराज प्रदक्षिणा घालून नमस्कार करून हात जोडून उभे राहतात.)

रामदासः—शिवबा, 'आमचें बोलणें स्पष्ट। म्हणोनि न व्हावें कोपिष्ट। उचित प्रकारें ऐकावें नीट। सांगितलें कांहीं॥ शिवाजी राजे, 'मनापासून चालणें वागणें असेल, तरी आमचा मार्ग स्वीकारावा, श्रीराम कृपा करील, तुमचीं कार्यें होतील, मनेच्छा सिद्धीस जाईल, येविशीं मनांत मळ बाळगूं नका.'

शिवाजीः—महाराज, 'आपण सांगाल त्याप्रमाणें चालेन, अन्यथा वर्तणार नाहीं.' सद्गुरूची सेवा करून देहसाधन करावं, अशी इच्छा आहे.

रामदासः—आमचीही इच्छा देहसाधन करावं अशीच होती. पण श्रीरामाचीच आज्ञा, कीं तुम्हांस बोध करून धर्मप्रभावना करावी. दोन तीन वर्षं या प्रांतीं रहात आलों. तुम्ही आम्ही उभयतांही स्वतःविषयीं अगदीं निरिच्छ आहोंत. परंतु **रामसर्वोत्त**माची इच्छा. तुमचाही हेतु जाणीतला, आमचा योग कळविला, आतां '**तुम्हीं** आम्हीं एक व्हावें। आलें कार्य हें॥

शिवाजीः—ते कार्य **म्हणजे** धर्मसंस्थापनेचेंच—

रामदासः—होय. शिवबा, "तुम्ही आम्हांत अंशभूत। प्रजेचें करा कांहीं हित। धर्मस्थापावा तुम्हां उचित। काळपरत्वें॥ धर्माकरितां मरावें। मरोनि अवघ्यांसि मारावें। मारतां मारतां घ्यावें। राज्य आपुलें॥ राज्य आहे धर्मनीतीचें। नीतीकरितां सर्व साचें। साच चालतां वैभवाचें। मान पावती॥"

शिवाजीः—महाराज, ही भवानी माता मानाकरितांच घेतली आहे, ही आपल्या चरणीं वाहतों. (पुढें ठेवतात).

रामदासः—(तलवार हातीं घेऊन) आपला पंथ धारकारी आहे, माळकरी अगर वारकरी नाहीं. तेव्हां ही तलवार घ्या. (हातीं तलवार देतात.) शिवबा, "मानाकरितां तलवार घेतली। वैरीकुळें संहारिलीं। प्रगट कीर्ति जगीं झाली। आनंद मूर्ति॥ आनंद असावा सर्वांठायीं। शूरत्वें करावी कमाई। कमाईकरितां सुख देहीं। पावेल तोची॥" शिवबा, आपल्या पंथांत

हेंच केलं पाहिजे. " ऐसे प्रकारें श्रीपति आपुलासा करावा । प्रपंच बरा ओळखावा । राजकारणीं शत्रु निर्बळ करावा । धर्म बळेंचि स्थापावा । येथें आळस नसावा । भ्याडपणा सोडावा । शिवबा, चार लोक जवळ केल्याशिवाय तुमचें चालणार नाहीं. तेव्हां "आधीं मनुष्य ओळखावें। योग्य पाहूनि काम सांगावें। निकामी हे दंवडावे । एकीकडे ॥ अमर्याद फितवे खोर । यांचा करावा संहार। शोधिला पाहिजे विचार । यथातथ्य ॥ उदंड मुंडें असावीं । सर्वही एक न करावीं । वेगळालीं कामें घ्यावीं । सावधपणें ॥ "

शिवाजीः—सद्गुरुमहाराजांच्या उपदेशाप्रमाणें अक्षरशः वर्तन करीन.

रामदासः—शिवबा, प्रसंगोपात आम्हीं तुला मार्गदर्शक होऊंच; पण सारांश इतकाच ध्यानीं आणावा कीं, " मराठा तितुका मेळवावा । आपुले जीवीं जीववावा । आपुल्या समान करावा । निष्ठा पाहोनी ॥ " उदंड राजकारण करावें, केव्हांही उदास न व्हावें, कारभारी यांचे सल्लयाशिवाय वर्तू नये, तीर्थपूजा करून आपला कारभार पहावा, अंतर्भाव ठेवावा. आम्हांवरी लोभ असावा. तुमचा संकल्प सिद्धीस जावा. आमचे ठायीं मन लावावें. सर्व मनोरथ सिद्ध होतील. हें आमचें मागणें शिवबा आम्हांला कृपा करून देतां ना ?

शिवाजीः—महाराज, हा दास सर्वांशीं आपला आहे. याच्या हातून वाटेल ती सेवा घेण्यास श्रीसद्गुरु समर्थ आहेत. महाराजांच्या दर्शनास आज इतके दिवस सारखा आर्त होऊन बसलों होतों. माझ्या भाग्यसूर्याचा उदय आज झाला.

रामदासः—शिवबा, हा भाग्योदय तुझा एकट्याचाच नव्हे, तर आमचाही आहे. आज तुम्ही आम्ही एकत्र झालों. जीवशिवाचं मीलन झालं. आतां हा राष्ट्रपुरुष उदयोन्मुख झाला. आतां महाराष्ट्राचे दुर्दिन संपले. आतां महाराष्ट्राच्या अंतरंगांतली अवदशेची वस्ती उठली. आतां महाराष्ट्राच्या कुदशेची सद्दी संपली. आतां महाराष्ट्र 'महा राष्ट्र' होणार, आतां महाराष्ट्रदेवीच्या भालपटलावर स्वातंत्र्याचा देदीप्यमान तिलक झळकणार, आतां महाराष्ट्राच्या यशोदुदुंभी दशदिशा दणाणून सर्व आशाळभूत पोटभरूंना स्वतःच्या चरितार्थाकरितां पाचारण करणार! महाराष्ट्र आतां भाग्यवंत होणार, महाराष्ट्र श्रीमंत होणार, महाराष्ट्र शक्तिमंत होणार! शिवबा, तुझ्या आणि आमच्या मीलनाचा परिणाम म्हणजे महाराष्ट्रदेवीच्या मस्तकावर स्वतंत्रतेचा दिव्य मुकुट येणार

आणि त्याच्या तेजोमय प्रकाशांत सर्व प्रकारचा अंधार नष्ट होणार! या सर्व अलौकिक घटनेचा मूळ पाया कोण? तर शिवबा, तूं. तुझ्या हातून या साऱ्या गोष्टी होणार. आणि तूंही यश घेणारच; पण आम्हांलाही सहजासहजीं यश देणार! शिवबा, धन्य तुम्ही आणि तुमच्या वडिल, मातुःश्री! महाराष्ट्र तुमचं यशोगान सदैव करीत राहील.

शिवाजीः—या सर्व प्रकारामुळं माझं अंतःकरण अगदीं भरून आलं आहे. महाराज, आपल्या चरणापाशीं म्या पामरानं विशेष बोलून तें काय दाखवावं? आपण सर्वांतर्यामीं आहांत. महाराष्ट्राच्या भाग्यश्रीचं भालपटल उज्ज्वल करण्याचं महत्कार्य आपण सद्गुरु माझ्या हातून करणार आहांत. याबद्दल मला अभिमानानं विश्व ठेंगणं वाटणं साहजिकच आहे. या यःकश्चिताला आपण एवढी मोठी पदवी दिली! समर्थ काय करूं शकणार नाहींत? महाराज, मी आपला दास आहें. आपल्या समर्थशक्तीच्या जोरावर या महाराष्ट्रांत सनातन-धर्म निर्भय करून त्याच्याकडे इतःपर कोणीं वांकड्या नजरेनं पाहूं नये, म्हणून स्वराज्यस्थापन करीन. आपल्या या पवित्र पदकमलाची शपथ घेऊन सांगतों, कीं स्वधर्मसंस्थापनेकरितां स्वराज्य स्थापन केल्याशिवाय हा आपला दास क्षणमात्रही विश्रांति घेणार नाहीं. आपलं हें कार्य देवकार्य आहे, हें धर्मकार्य आहे. सद्गुरो, हें आपलं समर्थकार्य आहे. हा आपला पवित्र आदेश आहे, हा महाराष्ट्रानं स्वोद्धारार्थ फोडलेल्या हंबरड्याचा प्रसाद आहे. यासाठीं हा आपला शिवबा, शहाजीराजे यांचा मुलगा, जिजाईचा प्राण, सद्गुरूंचा विसांवा, महाराष्ट्राचा आत्मविश्वास, स्वधर्माचा महामेरू, स्वराज्याचा विजय, घे घे म्हणून मुलूख सर करील, संकटांना घालवील, पंचमहाभूतांना त्रस्त करील, मी मी म्हणणाऱ्यांना शरण आणील आणि अखेरीस सद्गुरूंचं नांव सर्वत्र नवखंडांत गाजवीलच गाजवील! महाराज, हा दास अनन्यभावें शरण आहे. याला आतां आज्ञा असावी.

रामदासः—शिवबा, या प्रांतीं आम्हीं आलों. दोन तीन वर्षें वस्ती केली. तो आमचा स्वधर्मकार्याचा **सुंदरमठ** तुम्हांला दाखवावयाचा आहे. त्या सुंदरमठाचं वर्णन आम्हीं काय करावं? त्या ठिकाणीं आतां तुम्ही या. शिवबा, आतां हा महत्त्वाचा प्रसंग समाप्त करण्याचे वेळीं तुम्हांस एवढेंच सांगतों कीं, "तुटे

वाद संवाद तेथें करावा । विवेकें अहंभाव हा पालटावा । जनीं बोलण्यासारिखें आचरावें । क्रिया पालटे भक्तिपंथेंचि जावें ॥ जयजय रघुवीर समर्थ.

(जयजयकारांत पडदा पडतो.)

प्रवेश सहावा.

[**स्थळः**—जावळी. **पात्रें:**—संभाजी, कावजी, राघोपंत.]

संभाजीः—राघोपंत, शेवटीं बाजीराव सांपडलाच. आतां त्याला कांहीं वांचवितां येणें शक्य नाहीं.

राघोपंतः—आतां काय वांचवितां! महाराज कांहीं तुम्हांला सुद्धां आतां क्षमा करणार नाहींत.

संभाजीः—विजापूर दरबारबरोबर पत्रव्यवहार करण्याच्या भानगडींत हा मूर्ख कशाला पडला आणखी!

राघोपंतः—केवळ त्याच्या आईकडे पाहून आजपर्यंत आपण त्याला संभाळून घेतलं. खरोखरच सगुणाबाई म्हणजे मूर्तिमंत शील आहे!

संभाजीः—तिच्या पोटीं हें असलं रत्न उत्पन्न होऊन तिला काडीमात्र तरी सुख झालं असेल कीं नाहीं, शंकाच आहे.

राघोपंतः—मग आतां पुढं विचार काय? मला वाटतं, कांहींतरी निमित्त काढून बाजीरावाला जावळींतून बाहेर काढावा. आणि बाहेरच्या बाहेर त्याला गिरफदार करून महाडास पाठवून द्यावा.

संभाजीः—बरी आहे ही. युक्ति! म्हणजे सगुणाबाईच्या दृष्टिदेखत सगळा सोहळा व्हायला नको.

राघोपंतः—आतां नाहीं मला वाटत जावळीराज्य महाराज ठेवतीलसें.

संभाजीः—पाहूं या काय काय होतंय तें! बाईच्या मनांतून पुतळाबाई महाराजांना देऊन जावळीही पदरांत घालण्याचं आहे. धाकट्या मुलाची सोय महाराज कुठंही करतीलच.

राघोपंतः—बाई हुशार आहे. एवढा पोर चांगला असता तर तिनं बरीच कामगिरी करून दाखविली असती. चला तर, ठरल्याप्रमाणं बाजीरावाला बाहेर काढूं या. (जातात.)

प्रवेश सातवा.

[**स्थळः**—सुंदरमठ. **पात्रेंः**— श्रीशिवाजी महाराज निजले असून पहाऱ्यावर विश्वास आहे.]

विश्वासः--(स्वगत) किती महत्त्वाचा आजचा हा प्रसंग ! आणून सुद्धां आला नसता. मीं आणि महाराज, शिवाजी महाराज ! दोघेच, अगदीं दोघेच. कसं पण अगदीं अचानक घडून आलं हें ! (विचार) यांत कांहीं श्रीसद्‌गुरूंचीच करणी असावी काय? मी कोण आहे, हें सद्‌गुरूंना कळलंच आहे. माझा हेतु काय आहे, हें त्यांनीं ऐकून घेऊन ' पहा तुझा तूं प्रयत्न करून ' असं हंसतच मला सांगितलं ! तेव्हां आतां या आलेल्या अपूर्व संधीचा आपण पुरेपूर फायदा घेतलाच पाहिजे. (विचार) दिवाकर गोसावी कालच कुठं कीं गेले ऐन दिवस बुडण्याच्या सुमारास महाराज आले. बरोबर तो बहिरजी सुद्धां नाहीं. इथली सगळी बरदास्त मलाच ठेवावी लागली. महाराज गाढ झोंपी गेले व सद्‌गुरुनाथ नित्याप्रमाणं अरण्यांत चालते झाले, जातांना ' विश्वास, सावध रहा हां ' म्हणून कितीपण प्रेमळ शब्दांत सांगितलं ! (विचार) खरंच पुतळाबाई, तूं आतां काय करणार ? आपल्या बापाचा सूड उगविणार काय ? हा दगेखोरांचा राजा आयता तुझ्या सपाट्यांत सांपडला आहे, तर हो पुढं आणि कर एक घाव नी दोन तुकडे ! (विचार) पण यांत कांहीं अविचार नाहीं ना होणार ? आणि असला अविचार मी केला म्हणून सारं जग माझी छीः थूः करणार नाहीं का ? एवीं तेवीं मी उघडीच झालें आहें ! मला आतां लोकापवादाची ती भीति काय? माझ्या बाबांशीं यांनीं दगा केला, तेव्हां यांच्याशीं दगा करायला मला कांहींच हरकत नाहीं. तेव्हां पुतळाबाई हो पुढं, घे आपल्या पित्याच्या खुनाचा सूड ! (आवेशानें खंजीर उपसून मारण्यास जाते. इतक्यांत श्रीशिवाजीमहाराजांच्या प्रसन्न स्मित चेहऱ्याकडे तिचें लक्ष जाऊन ती स्तंभित होते.) काय ? इतकं हें प्रसन्न मुखकमल ! कुणाशीं बरं हंसतां महाराज? माझ्याशीं का ? आपण इतके हंसतां तरी कां? महाराज ! आपल्या या चेहऱ्यावर खुनी माणसाचा क्रूरपणा कां बरं दिसत नाहीं ? खरंच का आपण खुनी नाहीं ? काय नाहीं ? अगबाई, मग मी उगीच आपला घात करणार होतें ! (या झटक्यांत हातांतला जंबिया खालीं

पडतो, त्याच्या आवाजामुळें शिवाजी महाराज घाबरून एकदम उठून पळून जाऊं पाहणाऱ्या पुतळाबाईचा हात धरून तिला उभी करतात.)

शिवाजीः--विश्वास, (ती खालीं मान घालून उभी राहते) विश्वास, काय करीत होतास ?

पुतळाबाईः—(सर्व शक्ति एकवटून मनाचा निर्धार करून) विश्वास ठेवला त्याचं सार्थक करणार होतों.

शिवाजीः--होतों ? विश्वास—

पुतळाबाईः—विश्वास, 'होतों' म्हणणाऱ्या, पुरुष वेषांतरांतल्या या व्यक्तीवरच महाराजांनीं ठेवला होता ना ?

शिवाजीः—वेषावर कीं व्यक्तीवर ? इतके दिवस नाना प्रकारची कामगिरी वेषानं केली कीं व्यक्तीनं केली ?

पुतळाबाईः—(गोंधळते.)

शिवाजीः—व्यक्तीनं केली, होय ना ?

पुतळाबाईः—होय—

शिवाजीः—त्या व्यक्तीला आपल्या नांवाला न शोभणारं वर्तन करायला आजच काय बरं कारण झालं ?

पुतळाबाईः—विश्वास कीं अविश्वास, सत्य कीं असत्य-माझा मलाच गोंधळ पडला आहे, महाराज.

शिवाजीः—मग हा गोंधळ माझ्या फायद्यावरच पडला म्हणायचा !

पुतळाबाईः—मलाही तसंच वाटतं—

शिवाजीः—तूं अशी दगेबाज कां झालीस ?

पुतळाबाईः—दगेबाज !

शिवाजीः—होय. दगेबाज-तूं दगेबाज कां झालीस-विश्वास ?

पुतळाबाईः—झालें नाहीं महाराज, जें माझ्या हातून घडलं नाहीं, तें घडलं असतं तर कदाचित् मला समाधानही वाटलं असतं.

शिवाजीः—माझा घात कां बरं करणार होतीस ?

पुतळाबाईः—महाराज, आपण माझ्या वडिलांचा घात कां बरं केलात ?

शिवाजीः—तुझे वडील कोण ?

पुतळाबाईः—राजे चंद्रराव, जावळीचे वाघ—

शिवाजीः—त्यांची का तूं मुलगी ?! पुतळा ती तूंच का ?!

पुतळाबाईः—महाराज, आपण माझे वडील दगाबाजीनं मारलेत. आपण दगेबाज झालांत. मी मात्र होणार होतें. आपण अपराधी आहांत. आपण दगा करून माझ्या वडिलांना ठार केलंत. माझा वडिलांचा खून केलात. महाराज, आपण आपलं यश खुनी रक्तानं कां बरं मलीन केलंत ? आपण माझ्या वडिलांना समोरासमोर गांठून युद्धांत ठार केलं असतंत तर महाराज, मीं माझ्या वडिलांच्या धारातीर्थी पडलेल्या शरीरावर धन्यतेचे अश्रुसिंचन करून वीरकर्म करणारे आपण, त्या आपणावरही सुमनांचा हेतुपूर्ण वर्षाव केला असता. पण महाराज, आपण माझ्या वडिलांना दगेबाज कृतीनं मारवून त्यांनाही स्वर्गाचीं कवाडें उघडून जाण्यास अधिकारी होऊं दिलं नाहींत, आणि सोज्ज्वल कुमारिकेच्या अंतःकरणांतील रमणबागेंतल्या सुमनाचाही गुच्छ घेण्याला आपण अधिकारी राहिला नाहींत! महाराज, आपण दगेबाज कां झालांत ? आपण खून कां करविलात ? त्याबद्दल आपण प्रायश्चित्त काय घेतलं आहे ?

शिवाजीः—मी दगेबाज झालों ?

पुतळाबाईः—निकोप वृत्तीच्या कुमारिकेच्या अंतःकरणाचा निकाल महाराज तुमच्या विरुद्ध आहे. महाराज, तुम्ही दगेबाज झालांत.

शिवाजीः—पण माझं म्हणणं ऐकल्याशिवायच ? निकाल एकतर्फी देण्याची घाई कां बरं ? पुतळा, तुझ्या वडिलांना मी तुझ्याबद्दल मागणी केली होती—

पुतळाबाईः—(अधीरतेनें) आणि ती—

शिवाजीः—त्यांनीं मान्यही केली होती. पण इतर सर्व अटी त्यांनीं फेटाळून लावल्या. आम्ही आदिलशाहीशीं झुंजत आहोंत, आमच्यावरची जबाबदारी, आमचा व्याप, तूं इतके दिवस प्रत्यक्ष पाहिला आहेस. आमच्या उद्योगाला पुतळा, तुझ्या वडिलांचा कांटा आमच्या कुशींत खुपत राहून जोर चढला असता का ? कार्याला चित्तस्वास्थ्य मिळालं असतं का ? आदिलशाहीबद्दल भलत्या अभिमानाच्या भरीं पडलेला तुझा बाप—

पुतळाबाईः—मग त्याला समोरासमोर बोलावून त्याच्याशीं दोन हात करून त्याला रणांगणांतलं वीरोचित मरण कां दिलं नाहीं ? मराठे वीर वाघाला सुद्धां बेसावध असतां मारीत नाहींत ना ?

शिवाजीः—पुतळा, तुझा बाप आमच्यापेक्षां कंवरबंद होता. उघड उघड सामना करून तो जेर झाला नसता. कदाचित् त्यानं आम्हांलाच जेर केलं असतं—

पुतळाबाईः—म्हणून दगा केला? म्हणून खून केला?

शिवाजीः—स्वधर्मसंस्थापनेच्या महत्त्वाच्या कार्यासाठीं—

पुतळाबाईः—स्वधर्मसंस्थापनेच्या पवित्र इमारतीच्या पायांत माझ्या बापाला घातलात–महाराज, त्याचा खून करून घातलात. आपण दगा केलात, खून केलात, हा आरोप आपल्यावर खास शाबीत होतो.

शिवाजीः—न्यायअन्याय यांच्या कांटेतोल विचारानं पाहिलं तर या दोषाचा डाग मल लागतो यांत शंका नाहीं. पुतळा, मला वाटतं स्वधर्म-संस्थापनेच्या महत्तम कार्याकडे पाहून असलीं कृत्यं क्षमार्ह समजलीं जावींत.

पुतळाबाईः—स्वधर्मसंस्थापनेचा आपल्या सारखाच प्रयत्न मागें एकदां श्रीकृष्णभगवंतांनीं केला आहे. त्यांनीं आपल्या वागणुकींत असलाच मोठ्या नांवाखालीं छपून जाणारा दगेबाजपणा केला. नरो वा कुंजरोवा म्हणणारा तोच. त्यालाच गांधारीकडून कुलक्षयाचा शाप घ्यावा लागला. महाराज, लपंडाव, दगेबाजी, युक्तिबाजपणा, योगेश्वरता, काय वाटेल तें हिडिस अगर गोंडस नांव द्या, असली कारवाई करून जी धर्मसाम्राज्याची टोलेजंग इमारत श्री-कृष्णांनीं उभारली, जी उभी करतांना अठरा अक्षौहिणी सैन्याची खापणी केली, भीष्मद्रोणादिकांचे बळी ज्याच्यासाठीं बिनदिक्कत घेतले, तें धर्मसाम्राज्य किती दिवस टिकलं? प्रत्यक्ष श्रीकृष्णाच्या उघड्या डोळ्यांदेखत तें लयाला जात चाललेलं त्यानं पाहिलं, याचं कारण काय तर दगेबाजपणानं त्या साम्रा-ज्याचा पाया खचला होता हेंच होय. श्रीशंकराचार्यांचं धर्मसंस्थापन तरी मध्वाचार्यांनीं कां उधळून दिलं आणि मध्वाचार्यांच्या धर्मप्रभावनेचा प्रभाव रामानुजांनीं कां राहूं दिला नाहीं? महाराज, आपण, वरदी आहांत, श्रीराम-दास सद्गुरूचे सच्छिष्य आहांत. मीं अबलेनं का आपणांला हें सांगितलं पाहिजे? मागील स्वधर्मसंस्थापकांनीं जे प्रमाद केले, तेच का आपण करणार? महाराज, विचार करा आणि सांगा पाहूं आतां कीं स्वधर्मसंस्थापनेच्या उच्च कार्याला तरी दगेबाजपणा चालेल का तो?

शिवाजीः—पुतळा, मला तूं योग्य दिशा दाखविलीस. पण झालेल्या



रामदासः—या उषःकालीन शुभवेळेवर मला तुमची जन्माची गांठ घालूं द्या

[अंक ५-वा प्रवेश ७-वा पृष्ठ—११

अपराधाबद्दल शिक्षा ही आतां झालीच पाहिजे. पुढील धर्मसंस्थापकांना मार्गदर्शक व्हावं म्हणून मी हा पहा माझा मीं शिरच्छेद करून घेतों. (श्रीशिवाजी महाराज शिरच्छेद करून घेणार इतक्यांत पुतळाबाई त्यांचा हात धरते.)

पुतळाबाईः—नाहीं महाराज, असं आपण एकट्यानं मरायचं नाहीं. यांत मरण्याचा हक्क मलाही पोंचतो. आपलं पहिलं दर्शन झाल्यापासून मी आपल्याबद्दल विशिष्ट भावना धरून आहें. त्या भावनेला आपण माझ्या वडिलांच्याकडे माझ्याबद्दल मागणी घालून सत्य स्वरूपांत आणली आहे. मी आपली सांवली होऊन इतके दिवस एकनिष्ठेनं वागून शेवटीं आपणाबरोबर दगेबाज वर्तन करणार होतें. तरी महाराज, मरण्याचा हक्क आपणाप्रमाणंच मलाही आहे. तेव्हां विनंती इतकीच कीं, आधीं आपल्याच हातानं मला मारावं, मग माझ्या मागं आपणांला सुचेल तसं करावं. महाराज, आतां उशीर कां?

बहिरजीः—(प्रवेश करतो, पाठोपाठ श्रीरामदास) हा पहा महाराज, काय तोडातोडीचा प्रयत्न चालला आहे तो.

रामदासः—अरे, तो जोडण्यासाठींच होय! शिवबा, पुतळाबाई, आम्हीं तुमचा संवाद ऐकला. त्या सर्वांचं सारसर्वस्व एकच आहे. पण तें सांगण्याच्या आधीं या उषःकालीन शुभवेळेवर मला तुमची जन्माची गांठ घालूं द्या.

(एकमेकांचे हात एकमेकांचे हातीं घालतात.)

बहिरजीः—शेवटीं विश्वास अगदीं विश्वासाचा झाला हां—

रामदासः—अरे, हीच तर समर्थाची अघटित करणी—

नव्हे तेंचि झालें नसें तेंचि आलें ।
कळों लागलें सज्जनाचेनि बोलें ॥
अनिर्वाच्य तें वाच्य वाचे वदावें ।
जनीं संत आनंत शोधीत जावें ॥ १ ॥

जयजय रघुवीर समर्थ ॥

अंक पांचवा समाप्त.

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु. ॥

श्रीब्रह्मचैतन्यदास यांची

नांवें नोंदवा!] **सन्तचरितमाला.** [नांवें नोंदवा!

विक्रीस तयार.

पुष्प १ लें —**श्रीजोतीबुवा** [मलवडी व वेळापूर] किं. ५ आणे

पतिव्रताधर्मवर्णन .... ८२ ,

मालेचें दुसरें पुष्प **श्रीगोंदवलेकर महाराज** यांचे गुरु **श्री तुकाराम महाराज** [येळ्हेगांव] यांचें चरित्र हल्लीं छापत आहे

एक रुपया भरून मालेचे कायम ग्राहक होणारांस मालेचें प्रत्येक पुष्प पाऊणपट किंमतीस मिळेल.

म्यानेजर—सन्तचरितमाला,

३१३ शनिवार पेठ, पुणें सिटी

विक्रीस तयार!

पतिव्रताधर्म-वर्णन. किं. दोन आणे.

(तिकीटें पाठवा.)

डॉ. सौ. इंदुमतीबाई नाईक लिहितात—श्रीबुवामहाराज यांच्या चरित्रांतील ओघानेंच लिहिला गेलेला पतिव्रताधर्मवर्णन हा भाग स्त्रियांस उद्देशून, जुन्या परंपरेस धरून व हल्लीं समाजांत पाश्चात्य पद्धतीच्या अनुकरणानें जी नवीन खळबळ उत्पन्न झाली आहे तिला एक प्रकारचें उत्तर असून प्रत्येक स्त्रीस आपला समाजांत दर्जा किती मोठा आहे याची पूर्ण ओळख पटविणारा आहे. भाषा ओवीबद्ध पण सुलभ, रसाळ, उपदेशपर व मननीय आहे.

पुस्तक मिळण्याचें ठिकाण—म्यानेजर, **सन्तचरितमाला,**

३१६ शनिवार पेठ, पुणें सिटी

श्रीराम.

नाट्यमय मराठी रियासत.

श्रीशिवरायाच्या स्वराज्यस्थापनेच्या कालापासून पेशवाई अखेरपर्यंतच्या महाराष्ट्राचा इतिहास अकरा नाटकांत लिहून अशा एकादश नाट्यरत्नांचा एक अपूर्व हार राष्ट्रदेव श्रीमारुतिराय यांच्या कंठांत घालावा अशी इच्छा आहे. आतांपर्यंत (१) **सुंदरमठ**, (२) **रामदासी कामधेनु**, (३) **यक्षिणीची कांडी**, हीं श्रीशिवकालीन (४) **पाटीलबावा** अर्थात् **महादजी शिंदे** हें सवाई माधवरावांच्या वेळचें आणि (५) **पेशवाई** हें रावबाजीच्या कालचें, अशीं पांच नाटकें लिहून तयार झालीं आहेत. बाकीचीं सहाही ईश्वरकृपेने लवकरच तयार होऊन संकल्प पूर्ण होवो.

कृष्णाजी हरि दीक्षित.

माझ्या इतर पुस्तकांची यादी किंमतीसह पुस्तकाचे प्रारंभीं दिली आहे ती पहावी.